वीणा प्रकाशन, पु. २८

# वीरारत्नमंजुषा

लेखक

गणेश दामोदर सावरकर

डिसेंबर १९४४.]

[redacted]

किमत अडीच रुपये.

प्रकाशक

ब. गो. गर्गे,
एम्. ए.

संपादक

ब. गो. गर्गे, एम्. ए.
द्वा. वा. घाटे,
बी. ए. एल्. एल्. बी.

७
सावरकर (ग. दा.)
८०३९

मुद्रक

बा. गो. ओगले,
नक्षत्र प्रेस, महाल नागपूर.

## — अनुक्रमणिका —


| | | |
|---|---|---|
| (१) | महाराणी पुष्पवती ... .... | १ |
| (२) | हुतात्मा दाहीरच्या सूडघेत्या वीरकन्या ... | ७ |
| (३) | समरभवानी श्रीकर्मदेवी ... ... | १४ |
| (४) | हौतात्म्यस्फूर्ति महाराणी देवी पद्मिनी ... | २२ |
| (५) | एक वीरबाला—हमीरमाता .... ... | ५३ |
| (६) | रणशूरा सुंदरी तारा ... ... | ५८ |
| (७) | श्रीचितोडवरील रणदुर्गा जवाहिरबाई ... | ७१ |
| (८) | राष्ट्रस्वामिभक्तिनी स्वार्थत्यागमूर्ति देवी पन्नादाई ... | ७९ |
| (९) | एक निनामी सिंहबाला .... ... | ९६ |
| (१०) | चितोडवरील अंतिम वीरादृष्य, वीराश्रेष्ठा पत्तामाता आणि तिचा वीरासखी वर्ग ... .... | १०८ |

# वीरारत्नमंजुषा

॥ ॐ ॥

*शिशुपाळणा धरी जी करी ।*
*जनतारणा नित ती करी ॥*

**The hand that rocks the craddle rules the world.**

जगांत स्त्रीशक्ति ही महासमर्थ शक्ति आहे आणि त्या शक्तीचें यथार्थ नि पूर्ण महत्त्व हिंदुजातीय पूर्वद्रष्ट्यांनींच योग्यप्रकारें जाणलें होतें. कोणतीहि शक्ति असो ती जितकी कमी अधिक मानानें सामर्थ्ययुक्त असेल त्या मानानें तिचेपासून जगाची हानि वा लाभ होणारे असतात. शक्तीला योग्य प्रकारें नियंत्रणांत ठेवून अुपयोगी लावलें तर ती जगाला लाभ करून देअील. परंतु जर तिला स्वैरसंचार करू दिला तर ती अेक संहार तरी करील अथवा स्वतःच व्यर्थ होअून तरी पडेल.

कीटाणूपासून तों अत्युन्नत मनुष्य प्राण्यापर्यंतच्या क्षेत्रांत या स्त्रीशक्तीचीं दोन रूपें दृष्टीस पडतात. अेक संभोगशील स्त्रीशक्ति नि दुसरी परिपालनशील मातृशक्ति. मनुष्येतर सर्व जीवमात्रांत–किडामुंगीपासून तो अुचातिअुच्च पशुकोटीपर्यंत पहिल्या संभोगशील स्त्रीशक्तीचेंच अस्तित्व निरपवादपणें दृष्टीस पडतें. संभोगशीलतेचें आकर्षण नाहीं असा जीवकोटींत कोणीहि सांपडणार नाहीं आणि कीटाणूपासून पशुकोटीपर्यंत तर तें आकर्षण नसणें हें अस्वाभाविकच आहे. मनुष्यांत मात्र या संभोगेच्छेच्या नात्याबरोबरच परिपालनशील मातृभावाचा अुदय झालेला आहे. हा मातृभाव मनुष्येतर प्राण्यांत कोठेंहि परिवर्धित झालेला नाही. अर्थात् मातृभावाचा

अुदय अुन्नतीच्या विशिष्ट श्रेणीच्या जीवदशेंतच अुदय पावूं शकतो ही गोष्ट लक्षांत घेतां मातृभाववर्धन हें जीवकोटींतील अुत्कर्षाचें लक्षण आहे हें स्पष्ट दिसून येतें. संभोगशील स्त्रीकल्पना वा पत्नीभाव हा अुत्कटत्वाला नेलेला असणें हें कांहीं अुन्नत स्थितीचें लक्षण ठरूं शकणार नाहीं. पण जीवाला अुन्नत स्थिती प्राप्त झाल्यावर ज्या मातृभावाचा अुदय होअून तो वर्धनशील होतो त्याच भावाची अुत्कर्षावस्था प्राप्त होणें म्हणजे तो अुन्नतावस्थेचाहि अुत्कर्ष ठरला पाहिजे हें निराळें सांगावयास नको.

हिंदूव्यतिरिक्त आजच्या तथाकथित सुधारलेल्या पाश्चात्य देशांतील सर्व समाजांत मातृभावाला पराकोटीला नेलेलें नाहीं. त्या सर्व समाजांत पत्नीपूजेलाच महत्व दिलेलें आहे. हिंद्वेतर जगतांत (पत्नीलाहि हीन दशेला पोचविणाऱ्या कांहीं विशिष्ट जाति वगळून) पत्नीपूजेपुढें मातृभावाचें अस्तित्व लक्षातहि येअूं नये अितकें तें लोपून गेलेलें आहे. हिंदूंत मात्र या मातृभावाला सर्वोच्चस्थान दिलेलें आहे. या आम्हां हिंदूंच्या संस्कृतीचा '**मातृदेवोभव**' हा सर्व आदेशांच्या आधीं दिलेला नि म्हणून सर्वश्रेष्ठ असलेला असा आदेश आहे. पत्नीभाव हा निसर्गच असल्यानें तो असण्यांत वा वाढण्यांत मनुष्यप्राण्याचें श्रेष्ठत्व नसून ज्या अुन्नतिपदानें मातृभावाला यथार्थरूपानें जागृत केला त्या मानव्यतेनें मातृभावाला अुच्चावस्थेला नेण्यांतच मनुष्यत्वाचें श्रेष्ठपण आहे. नि अुच्च हिंदु जातीनें मातृभावाला पूजनीयपदाप्रत नेअून तें अुच्च प्रतीचें श्रेष्ठ मनुष्यत्व आपणांमध्यें असल्याचें सिद्ध केलेलें आहे. आणि म्हणून हिंदुमहिला समाजानें सुगृहिणीपदाच्या स्वाभाविक कर्तव्याबरोबरच सुमातापदाचें अधिकारी होण्याचें ध्येय आपणापुढें ठेवणें नि तें साध्य करून घेणें हेंच परमश्रेयस्कर आहे.

कोणताहि नवा वेडाचार पुढें आणून त्याला पुरोगामीपणाचें वा सुधारणारूपाचें नांव देण्याच्या बोकाळलेल्या प्रचारयुगांत हे विचार बुरसटलेले

वाटण्याचा संभव आहे. म्हणून त्याविषयीं थोडेसें दिग्दर्शन केलें पाहिजे. आज जगांत जर्मनी, फ्रान्स, अिंग्लंड, अमेरिका, जपान व रशिया या देशांचीं नावें पुढारलेल्या नि सुधारलेल्या देशाच्या नात्यानें पुढें आलेली आहेत. त्यांतील जर्मनी, अिटली, जपान यांनीं तर **सुमाता होणें हेंच स्त्रियांचें आद्यकर्तव्य आहे** हें उद्घोषित करून त्याप्रमाणें आपलें समाजाला आकार देण्याचें कार्य संपवित आणलेलें आहे. नुसत्या विधानां-पेक्षा प्रमाणांसह तें पुढें मांडलें तर अधिक चांगलें म्हणून थोडासा पुरा-व्यांचा प्रयत्न करूं.

१ डॉ. जे. डी. अनवीन यांनीं बाबिलोनिया, सुमेरिया, ग्रीस, रोम, अरब, अिंग्लीश आदिक लोकांच्या अुत्कर्षापकर्षांचें परिशीलन करून अेक सिद्धांत त्यांनीं पुढें मांडला आहे. नि तो म्हणजे "संभोगशीलतेचें शक्य तितकें नियमन करून कमीत कमी प्रमाणांतच ती ठेवीत ज्या जाती सुमाता निर्माण करूं शकल्या त्या जातीच अुत्कर्षाला गेल्या नि या स्थितींतून खालीं येतांच त्या जाती अवनतीला पोचल्या."

२ अमेरिकेमध्यें बिशप (धर्माधिकारी पदस्थ व्यक्ति) चे पदावर अेकच स्त्री अधिष्ठित होअूं शकली. तिचें नांव बिशप आल्मा व्हाअिट असें आहे. ती म्हणते "जगांतील अनाचार नि अत्याचार यांना स्त्रियाच कारण आहेत.......पुरुषांच्या नि स्वतःच्या अधःपतनाला कारणीभूत होण्याचीं साधनें स्त्रियांच होऊं लागल्या आहेत. तरुण स्त्रिया नि मुली पुरुषांना अुत्तेजित न करतील तर जगांतील अर्धीं पापें थांबतील... ....मला असा आत्मविश्वास वाटतो कीं मनांत आणल्यास स्त्री जगाला चांगुल-पणाप्रत नेअूं शकेल. स्वैर प्रेम, वाढते घटस्फोट, नि पुनर्विवाह यांपासून (या आपत्तींपासून) जगाची सोडवणूक करावयाची असेल तर स्त्रियांचे सामर्थ्याचा अुपयोग करून घेतला पाहिजे. **आणि याचा प्रारंभ घरांतच पहिल्यानें मातृपदाद्वारा व्हावयास पाहिजे. घरांत मातृपदीय स्त्रीचें**

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
वर्ग............... क्रमांक ........... ८०३२

सामर्थ्य असामान्य असतें. राष्ट्रीय जीवनाला स्त्री अुत्तम स्थितीला नेअू शकेल."

३. अेक अध्यापिका म्हणते:-"संयमानें अर्थात् मनोनिग्रहानेंच चांगलें जीवन अस्तित्वांत येअू शकतें. मन मानेल तसें वागणें हें दुर्बलतेचें लक्षण आहे ही शिकवण लहान मुलांच्या मनांवर बिंबवणें हें सुमातांचें श्रेष्ठ कर्तव्य आहे. आणि ही शिकवण परिणामकारीपणें बिंबवण्यास माताहि त्याच सामर्थ्यांनीं युक्त असलेल्या म्हणजेच सुमाता पाहिजे." म्हणजेच हें कर्तव्य योग्य प्रकारें पार पडेल. आणि अशा प्रकारें संयमशील नि म्हणूनच दृढनिश्चयशक्तीनें युक्त नवी पिढी बनत गेल्यास ती राष्ट्राला कल्याणकारी झाल्यावाचून कशी राहील ?

४ आमच्या स्वैरवर्तनवादी पक्षाला रशीयांतून मिळणाऱ्या मात्रेचा वळसाच लागूं पडण्याचा संभव आहे. म्हणून रशिया काय करीत आहे हें पाहूं. रशियाच्या शीर्षस्थानीं असलेल्या स्ट्यालिनच्या सरकारनें सहशिक्षण, स्त्रीपुरुषसमानाधिकार अित्यादि वेडांना कान धरून दूर भिरकावून दिलें आहे. सहशिक्षण अर्थात् समानशिक्षणहि काढून टाकलें. पुरुष स्त्री यांचें समान कार्यक्षेत्र नाहीं असें ठरवून पुरुष हा क्षत्रियवृत्तीचा वीर नि स्त्री अुत्कृष्ट माता (man a soldier and woman a good mother)-सुमाता-बनलीं पाहिजेत, असें ठरवून तदनुरूप राष्ट्रकार्य दिशा बदलण्याचें धोरण आंखलें आहे.

५. फ्रान्सच्या सांप्रतच्या महान अधःपाताची मीमांसा करतांना फ्रान्स ज्यांना अजून पावेतो आजचा अेकमेव सन्माननीय पुरुष समजून मान देत आला आहे ते मार्शल पेतां म्हणतातः—"त्यागवृत्ति नि संकटांत तोंड

देण्याचें मनोधैर्य यांची सवय सुटून फ्रेंचांमध्यें सुखोपभोगाची लालसा वाढत चालली, नि विलासप्रियतेची चटक लागून राष्ट्राच्या नि समाजाच्या कल्याणाकडे दुर्लक्ष झालें. संततिनियमनादि खुळें बोकाळून विषयवासनेनें थैमान घालण्यास आरंभ केला आणि त्याचमुळें धैर्य, वीर्य, नि पराक्रम यांची अुणीव झाल्यानें राष्ट्राचें रक्षण करण्याची शक्ति नष्ट होअून शत्रूला शरण जाण्याची पाळी आली." यावरून 'सुधारणेच्या शिखरावर पोचलेलीं' युरोपीय राष्ट्रें कोणता मार्ग स्वीकारीत आहेत हें सहज कळेल.

श्रीमती सुमित्रादेवी नामक अेका तरुणीनें त्यांच्या स्त्रीमंडळाच्या वतीनें "पुरुषांसमान सर्व क्षेत्रांत पदार्पण करतां यावें असें आम्हाला वाटतें. आम्हास क्रांति पाहिजे आहे. भाअी परमानंदजींनीं स्त्रियांचें क्षेत्र पुरुषाहून भिन्न आहे असें प्रतिपादलें आहे आणि त्यामुळें आमच्यांत असंतोष अुत्पन्न झालेला आहे. तेव्हां अशा वेळीं आमचें खरें कर्तव्य नि कार्यक्षेत्र याविषयीं आम्हांस योग्यमार्गदर्शन करावें, आम्ही आपण सांगाल त्या मार्गानें जाण्यास सिद्ध आहोत." अशा अर्थाचें अेक पत्र स्वातंत्र्यवीर सावरकर यांना लिहिलें होतें. त्याचें अुत्तरीं ते म्हणतात "हिंदू महिलांनीं राष्ट्रसेवा अवश्य केली पाहिजे. राजकारणांतहि भाग घेतला पाहिजे. प्रसंगवशात् झांशीच्या महाराणी-प्रमाणें देशधर्मरक्षणार्थ रणांत झुंजलेंहि पाहिजे. पण—**स्त्रियांचा परमपवित्र विशिष्ट आदर्श म्हणजे मातृपद आहे.** अुत्तम संतान—वीरपुत्र नि वीरकन्या—यांना जन्म देअून त्यांचें परिपालन करणें यांतच स्त्रियांची वीरता, देशसेवा नि धर्मसेवा आहे. पुरुषाप्रमाणें होणें नव्हें, पण स्त्रीत्वाला योग्य स्त्रीधर्माचें आचरण करणें हें त्यांचें राष्ट्रकर्तव्य आणि राजकारण आहे."

ही गोष्ट अपमानमय असमानतेची मुळींच नाहीं. अुलट सन्मानपूर्ण श्रमविभागाची आहे. निसर्गानेंच हें कर्तव्य त्यांचेसाठीं नियुक्त केलेलें आहे. **मातृपदापेक्षां अधिक सन्मानदायी आणि पूजनीय कर्तव्य, सेवा, अथवा अधिकार दुसरा कोणता असूं शकेल !!**

ज्या जातींतील मातृपदस्थ महिला वर्ग, अेक नाहीं दोन नाहीं, शतशः पिढ्यानुपिढ्या आपल्या हिंदूराष्ट्राला सुकन्या नि सुपुत्रप्रदान करीत आला आहे तो स्त्रीवर्ग किती संयमशील, वीरवृत्त, आत्मार्पणापर्यंतच्या त्यागाला सदोदित सिद्ध, नि भौगेकजीवनापासून कसा पूर्णपणें अलिप्त होता हें सांप्रत किंकर्तव्य-मूढ स्थितींतील हिंदू स्त्रीसमाजापुढें येणें नितांत अवश्यक आहे. आणि त्यासाठीं अगदीं अलीकडील अैतिहासिक कालातसुद्धां हिंदू स्त्रीवर्ग किती नि कसा आदर्शभूत होता हें अर्वाचीन हिंदू स्त्रीमनाला दिसावें हा या लहानग्या पुस्तकाचा हेतु आहे.

---

# वीरारत्नमंजुषा

## भूमिका

'खाण तशी माती' ही म्हण महाराष्ट्रीयांना चांगलीच माहित आहे. 'राष्ट्रनिर्मिति पाळण्याची दोरी धरणाऱ्या हातांत असते.' अशाहि अर्थाची यथार्थ अशी दुसरी अेक म्हण अस्तित्वांत आहे. शास्त्रांचीं रहस्यमय निर्विवाद सत्यें ज्याप्रमाणें सूत्रबद्ध करण्याची रीति आहे; त्याचप्रमाणें समाजांत अनुभवाला येणारीं निर्विवाद सत्यें म्हणींच्या रूपानें भाषेंत गोवलीं जात असतात. म्हणीं म्हणजे व्यवहारी भाषेंतील सत्यप्रतिवादक सूत्रेंच होत असें म्हटलें तरी यथार्थच ठरेल. या म्हणींकडे अनुभूत सत्यें या दृष्टीनें पहाणेंच युक्त आहे. जगांतील धार्मिक, सामाजिक, राजकीय आदिक क्षेत्रांत जीं जीं अद्वितीय नररत्नें झळकलीं त्या सर्वांनीं आपल्या अंगीं असलेल्या नि चमकलेल्या दिव्य तेजाचें यश आपल्या सुमातांनाच दिलेलें आढळून येअील. प्रत्यक्ष रत्नापेक्षा रत्नप्रसवा खाणीची महनीयता अनेक पटीनें श्रेष्ठतर होय, हें प्रत्येकाला मान्य केलेंच पाहिजे. सुमाता ही आपल्या गृहसाम्राज्यांत पुढील पिढीचें सुपोषण नि सुवर्धन करूं शकते. नवबालपिढी ही पुढील कर्त्या पिढीच्या अंकुरांचा गुच्छ होय. त्या अंकुरांना सुपुष्ट ठेवून वृद्धिंशील करणें आणि त्यांच्या भावी आयुष्याला कुलशोभा-दायि, राष्ट्रोपकारक, नि मनुष्यजातिभूषक स्वरूप देणें हें अेकटेंच कार्य अितकें महत्तम, परमावश्यक, आणि अनन्यसाधारण आहे कीं हें काम ज्यांचेकडे निसर्गानें नि सुदैवानें दिलेलें आहे त्यांचेवर या जगांतील जीवन-यापनाचा दुसरा कोणताहि भार व चिंता पडतां कामा नये. सामान्य सैनिकांना कराव्या लागणाऱ्या कर्तव्यांचा भार त्यांचे नेत्यांवर पडणें हें जसें

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग............क्रमांक...........

कार्यहानिकर आहे त्याचप्रमाणें जगांतील कर्तव्यक्षेत्रांत अवतीर्ण होणाऱ्या नव्या पिढीला मागील पिढीची खरी प्रजा बनविण्याचें कार्य ज्यांचे हातीं आहे त्या मातांवर या अेकाच कर्तव्याचा भार राहिला पाहिजे; याहून निराळा कर्तव्यभार त्यांच्यावर पडणें हानिकर आहे. तें कार्य त्याच सुयोग्य रीतीनें पार पाडूं शकतील. अितरांचें तें काम नाहीं. वर जो प्रजा शद्ब वापरला आहे तो ढोबळ मानानें वापरतात तसा वापरला नसून त्याच्या खऱ्या मूळ अर्थानें वापरला आहे. प्रकर्षानें—पुढें पाऊल टाकीत म्हणजे अर्थात् प्रगतिपरतेनें—ऊत्पन्न होते—पुढें येते—ती प्रजा. आपल्या पहिल्या पिढीपेक्षां अधिक प्रगमनशील असणारी ती पिढी प्रजा या शद्बाला पात्र ठरेल.

सध्याच्या विपर्यस्त स्थितींत शद्बांचें सुद्धां अर्थ बदलले आहेत. अथवा बावळटपणें आपण चांगले शद्ब अयोग्य स्थानीं वापरीत असतों. त्यापैकींच प्रगति हा अेक शद्ब आहे. समाजांत कोणतीहि नवीन गोष्ट चालू झाली किंवा कोणी केली कीं त्याला 'प्रगति' म्हणण्याची खोड आम्हां हिंदुस्थानवासीयांना लागली आहे. नवी गोष्ट समाजाला, धर्माला, संस्कृतीला, थोडक्यांतच म्हणावयाचें तर राष्ट्राला उपकारक, प्रगतिपर, प्रवर्धक, नि बलवर्धनकारी आहे कीं नाहीं याची छाननी न करतां—छाननी करण्याचा प्रयत्नहि न करतां—केवळ ती गोष्ट नवी आहे येवढ्याचसाठीं तिला 'नव–विचार' म्हणून प्रगतिपर ठरविण्याचें खूळ माजलें आहे. पाश्चात्य समाजांत विकारस्वातंत्र्याला विचारस्वातंत्र्याचें नांव मिळून समाज-रचनेचा वैज्ञानिक दृष्ट्या गंभीर विचार करणाऱ्या शास्त्रज्ञांना चिंतेंत पाडण्यासारखा ऊत आलेला आहे. त्याच उताचे फवारे अिकडेहि पोंचून त्याला प्रगति म्हणणारे बावळट आम्हीं ठरूं पहात आहोंत. "पुन्हां परत निसर्गाकडे" ची आरोळी ठोकून युरोपमध्यें स्त्रीपुरुषांचा अेक 'नग्नपंथ' निघाला आहे. आमच्या अिकडील अध्यात्मिक ध्येयप्रीत्यर्थ नग्नावस्थेंत

राहणाऱ्या गोसावी पंथाला ‘घृणास्पद रानटी’ पणाचें विशेषण देणारा सुधारक ‘युरोपीय नग्नपंथ अेका दृष्टीनें प्रगतिच आहे’ असें म्हणावयाला धजतो. अशी आमची दुरवस्था झाली आहे. विकारवशता ही सर्व प्राणि-वर्गाला सर्वसामान्य आहे. बुद्धिबलाचे साह्यानें त्या विकाराच्या परितृप्तीचे अनेक मार्ग शोधून काढणें म्हणजे मानव्याची प्रगति निश्चित नाहीं. ज्या पशुकोटींतून आपण वर चढलों त्याच पशुसुलभ विकारांना अनंत साधना-नुकुलतेच्या साह्यानें परिपुष्ट नि प्रबल करीत—मानव्याच्या वरच्या पायरीवर चढलों असूनहि—आपली पशुविकारमयता त्यायोगें दृढतर केली यापलीकडे आपण अधिक काय केलें असें ठरेल बरें ?

## तरीहि गुणतेज ओळखलें जातें !

अशी स्थिति असली तरी श्रेष्ठ गुणांचें तेज ज्यास्थळीं झळकतें त्या स्थलाकडे मनुष्यमात्राचें मन अवशतेनें चटकन वेधलें जाऊन तें नत-मस्तक होतें. विवाहाच्या पूर्वसंबंधांत पुढील आयुष्याची सुरक्षिति नि सुखमयता उरली नाहीं असें पाहून तो संबंध सोडून सुखलालसेनें नव्या प्रियकराकडे जाणारी सुखलोलुप विकारी स्त्री आणि दिव्य पातिव्रत्य रक्षणार्थ सर्वस्वाची आहुति देत मरणाला बंधुभेट समजून आगींत उडी घेणारी अेकनिष्ठ अशी ‘जोहारा’ मधील राजपूत वीरा अशा दोन स्त्रियांचीं चित्रें जर मनुष्यदृष्टीपुढें धरलीं तर प्रत्येक मनुष्याचें मन क्षणाचाहि विचार न करतां त्या श्रेष्ठ ध्येयानिष्ठ राजपूत वीराचित्रा पुढेंच आपलें मस्तक शतवार नमवावयाला सिद्ध होअील यांत तिळमात्र शंका नाहीं. असें कां व्हावें? यांत काय रहस्य आहे ? ज्या गोष्टीकडे नैसर्गिक मन—प्रवाह वहात आहे त्या विकारवशतेवर विजय प्राप्त करणाऱ्या प्रचंडतर अिच्छा—सामर्थ्यांत वा निष्ठासामर्थ्यांत मनुष्याचें खरें मनुष्यत्व आहे, असेंच मानवी मन ज्ञानतः वा अज्ञानतः पण निश्चयानें मानीत नि ओळखीत आहे, हेंच खरें; असें मानल्यावाचून गत्यंतर नाहीं.

कोणत्याहि गोष्टींत, कौशल्यांत वा गुणांत प्राविण्य मिळवावयाचें असलें तर अेकनिष्ठता, अेकतानता, अेकाभ्यासता हेंच अेकमेव साधन आहे. मनाची शक्ति अेकाग्रतेच्या अभ्यासानेंच साध्य आहे हा मानसशास्त्राचा अनुभवाचे पायावर ठरलेला सिद्धांत आहे. अर्थात् कला, विद्या, शास्त्र वा गुण यांच्यांत प्रवीणता वा पूर्णता मिळविण्यासाठीं त्या त्या गोष्टींचें अेकनिष्ठ अध्ययन, अभ्यसन वा अुपासन करणें हें अनिवार्य ठरतें. धैर्य, स्वार्थत्याग, शूरता, वीरता, पराक्रम आदिक गुणराजींचें अधिष्ठान हें अिच्छासामर्थ्यांतच आहे. विकारवशतेंत नाहीं. ज्या मानानें अिच्छा वा निष्ठासामर्थ्य अधिकाधिक अुज्ज्वलतर असेल त्या मानाने वरीलसारख्या गुणांचा अुत्कर्ष झालेला दिसून येतो. अुलट ज्या मानानें विकारवशता अधिक असेल त्या मानानें त्या गुणांच्या अुत्कर्षांत हीणकसपणा असण्याचा वा येण्याचा संभव अुत्पन्न होतो. अनुष्ठेय अशा अगदीं ‘शारीरिक’ गोष्टींपासून तों अध्यात्मिक ध्येयप्राप्तीच्या अनुष्ठानापर्यंत प्रबल अिच्छा वा निष्ठासामर्थ्यांचीच अवश्यकता निरपवादितेनें असलेली दिसून येते. सोन्याच्या खाणींतील सर्वच माती सोनें नसेल पण त्या मातींतसुद्धां पीतवर्णाची—सुवर्णाची—झाक निश्चित दृष्टीस पडेल, आणि ती माती अितर स्थलींच्या मातीहून गुरुत्वानें निश्चयानें अधिक ठरेल. त्याचप्रमाणें ज्या व्यक्तीच्या मातेमध्यें या अिच्छा वा निष्ठासामर्थ्याच्या तेजाचें वास्तव्य असेल त्या मातेच्या संततीमध्यें या निष्ठासामर्थ्यामध्येंच अुदय पावणाऱ्या गुणांपैकीं कांहीं गुण तरी झळकूं शकण्याचा संभव निर्माण करणारें अिच्छासामर्थ्य निश्चयानें आढळून आल्यावांचून रहाणार नाहीं.

हिंदुसमाजरचना ही व्यक्तिस्वातंत्र्याला अनिरुद्धपणें मोकळें सुटण्याचें रान नाहीं. समाजस्थैर्य व समाजकल्याण यांना अविरोधी नि व्यक्तिकल्याणसाधक अशी दृष्टि समाजरचनाकारांनीं ठेवलेली आहे. हिंदु अितिहासांमध्यें वेदांपासून तों अगदीं आतां आतांपर्यंत स्त्रीपूजेचें स्वरूप

जगांतील अितर जातीय स्त्रीपूजेपासून सर्वस्वी भिन्न आणि अधिक कल्याणकारी असें आहे. स्त्रीप्रेमाचें मुख्यतः दोन भाग करतां येतील. अेक विकारवश प्रेम व दुसरें भावनावश प्रेम. केवळ पत्नीत्व वा भोगलालसार्थ प्रेम हा विकाराच्या पायांवर अुभारलेला संबंध आणि सहधर्मिणी, कन्या, भगिनी नि माता या पवित्र भावनाबलावर स्थित असलेला पवित्र प्रेम-भावनासंबंध असे ते दोन भाग आहेत. आणि भावनासंबंधीय नात्यांत मातृस्थान हें श्रेष्ठतम आहे. हिंदुजातीयसंस्कृति वा त्याच संस्कृतीपासून अुत्पन्न झालेल्या दुसऱ्या शाखासंस्कृति या मातृपूजक आहेत; आणि अितर जातीय संस्कृति या पत्निपूजक आहेत. निर्विकारमनस्क विचारकाला मातृ-पूजक संस्कृतीच मानव्याला शोभविणारी आहे हें मान्यच करावें लागेल. मातृस्थाना अितकें आदरणीय, पूजनीय व वंदनीय असें दुसरें कोणतेंहि स्थान नाहीं. आणि तदुपदेशक वेद आदेश देतात कीं, ' न मातुः पर दैवतम् ' अशी स्थिती आहे म्हणून ' मातृदेवो भव ' – ' सर्वांना वंदन करण्याआधीं मातृरूप देवतेला पहिलें वंदन कर. ' ८०३९

असें हें मातृस्थान प्रबल अिच्छा वा निष्ठासामर्थ्यपूर्ण असल्यावर अिच्छित गुणांचें बीजारोपण संततींमध्यें करून त्या गुणांचें पोषण नि संवर्धन अशा माता अुत्कृष्ट रीतीनें ममत्वाच्या अमृतमय अनुपानासह करूं शकतील तसें दुसरें कोण करूं शकणार आहे ? जगांत भोगलालसेचा नंगा नाच प्राणिवर्गाच्या मनोभूमिकेंत जितक्या प्रबळतेनें चालू आहे तितक्या प्रबळतेनें वा त्याच्याशीं तुलना करतां येअील अितक्या मानानें दुसऱ्या कोणत्याहि विकाराची स्थिति नाहीं. या भोगलालसेला आळा घालू शकणारें अिच्छासामर्थ्य दुसऱ्या सर्व विकारांचा पाडाव करूं शकेल यांत संशय नाहीं. आणि सर्व विकारांत अग्रगण्य नि निग्रहाला अशक्यवत् ठरणाऱ्या भोगलालसेच्या भुताला दिव्य पातिव्रत्यनिष्ठेच्या मंत्रानें मंत्रबद्ध करून या अद्वितीय अशा दिव्य हिंदुसंस्कृतीनें पतिव्रतेच्या मनांतून विकारवशतेला अुडवून

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
८०३९

देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. हिंदुसंस्कृतीनें समाजाला पशुधर्माकडे ओढून बांधून ठेवणारी व मानव्याचे अुच्चतेची पायरी चढू देणें अशक्यवत् करून ठेवणारी विकारवशता हिंदुजातीच्या मानव्याच्या खाणींतच–आमच्या मातृपदीय स्त्रीवर्गातच अुरूं दिली नाहीं. आणि म्हणूनच सर्व जगाचे डोळे दिपवणारी, सर्व जगाला आश्चर्यानें मुग्ध करणारी, आणि सर्व जगानें वंदनीय ठरवावीं अशीं मानव्य गुणाचे विविध प्रकारच्या दिव्य तेजानें झळकणारीं अनंत मानवरत्नें–स्त्रीपुरुषरत्नें–या हिंदुराष्ट्रेतिहासांतील प्रत्येक पिढींत चमकत आलेलीं आहेत. आणि अशा या हजारों वर्षांच्या अिति-हासांतून अखंडपणें दिव्यगुणांची दीप्ति फाकवीत आपली तेजस्विता जगांमध्यें प्रकाशित करणाऱ्या हिंदुजातीच्या मातृस्थानीय वीरारत्नांपैकीं कांहीं रत्नांचें तेजोवर्णन करण्याचा हा अुपक्रम केला आहे. हेतु हा कीं आमच्या कुमारिका–विवाहिता स्त्रीजातीच्या हातीं ही रत्नमंजूषा जावी. आणि या राष्ट्राच्या अुत्कर्षार्थ नि आपल्या स्वतःच्या जन्मसार्थक्यार्थ पूर्वेतिहासांतील दिव्य स्त्रीरत्नांच्या वंदनीय गुणांचें अनुष्ठान त्यांचें हातून घडावें.

## संग्रहक्षेत्र

अितिहास म्हटला कीं देशांतील राज्यांची अुलथापालथ, राज्यक्रांत्या, त्यांतील राजांचें जयपराजय, आणि प्रजापालन कौशल्य वा प्रजापीडनकथा याच गोष्टींचा सामान्यतः अुल्लेख त्यांत होत असतो. पूर्वकालीन श्रेष्ठ गुणांच्या प्रभावशाली महाव्यक्तींचीं चरित्रें पहावयाचीं तर याच क्षेत्रांत निवडावीं लागतात. देशांतील राजा, सेनाधिपति, सेनाधीश, सेनाधिप, राज्यकार्यधुरावाही अित्यादि वर्गांतूनच अशीं अुदाहरणें घेणें शक्य असतें. पण हा वर्ग म्हटला तरी त्या त्या देशांतील जातीयांपैकींच असणार. तेव्हां जे गुण वा दोष, उत्तमता वा अधमता, धन्यता वा तुच्छता यांच्यांत दिसून येतात तेच गुण त्या देशांतल्या सर्व जातींत कमी अधिक प्रमाणांत मुरलेले आहेत असें समजण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. आपल्या या

भारतवर्षांतहि महनीय व्यक्तींचीं तेजस्वी अुदाहरणें अितिहासांतून अुपरिनिर्दिष्ट क्षेत्रांमध्येंच निवडावीं लागणार हें अुघड आहे. या वर्गांत दृष्टोत्पत्तीस येतात तेच गुणदोष सर्व जातींत मुरलेले असतात हें जें वर विधान केलें आहे तेंच विधान भारतासंबंधानेंहि तंतोतंत लागूं आहे. पण त्यासंबंधीं थोडीशी फोड करणें येथें अवश्यक वाटतें. हिंदुस्थानांत वर्णसंस्था अस्तित्वांत असल्यामुळें हिंदुजातीच्या अेक्या वर्णांत दिसून येणारा गुणसमुच्चय दुसऱ्या वर्गांतील लोकांना " तेच गुण आपल्यामध्यें आहेत " अशा भावनेनें भासमान कसा व्हावा, ही शंका राहूं नये म्हणून त्यासंबंधीं थोडासा प्रपंच करणें अवश्यक आहे.

## सर्व वर्णांची अेकच संस्कृति नि अेकच रक्तप्रवाह

गुणदोष कांहीं अंशाने जसे रक्ताश्रित असतात तसेच ते भावनाश्रितहि असतात. आणि भावनाश्रित गुणदोष हे संस्कृतीनें निर्माण केलेले असतात. हिंदु लोकांच्या संस्कृतीचें मुख्य केंद्रतत्व 'आत्म्याचें अमरत्व' हें आहे. 'अधमांतील अधमहि आत्मदृष्ट्या अजर–अमर–असा अीश्वरांश आहे' अशी शिकवण जी संस्कृति देते ती संस्कृति समान गुणपरिपोषाची अेकच भूमिका दाखवून देअून सर्व जातीला समानत्वाची अेक देणगी म्हणून देत असते. तेव्हां परिस्थितिभेदानें नि विविध क्षेत्रांत निरनिराळ्या स्वरूपानें कां होअीना पण त्याच गुणांचें प्रकटन त्या सर्व जातीमध्यें झाल्यावांचून रहाणें शक्यच नाहीं. आतां अुरला रक्ताश्रितपणाचा भाग. महाभारतांत असें सांगितलें आहे–आणि समाजशास्त्र सिद्धांत सुद्धां तेच विधेय शास्त्रसिद्ध म्हणून स्वीकारतो–कीं पूर्वीं अेकच (हंस म्हणून) जाति होती. आणि पुढें गुणकर्मानुरूप वर्ण बनत गेले. या महाभारतकथित सत्याकडे बघतां सर्व हिंदुमात्र–मग तो कोणत्याहि वर्णाचा वा वर्णगत पोटभेदाचा असो–रक्ताश्रित असलेल्या समानगुणसमुच्चयाचा अुत्तराधिकारी आहे. अितिहासांमधूनहि कांहीं कांहीं प्रसंगीं

प्रकट झालेल्या अितर वर्णीय वा वर्गीय गुणांच्या प्रकटनांवरून नि सांप्रत वर्तमानकाळांत निरनिराळ्या परिस्थितींत आणि निरनिराळ्या प्रकारानें त्याच गुणांचें प्रकटीकरण सर्व जातींत कमी अधिक मानानें होत असलेलें बघून सर्व हिंदुजातींतील सर्व वर्णोपवर्णांत समान गुणानें युक्त अशा अेकजातीय रक्ताचाच अखंड प्रवाह वहात आहे असें सिद्ध होत आहे म्हणूनः—
**जो गुणसमुच्चय क्षत्रियांमध्यें तोच अखिल हिंदुजातींमध्येंहि आहे** हें निश्चित. तेव्हां क्षत्रियवर्णांतील गुणप्रभाव हा आपल्यामध्यें कोठला असणार? असें हिंदूंमधील क्षत्रियेतर वर्गांतल्या कोणालाहि वाटण्याचें कारण नाहीं. जें तेज, जो स्वाभिमान, जो पराक्रम, अुदात्तता आदिक जी गुणमाला क्षत्रियांनीं राजकारणक्षेत्रीं वा रणक्षेत्रीं दाखवली तीच ब्राम्हण वैश्य शूद्रादिक अखिल हिंदुमात्र आपापल्या कार्यक्षेत्रांत निश्चयानें दाखविण्याला समर्थ आहे हें अितिहासमान्य नि अनुभवसिद्ध सत्य आहे. तेव्हां यांतील चरित्राच्या वाचकांनीं आपण ज्यांचें चरित्र वाचीत आहोंत ते आपले अेकरक्तीय आणि अेकसंस्कृतिधारक सजातीय आहेत ही भावना जागृत ठेवावी. सिंहाची गर्जना अैकतांच पुलकित होअून गर्जनाप्रवण होअूं पहाणारीं सिंहमनेंच असतात. अितरांचें मनांना कंप सुटतो. चरित्रविषय झालेल्या व्यक्तींच्याच जातीचे–रक्ताचे–नि संस्कृतीचे आपणहि समानभागी आहोंत ही जाणीव आपण वाचकांनीं जागृत ठेवली तर आपल्याहि मनांत त्यांच्याच तेजोगर्जनेचीं आंदोलनें प्रकट झाल्यावांचून खचित रहाणार नाहींत.

त्या तेजोगर्जनेचीं आंदोलनें हिंदुजातीय मनांत अुत्पन्न होअून तशाच किंबहुना त्याहूनहि प्रभावान् तेजस्वितेच्या दिव्य प्रकाशानें जगाचे नेत्र दिपवणारें प्रचंड सामर्थ्य हिंदुमनांत पुन्हां प्रकट होवो याच अिच्छेचा हा पहिला पदक्षेप आहे.

—लेखक

पुणें २.

# वीरा रत्ना मंजुषा

## महाराणी पुष्पवती

काठेवाडांत सध्यांच्या भावनगराजवळच कांहीं कोसाचे अंतरावर पूर्वी वल्लभीपुर म्हणून अेक प्रख्यात राजधानीचें नगर होतें. अेके काळीं प्रख्यात राजधानी असलेल्या त्या वल्लभीपुराचे कांहीं अवशेष त्या स्थळीं अद्याप दिसतात. साधारणतः १७०० वर्षांपूर्वी तेथें शिलादित्य नांवाचा अेक महान प्रतापी राजा राज्य करीत होता. पूर्वकाळीं आपला भारतवर्ष हा संपत्ति-समृद्धिपूर्ण होता. दारिद्र्यदुःखांचा येथें दुष्काळ असे. नि यामुळेंच या देशांत सोन्याचा धूर निघत आहे म्हणून परकीय लोक या देशाला सुवण-भूमि म्हणत असत. या सुवर्णभूमींतील संपत्तीकडे पाहून बाहेरच्या आधाशी आणि बुभुक्षित पुंडांच्या धाडी वारंवार येअू धावत असत. त्याचपैकीं अेका वेळीं पाश्चिमेकडून आलेल्या तत्कालीन अहिंदु जातीच्या आक्रमणाशीं मोठ्या हटातटानें या आपल्या वल्लभीपुरचा पराक्रमी राजा लढत होता. ८०३८

आपल्या हिंदुस्थान देशांत बुद्धाच्या केवळ व्यक्तीच्या कल्याणाकडेच सर्व लक्ष देण्याच्या अेकांगी नि म्हणून राष्ट्रविघातक शिकवणुकीमुळें व्यक्तीच्या स्वार्थासाठीं राष्ट्रघात होत आहे काय हें पहाण्याची राष्ट्रदृष्टि पुष्कळ प्रमाणांत सामान्य जनतेच्या मनांतून नष्ट होत चालली होती. या राष्ट्रदृष्टि-विहीन स्वार्थांध हीनतेमुळे आपल्या हिंदुजातीचें, हिंदुधर्माचें—अथवा थोडक्यांत म्हणावयाचें तर या आपल्या परमप्रिय हिंदुराष्ट्राचें अपरिमित घात जितके हिंदूंच्या हातून झाले आहेत तितके प्रत्यक्ष परकीय शत्रूंकडूनहि झाले असतील कीं नाहीं याची शंका वाटते. तीच गोष्ट या वेळींहि घडली. वल्लभीपुरच्या

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
८०३८
वर्ग............... क्रमांक...............

ऐक्या मंत्र्यानें हीन स्वार्थसाधन व्हावें म्हणून शत्रूला वल्लभीपुरच्या जलाशयांत विष कालवून देण्याला साह्य केलें. त्या विषारी पाण्यामुळें शिलादित्य महाराजांचे सैनिक पटापट मरूं लागले. समोर शत्रूंच्या हातांत जाऊन मरण-आंत विषारी पाण्यानें प्राणघात. केवळ शरण जाण्यावांचून जीव बचावणें शक्य नव्हतें.

मग, शरण जाऊन जीव वाचवावा असें कां त्यावेळीं वल्लभीपुरच्या निवासियांना वाटलें असावें बरें! शरण गेल्यानें गुराढोरांप्रमाणें वा पशुपक्ष्याप्रमाणें चारापाणी खायला मिळून हा देह कांहीं काल आणखी सजीव स्थितींत—चालता—बोलता राहील; पण आपला मान, आपलें तेज, आपली कीर्ति—यश—वैभव यांचें काय? आज नाहीं तर उद्यां पण मृत्यूच्या भक्षस्थानीं पडणारा हा रक्तामांसाचा देह वाचला तरी हिंदु जातीचा मान-तेज-यश, आपली कीर्ति—पराक्रम आणि स्वातंत्र्याचें वैभव यांना मरावें लागेल. शत्रूला शरण म्हणजे आपल्या राष्ट्रयशोदेहाचें मरण. मग या औटघटिकेच्या रक्तमांसमलदेहाचें मरण वाईट किंवा त्या चिरंजीवी महनीय यशोदेहाचें मरण वाईट! दुसरें असें कीं परशत्रूला शरण जाणें म्हणजे त्याचें दास्य स्वीकारणें होय. देवाचेंहि देवपद स्वतःच घेत "शिवोऽहम्" (मीच शिव) म्हणून घनगर्जना करणारा, देवाच्या स्वामित्वाचेंहि दास्य असहनीय होऊन परमस्वातंत्र्यभक्ति प्रकट करणारा आमचा हिंदु अंतरात्मा अहिंदूंना शरण जाऊन त्यांचा दास व्हावा? छे! हें कधींहि घडणार नाहीं. हिंदुमानसंरक्षक क्षत्रिय—राजपूत—मरण पत्करील पण 'शरण' म्हणणार नाहीं. आणि वल्लभीपुरच्या यशोप्राण शिलादित्यांनींहि शरण शब्द स्वप्नांतसुद्धां येऊं दिला नाहीं. सर्व सैनिकगण पुढें निश्चित वाढून ठेवलेल्या मरणाला—मारणाच्या, शत्रुसंहाराच्या अनुपानांत—स्वीकारते झाले. नगरांत राहून युक्तिप्रयुक्तीनें लढण्याचा मार्ग जलसंचय विषारी बनवला गेल्यामुळें अशक्य ठरला आणि विजय नाहीं पण कमींत कमी यशोरक्षणाचा ऐकमेव मार्ग म्हणून प्रत्येक क्षत्रियाची—राजापासून सामान्यांतील सामान्य पदाति सैनि-

काची–तरवार आपल्या कोशांतून झरकन् निघून शत्रूचे देहांत घुसत, शत्रुरक्ताचे धारातीर्थात स्नान करावयास अत्युत्सुक झाली. सर्व वीरगण शत्रूवर तुटून पडला. क्षत्रियांच्या तरवारींचें तिखट पाणी शत्रूंच्या प्राणांना हायहाय करावयाला लावून त्यांचा दाह करूं लागलें. परंतु व्यूहस्थित नि सुसज्ज अशा असंख्य शत्रुसमुदायापुढें नगरांतून बाहेर पडलेले, संरक्षणहीन, तहानेनें व्याकुल, विजयाची आशा नसल्यामुळें केवळ मारीत मारीत मरणाला सिद्ध झालेले हे वीर अेक अेक करीत धारातीर्थी गळूं लागले. शेवटीं महाराजा शिलादित्य आपल्या असामान्य पराक्रमाची पराकाष्ठा करीत आपला देह धराशायी करता झाला. आणि शत्रूला जय मिळाला. पण शत्रूलाहि तो जय फार महाग पडला.

महाराज शिलादित्याला पुष्कळ राण्या होत्या. त्यापैकीं महाराणी पुष्पवती व्यतिरिक्त सर्व महाराण्या श्रीशिलादित्याच्या हुतात्मदेहाबरोबर सती गेल्या. सती पुष्पवती गर्भवती होती. नि त्यामुळें तिला आपल्या सती जाण्याच्या अनिवार अिच्छेला आळा घालावा लागला. महाराणी पुष्पवती परमार वंशीय क्षत्रिय राजवंशांतील होती. वल्लभीपुरला जेव्हां हा रणप्रलय झाला तेव्हां ती तेथें नव्हती. राजाला पुत्रसंतान नव्हतें. आपण राजमाता व्हावें या प्रबल अिच्छेनें महाराणी पुष्पवतीनें श्रीभगवतीची आराधना पुष्कळ केली. आणि तिची आशा लवकरच सुफलित होअील अशी सुचिन्हें दिसूं लागलीं होतीं. त्यावेळीं ती पितृगेहीं गेली होती. कांहीं दिवसांनीं प्रसूतिकाळ जवळ जवळ येत चाललेला पाहून ती आपल्या राजधानीला यावयाला निघाली. परंतु दुर्भाग्यवशतः वाटेंतच ही सर्वस्वनाशाची दुर्वार्ता तिला समजली. ही वार्ता जणूं काय कोमल लतेवर वीज पडावी तद्वत् महाराणी पुष्पवतीच्या कर्णीं पडतांच ती शोकविव्हळ होअून तत्काळ मूर्च्छित झाली.

बरोबरचे अेका दासीनें पराकाष्ठेचे प्रयत्न केल्यावर महाराणी शुद्धीवर आल्या. परंतु पतिमृत्यूची कल्पना असहनीयशी होअून पुनः पुन्हां शोक-

विव्हलतेनें त्या अंग सोडूं लागल्या. आपण गर्भिणी आहेंत ही वास्तविक बहुकाल अिच्छित प्रिय गोष्टच तिला आज अेक महान् आपत्ति वाटूं लागली. महाराणी म्हणाल्या, ‘ माझी ही अवस्था आज माझ्या प्राणनिधान पतीच्या भेटीला मला अंतरवीत आहे. ’ आणि असें वारंवार म्हणत ती पुनःपुन्हा मुर्च्छाग्रस्त होऊं लागली.

पशुपक्ष्यापासून तों अत्युच्च मानवी प्राण्यापर्यंत अपत्यप्रेम ही अेक नैसर्गिकशी गोष्ट आहे. मनुष्यांमध्यें अपत्य प्रेमाप्रमाणेंच अितरहि संबंधांच्या भावना अुत्पन्न होअून प्रेमाचे पर्याय वाढले आहेत. परंतु सर्व प्राणिवर्गाला सर्वसामान्य असणारें अपत्यप्रेम हेंच अेकमेव प्रेमाचें स्वरूप निरपवादपणें सर्वत्र दृष्टीस पडतें. वाघीण किती क्रूर पशुकोटी आहे. वाघवाघिणीला कोमल मनोभाव जसे जन्मांत ठाअूक नाहींत पण अशा क्रूरतेच्या मूर्तिमंत अवतारालाहि अपत्यप्रेमानें लोण्याहून मृदुतरता आणलेली असतें. असें अपत्य प्रेम हें अेक अद्वितीय प्रेमस्वरूप आहे. अपत्यप्रेमाचें प्राणिमनावरील स्वामित्व हा निसर्गच. मनाचे जसे अितर कांहीं विकार नि भावना या अत्यंत निरपवादानें नैसर्गिक असल्यामुळें प्राणिमात्राच्या मनावर निरंकुश स्वामित्व गाजवितात त्याचप्रमाणें मातृमनावर कीडमुंगीपासून तों मनुष्यप्राण्यापर्यंत अपत्यप्रेम वर्चस्व गाजवीत असतें. असें प्रेमनिधान अपत्य नाहीं म्हणून महाराणीला शोक होत असे आणि त्यासाठीं श्रीभगवतीची आराधना त्या सतत करीत असत. अशा प्रकारें दुर्मिळ वाटणारें निधान प्राप्त होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें महाराणीमन अत्यंत हर्षोत्फुल्ल झालेलें; आणि आपल्या माहेरून घरीं जावयाला निघालेल्या स्थितींत तिला परचक्राचें आक्रमणांत श्रीशिलादित्य महाराज हुतात्मे झाल्याचें वृत्त समजलें नि तिच्या मनानें अशा सार्वभौम अपत्यप्रेमाच्याहि मोहापुढें न वाकतां पातिव्रत्याच्या अनुपम पतिनिष्ठेचे वेदीवर आपला देह बलिदान करण्यास ती सिद्ध झाली.

दासीनें बहुतप्रकारें समजूत घालण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या बलिदानानें अपत्यघात—अपत्यहत्या-होत आहे. महाराज श्रीशिलादित्याचा

वंशवेल तुटत आहे तेव्हां स्वतःसाठीं नसेल तरी अपत्यरक्षणार्थ आणि महाराजांच्या वंशविस्तारासाठीं तरी देहरक्षण करा अशी परोपरीनें विनंति केल्यावर महाराणीनें विचाराचा आश्रय करून आपली भावनावशता आवरून धरली आणि पुत्रजन्माची वाट पहात कोठें तरी सुरक्षित स्थळीं राहिलें पाहिजे म्हणून महाराणी आपल्या परिवारासह जवळ असलेल्या पर्वतमालेंतील अेका गुहेचा आश्रय करत्या झाल्या.

योग्यकाळीं महाराणी प्रसूत झाल्या नि त्यांना अिच्छेप्रमाणें पुत्रप्राप्ति झाली. पती जाअून बराच काल लोटलेला, दुःखाचा पहिला वेग ओसरण्याचा अपरिहार्य नियम आणि आतां तर प्रत्यक्ष पुत्रमुख दृष्टीस पडलेलें. साहजिकच पुत्ररक्षणार्थ म्हणून जर महाराणीनें प्राणधारण केलें असतें तर त्यांना कोणीहि बोल लावूं शकला नसता. परंतु महाराणीची पतिवियोगाच्या पहिल्या क्षणाचेवेळीं जी भावनाप्रबलता होती ती क्षणिक नव्हती. वियोगाच्या पहिल्या धक्यानें आंदोलित झालेलें अेखादें हृदय असतें तर मागाहून तो भावनापूर ओसरून स्वतःसाठीं नाहीं तरी अपत्यरक्षणार्थ नि संगोपनार्थ जीवनधारण अवश्यक वाटणें अगदी स्वाभाविक झालें असतें. परंतु महाराणी केवळ भावनाप्रबलच नव्हत्या तर त्यांची निष्ठा पराकोटीला पोचलेली होती.

पुत्रप्राप्तीनंतर महाराणीनें पुत्ररक्षणाची सोय बघितली. जवळच अेका गांवीं श्रीकमलावती नांवाची अेक ब्राम्हणकुमारी रहात होती. आपल्या पुत्राला—श्रीभगवतीची आराधना करून महाप्रयासानें प्राप्त झालेल्या अपत्य-रत्नाला—महाराणीनें त्या ब्राम्हणकुमारीच्या ओटींत घातलें. आणि महाराणी म्हणतात “ ताअी ! माझें प्राणधन, माझा हा नवकुमार, मी तुझ्या ओटींत घालीत आहे. गर्भात मातेचें संरक्षण याला मिळालें. जन्मानंतर याचें संरक्षण आतां तुझ्या हातीं सोपवित आहे. यापुढें याची माता तूं हो—नव्हे, झालीस. याचें आपल्या पुत्राप्रमाणें लालन पालन कर, याला अुचित नि योग्य शिक्षण दे आणि मोठा झाल्यावर कोण्या योग्य क्षत्रिय कुमारीशीं

याचा विवाह लावून दे. मी जाते. माझे पतिदेव–माझे पंचप्राण, माझी स्वर्गात वाट पहात असतील. मी निश्चितमनें जाअू ना ?"

हा प्रसंग किती महागंभीर नि करुणा अुत्पन्न करणारा असेल बरें ! नुकतेंच जन्मलेलें बालक अेक माता अत्यंत विश्वस्ततेनें अेका ब्राम्हण कुमारीच्या ओटींत घालीत आहे. दुसरीकडे त्या मातेच्या सहगमनाची सिद्धता होत आहे–सहगमनार्थ महाराणीच्या आज्ञेने चिता रचली जात आहे. अेक अनाथ दीन बालक मातृहीन होअून धर्माच्या मातेकडे रक्षणार्थ सोपविला जात आहे, पतिवियोग सहन होत नसलेली महाराणी ब्राम्हण कुमारीचें अपत्यरक्षणार्थ अभिवचन घ्यावयास अुतावीळ झालेली आहे, ब्राम्हणकुमारीचें मन आपल्यावर येणाऱ्या थोर कर्तव्याच्या संकटमय दायित्वाच्या भारानें गांभीर्य धारण करून पुत्ररक्षणाचें अभिवचन दृढनिश्चयानें देत आहे, आणि हें अेका ब्राम्हणकुमारीचें धर्माला स्मरून पुत्ररक्षणाचें निश्चयी अभिवचन मिळतांच चिंताविमुक्त होत्साती हर्षभरानें स्वर्गी अत्यंत अुत्सुकतेनें आपली वाट पहात बसलेले महाराज शिलादित्य जणूं प्रत्यक्षच दिसत आहेत अशा भावोन्मत्त अनिमिष अूर्ध्वदृष्टीनें जगाचें भान सुटत चाललेली महाराणीमूर्ति दृढपदानें चितेकडे जात आहे ! हें दृश्य डोळे मिटून मनाच्या कुंचलीनें हृदयाच्या चिन्मय पटावर जिवंतपणें रंगवितां येणें, हे वाचकमना, तुला शक्य आहे कां ? बघ, प्रयत्न करून पहा ! सामान्य जगांतील सामान्य दिनक्रमांमध्यें सामान्य विकारविचारांच्या रुक्षशा वातावरणांतून तुला काढून अुपरोक्त चित्र सजीव पावित्र्याच्या रम्य भावराज्यांत क्षणभर तरी तुला गोड गांभीर्याची दैवी गोडी चाखविल्यावाचून खचित राहणार नाहीं.

चित्रांत पुढें काय दिसेल बरें ! आणखी काय दिसणार ! अितिहासामध्यें त्या साध्वी महाराणी त्या सुदीप्तपणें भडकलेल्या चितेंत अुडी घेत ज्वालांच्या लटेबरोबर आकाशांत भरारी मारून आपल्या चिन्मयरूपानें पतिरूपीं मिळून गेल्या हेंच दृश्य तुला तुझ्या मिटल्या डोळ्यामागील कल्पना-

शक्तीच्या अुघडत्या भावदृष्टीलाही दिसेल. रहा! तेथेंच कांहीं क्षण स्थिर रहा, आणि त्या मूर्तिमंत पावित्र्याच्या भावराज्यांतील पावित्र्याचें, ध्येयनिष्ठेचें, प्रचंड अिच्छासामर्थ्याचें जें कांहीं पवित्र तुषार भावनाकल्पनेच्या प्रमाणांत तुला तुझ्यावर जितके घेतां येतील–मिळतील–तितके घे.

धन्य तो वंश, धन्यतर ती जाती आणि धन्यतम तें राष्ट्र कीं जेथें मातृपदीं अशा प्रचंड अिच्छा नि निष्ठासामर्थ्याच्या माता निर्माण होतात. जन्मताच ज्याचे मातेनें आपल्या पतिनिष्ठेसाठीं अग्निप्रवेश करून आपली महदात्मता सिद्ध केली तो कुमार अितिहासप्रसिद्ध वीरवरांना जन्म देणाऱ्या अुदेपुरच्या महाराणा वंशाचा मूळ पुरुष ठरला. असल्या मातांच्या पोटीं अशा वीरभूषित वंशाला जन्म देणारेच निपजावयाचे. सोन्याच्या खाणींतील टाकाअू मातीसुद्धां सोन्याचे कांहीं गुण प्रकट करते मग तेथें सोनें निर्माण होते यांत काय आश्चर्य?

# हुतात्मा दाहीरच्या सूडघेत्या–वीरकन्या

अिसवी सनाच्या ८ वे शतकाचे आरंभीं बगदादच्या मुसलमानांचे खलिफाच्या आज्ञेनें मीर कासीम नामक त्याच्या सेनापतीने सिंधवर आक्रमण केलें. या आक्रमणाच्या अितिहासांत हिंदूंना शिकण्यासारखें पुष्कळ आहे. पण त्या आक्रमणाचा साग्र वृत्तांत देणें हें आपल्या चरित्रकथनाच्या क्षेत्रांत येण्यासारखें नसल्यामुळें तो भाग सोडून द्यावा लागत आहे. आणि तरीहि जातां जातां पूर्वकालापासून तों आतांच्या क्षणापर्यंत दिसून येणारी अेक विशेष गोष्ट येथें अुल्लेखून गेल्यावाचून रहावत नाहीं. बाहेरील बुभुक्षित भुतावळींची धाड आज साधारणतः कमी अधिक मानाने १३।१४ शें वर्षांपासून येअून हिंदूंवर आदळत आहे. प्रत्येक वेळीं प्रत्यक्ष संकट येअून दार ठोठावूं लागलें म्हणजे आम्ही हिंदू जागे होत असतो, नि तेवढें संकट

कसें तरी दूर झालें म्हणजे पुन्हां निर्भयतेच्या मानीव गुंगींत झिंगत पडत असतो. जगांतील अितर आक्रमक गिधाडी वृत्तीचे जातींच्या लहानमोठ्या सर्व हालचालींकडे लक्ष ठेवून संकटाची पूर्वसूचना जाणीत संकटाचा अंकूर अुद्भवण्यापूर्वींच, गर्भांतच, त्याचा नायनाट करण्याची आवश्यकता त्यांना कधींच जाणवली नाहीं. अद्यापहि हिंदुस्थानांत तीच आत्मघाती खोड हिंदुसमाजाच्या हाडीमासीं खिळून गेलेली दृष्टीस पडत आहे. परजातीय कपटें, घातपात वृत्ति, आक्रमणाचीं कौटाळें, विश्वासघाताचे डाव, हिंदुहित-विघातक पेचापेची, आणि हिंदुजाती विध्वंसक कारस्थानें अगदीं गळीं येअून भिडेपर्यंत त्यांना दिसतच नाहींत—कोणी दाखवून देअूं लागला तरी त्यालाच दोषी वा मूर्ख ठरवीत शहाणपणाचा आव आणून मूर्खधुंदींत निर्भयता मानण्याकडेच हिंदुमनोवृत्ति अद्याप प्रवृत्त असलेली सर्वत्र दिसून येत असते.

तसेंच यावेळीं घडलें. मीर कासीम दाहीर राजाच्या राशीस लागण्याकरतां बगदादच्या खलिफाकडून नियुक्त झाला; दाहीरच्या गांवीं नाहीं. सैन्य घेअून सिंधवर आक्रमण करण्याकरितां चालूं लागला, तरी दाहीरला ठाअूक नाहीं—वा कळलें असलें तर ‘आल्यावर पाहून घेअूं’च्या आत्मघाती धुंदींत त्याची चिंता वाटली नाहीं. अगदीं दार ठोठावलें. तेव्हां दाहीर राजानें आपल्या वीरवृत्त सेनेसह मीर कासीमशीं घोर संग्राम केला. पण हिंदूमधील बौद्ध-जैन पंथांतील फाजील अहिंसेचें स्तोम माजविणाऱ्या मूर्ख अहिंसकांनीं आक्रमणकर्त्या नि हिंसामूर्ति मीर कासीमला तोंड देअून त्याला त्याच्या परस्वापहारी हिंसेसाठीं प्रायश्चित्त देण्याचे स्थळीं आपल्याच राजाचे पाय मागें ओढावयाला प्रारंभ केला. राजा लढतो म्हणून हिंसा घडते. राजाला युद्ध करूं न देण्यानें हिंसा टळेल, ही त्यांची कुजकी बुद्धि. राजा बिचारा आपल्या जातीच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या रक्षणार्थ मरण वा मारणाच्या प्रतिज्ञादृढतेनें रणांत झुंजत असतां मागें आमचे हिंदु—अहिंसेच्या मूर्ख नि

विपर्यस्त स्वरूपाच्या कल्पनेनें मूढ झालेले बौद्ध जैनपंथीय हिंदु–मीर कासीमला राजधानीचे दरवाजे अुघडे करून आंत घेण्यास सिद्ध झाले.

वीरवर दाहीर राजा आपल्या सेनेसह देशधर्मार्थ रणीं धारातीर्थी हुतात्मा झाला. त्याची सेनाहि नष्ट झाली. त्यांनीं आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली. भीरुतेचा कालिमा हिंदुजातीच्या तोंडाला त्यांनीं किंचित्सुद्धां लागूं दिला नाहीं. पण प्रजेमधील लोकांनीं पाठपुरावा करून आपल्या देशाच्या–धर्माच्या–राष्ट्राच्या शत्रूंचा सूड घेण्याचा प्रयत्न करावयाचा. पण!! आमचा अहिंसाधर्म आडवा आला. अेके स्थळीं वत्सराज म्हणून दाहीर राजाच्या अधिकाऱ्यानें तोंड द्यावयाचें ठरविलें पण त्यालाहि यश आलें नाहीं. बौद्धजैनपंथी हिंदूंनीं मीरकासीमचें ढोलगीं बडवीत आणि पावे वाजवीत स्वागत केलें. दाहीर राजा हुतात्मा झाला नि हिंदूंना अपयश आलें म्हणून १००० ब्राम्हणांनीं सक्षौर प्रायश्चित्त घेतलें–पण प्रतिकाराला पुढें झाले नाहींत. मीरकासीमनें मात्र स्थळोस्थळीं अुग्र रूप धारण करीत लोकांची शाका (कत्तल–भाजीसारखी कापाकापी) चालविली. आबालवृद्ध हिंदु लोकांना दावणीला अुभे करावयाचे नि तरवारीनें त्यांचीं मस्तकें अुडवावयाचीं असा क्रूरतेचा देखावा जेथें तो गेला तेथें तेथें निर्माण होअूं लागला. " महाराज, वाचवा–दया करा " अशा दीनतेच्या हिंदू किंकाळ्यांना " मला दया करण्याची धर्माज्ञा नाहीं–कत्तलीची आज्ञा आहे, " असें म्हणून निशस्त्र नि निरपराधी अशा हजारो हिंदूंना त्या क्रूर नराधमानें कंठस्नान घातलें. दाहीर राजाचें राज्य घेतलें; हजारो निरपराध लोकांची सरसहा शाका केली. आणि हिंदूंना 'दे माय धरणी ठाय' करून सोडलें.

दाहीरच्या अनुपम सौंदर्यवान् दोन मुली पकडून त्या भेट म्हणून मीरकासीमनें खलीफाकडे पाठविल्या. त्या दोन कुमारी सर्वस्वी असहाय्य स्थितींत शत्रूंच्या हातीं सांपडल्या. सिंधच्या दाहीर राजाच्या कन्या यावेळीं मनाच्या कशा प्रकारच्या क्षुब्ध स्थितींत असतील याची कल्पना करणेंहि

कठिण. ज्यांचा राजपिता आपल्या सैन्यासह धारातीर्थी पतन पावलेला, सर्व राज्य शत्रूंच्या हातीं सांपडलेलें, राज्यांतील प्रजाजन हिंस्र नि क्रूर मीर कासीमच्या अत्याचारानें अत्यंत पीडित झालेले, या दोन राजकन्यांचे दुःखाश्रु पुसण्यास कोणीहि जवळ नाहीं, सहानुभूति देण्यास अखादा प्राणीसुद्धां आसपास नाहीं, आणि स्वतः नराधम शत्रूंच्या हातीं गवसलेल्या आणि तो शत्रूहि कसा, मानवी मनाच्या कोमल, पवित्र, अुच्चतर भावनांची ओळखही ज्याला नाहीं नि ज्याच्या विकाराला बळी पडण्यानें आपली जाति–धर्म नि सतीत्व या प्राणाहूनहि मूल्यवान् आणि जिवापेक्षांहि प्रिय असलेल्या ध्येयाचा–निष्ठेचा, नि पावित्र्याचा निश्चित नाश होण्याचा दुर्धर प्रसंग आणणारा निर्दय राक्षसी शत्रू. अशा शत्रूंच्या हातीं सांपडून कोणत्याही प्रकारें सुटकेची आशा न अुरलेल्या त्या दोन राजकन्यांच्या मनाची कशी दयनीय स्थिति झाली असेल!!

पण त्या वीरकन्या होत्या. जसजसें संकटाचें स्वरूप अुग्रतर होत जातें तसतसें वीरवृत्त मन अधिकाधिक प्रखर निश्चयानें त्या संकटांना तुच्छ करीत त्यांना अविचलतेनें तोंड देण्यास सिद्ध होत असतें. या दोन वीरवृत्त कन्यांचेहि मनानें ठाव सोडला नाहीं. आपल्या धर्माचें पावित्र्य, जातीची अुच्चता, सतीत्वाचें महनीयत्व अक्षुण्ण ठेवण्याचा त्यांचा निश्चयहि प्रखरतम स्वरूप धारण करूं लागला.

त्या मुली खलीफाकडे नेल्या गेल्या. खलीफाला त्याच्या कुराणानें वर्णिलेला बहिस्त (अल्लाच्या घरचें विलासभोग भोगण्याचें स्थल) येथेंच अवतरला की काय असें वाटूं लागलें. हिंदुस्थानच्या अलोट संपत्तीच्या वार्तेनें तोंडाला पाणी सुटलेल्या टोळधाडींच्यापैकीं अेका जातीचा हा प्रमुख खलिफा सिंधविजयाच्या वार्तेनें आधींच फुलून गेलेला, दाहीर राजाच्या दोन कन्या 'अिमानदार सेनापतीनें' भेट म्हणून पाठविल्या असल्यामुळें प्रसन्नचित्त झालेला; त्या अनुपम सौंदर्यवान् आहेत हें कळल्यानें

तर स्वतः ‘ मी बहिस्तांतच आहे ’ असें मानूं लागलेल्या त्या खलीफानें त्या दोघी वीरकन्यांना आपल्यापुढें आपल्या महालांत आणविलें.

८०३२

प्रत्येक क्षत्रिय–स्त्रीजवळ कट्यार-जंबिया वा तत्सम शस्त्र सतत असावयाचें असा जणूं नियमच होअून गेलेला होता. खलीफाकडे नेल्या जाणाऱ्या या दोन वीर कन्यांजवळ तशींच दोन शस्त्रें होतीं. अत्यंत तीव्रतम निराशेच्या परिस्थितींत त्यांनीं आत्महत्येचें कृत्य केव्हांहि अुरकून घेतलें असतें. पण त्यांच्यांत जाति-धर्म नि सतीत्व या पावित्र्यत्रयीबरोबरच अदम्य वीरवृत्तीहि होती. ज्यानें त्यांच्या पित्याच्या राज्यावर आक्रमण केलें, ज्याच्यामुळें आपला राजपिता ससैन्य हुतात्मा झाला, राज्य गेलें, ज्यानें सर्व राज्यभर धुमाकूळ माजवून हजारो निरपराधी लोकांची शाका करीत रक्तपिपासूपणाची राक्षसी वृत्ति प्रकट केली, त्या नराधमाला त्याचें शक्य तर प्राणान्त प्रायश्चित्त मिळावें–असल्या सर्वस्वी असहाय्य परिस्थितींतही आपल्या सर्वस्वनाशाला कारणीभूत झालेल्या त्या दुष्ट राक्षसाचा-मीरकासीमचा सूड घ्यावा ही प्रबल अिच्छा त्यांच्या मनांत अग्नीसारखी धुमसत होती. मीरकासीम अेका मोठ्या सैन्याचा अधिपति या नात्यानें हिंदुस्थानांतील सिंध प्रांतांत विजयाच्या गर्वानें स्वतःला निर्भय मानीत राहिलेला. आणि अिराणच्या पलीकडे बगदाद नगरांत खलीफाला भेट म्हणून पाठविल्या गेलेल्या बंदी स्थितींत या दोन वीरबाला असहाय्य स्थितींत असलेल्या. दोघांमध्यें भौगोलिक अंतर शेकडो कोसांचें, वस्तुस्थितीचें अंतर तर अेक आकाशांत तर दुसरा पाताळांत असल्यासारखें, तो ससैन्य विजयी सेनापती तर या दोन निस्सहाय वीरबाला खलीफाच्या घरीं त्याच्या भक्ष्यस्थानीं पडूं घातलेल्या बंदी. अशा स्थितींत सूडाची अिच्छा कशी सफल व्हावयाची !

पण त्या वीरबालांनीं अेक युक्ति शोधून काढली. त्यांना जेव्हां खलिफाच्या विषयी तृष्णेला बळी देण्यासाठीं खलीफापुढें त्याच्या आज्ञेवरून

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

आणल्या तेव्हां त्या दोघींनींहि अश्रु गाळावयाला आरंभ केला. खलीफाला हिंदूंच्या धार्मिक नि जातीय पावित्र्याच्या कल्पनांची साधारण माहिती होती. त्याला वाटलें आपलें धर्मादिक नष्ट होऊन आपण बाटूं या कल्पनेनें या रडत असाव्यात. त्यानें त्या दोघींना सांत्वनपर बोलत वश करण्याची भाषा आरंभिली. तेव्हां त्यांतील थोरली बहिण म्हणते, " महाराज ! आपण आम्हाला स्पर्शहि करूं नका. कारण आम्ही दोघीहि तुमच्या स्पर्शाला पात्र राहिलों नाहीं. त्या नीच कासीमनें आम्हां दोघींनांहि भ्रष्ट केलेलें आहे नि मग त्यांनीं आम्हाला तुमच्याकडे पाठविलें आहे. " हें ऐकतांच सर्व दृश्य तत्काळ बदललें.

आपल्या सेनापतीनें आपला घोर अपराध केला आहे असें वाटून त्या खलीफाला सूडाच्या कल्पनेनें पूर्णपणें ग्रासून टाकलें. त्या दोघा वीर-बालांना त्यानें आपल्या अंतःपुरांत परत पाठविलें. ' मीरकासीमचा सूड प्रथम ' असें ठरवून " पशूच्या ताज्या व दुर्गंधीयुक्त ओल्या कातड्यांच्या पिशवींत बांधून मीरकासीमला मजपुढें आणा " म्हणून त्याची आज्ञा सुटली.

आपल्या शस्त्रानें निरपराधी लोकांचे बळी घेणारा मीरकासीम खली-फाज्ञेनें दुर्गंधयुक्त अशा पशूच्या ताज्या कातडींच्या थैलींत बांधला जाऊन खलिफाकडे पाठवला गेला. या दोन वीरबालाहि तेथेंच होत्या. खलीफानें त्याला हालहाल करून ठार मारलें, नि याप्रमाणें त्या वीरबालांनीं सूडबुद्धीनें खलीफाच्या मनांत पेटविलेल्या क्रोधाग्नीच्या ज्वालेंत मीरकासीम होरपळला जाऊन आपल्या प्राणास मुकला. वीर मनें शत्रूचा सूड परस्पर उगाविल्यानें संतुष्ट होत नसतात. स्वतः आपल्या हातानें शत्रूच्या गळ्याचा घोट घेण्यानेंच कदाचित् वीरवृत्तीच्या सूडबुद्धीला समाधान वाटूं शकतें. त्या वीरबालांच्या वीरमनांना या परस्पर दुसऱ्याचे हातून मीर कासीमच्या आलेल्या मृत्यूमुळें नि त्याला मिळालेल्या या प्रायश्चित्तानें समाधान झालें नाहीं. त्यांचीं वीरमनें उसळून बाहेर पडूं लागलीं. या मर्त्य जगांत त्या

मीरकासीमचा सूड आपल्या हातानें घेतां आला नाहीं म्हणूनच जणूं काय तीं त्या वीरकन्यांचीं दोन वीरमनें अत्यंत क्षुब्ध होऊन आपल्या स्वाधीन देहांच्या हातांना आपापल्या समोर असलेल्या दोघींच्या शरीरांना चिरून "आम्हांला मोकळे करा" अशी जणूं काय आज्ञाच देतीं झालीं. तिकडे मीरकासीमचा पापात्मा मीरकासीमचा देह सोडून बाहेर पडला असेल नसेल तोंच त्याचा पाठलाग करीत प्रत्यक्ष आपल्याला स्वतः सूड घेतां यावा म्हणून या वीरबालांच्या हातांनीं त्यांच्या मनांची आज्ञा शिरसावंद्य मानीत एकमेकीच्या देहांत त्यांच्या जवळील खंजीर खुपसले आणि दोघींचेहि वीरात्मे बंदींत सांपडलेल्या आपल्या असमर्थशा जड देहांना मृतावस्थेंत ढकलून देऊन सूडाच्या गर्जना करीत त्या मीरकासीमच्या पळत्या पापात्म्याच्या मागें धावले. त्या दोघां वीरबालांचे देह तेथें राहिले. त्यांचे वीरात्मे मीरकासीमच्या पापात्म्याला यथार्थ दंड देऊन हुतात्मतेच्या स्वर्गी धन्यवाद घेत प्रवेश करते झाले. या दोघां वीरकन्यांनीं हिंदुजातीय वीरमनें चिडवलीं गेलीं तर कसल्याहि असहाय्य नि दीन परिस्थितींत देश–धर्म–राष्ट्रशत्रूंचा सूड अुगवल्यावाचून कशीं रहात नाहींत हेंच जणूं सिद्ध करून दाखवलें.

हिंदूजातीय मान-पावित्र्य-धन्यता अक्षुण्ण ठेवीत शत्रूचा सूड अुगवून आपला जन्म सार्थकीं लावणाऱ्या या दोन्ही वीरकन्यकांना शतवार–सहस्रवार वंदना असो. धन्य तो वंश–धन्य ती जाती कीं ज्यांच्या कुसव्यांत असले धन्यात्मे प्रकट होतात.

# समरभवानी श्रीकर्मदेवी

पांडवांच्या हस्तिनापुरांतील शेवटचा भारतीय क्षत्रियहीरक महाराज पृथ्वीराज हिंदुस्थानांतील हिंदुजातीच्या अंगीं प्रकट झालेल्या राष्ट्रघाती घरभेदी-पणाला बळी पडला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसूर्याचें अस्ताचलावरील मावळतें आरक्त सूर्यबिंब पारतंत्र्याच्या अंधकारानें जणूं ग्रासून टाकलें. ज्या दुर्दिनीं या अंतिम क्षत्रिय रत्नाला भारतदेश आंचवला त्या दिवसापासून भारताच्या भाग्यसूर्यावरील पारतंत्र्यराहूची छाया पूर्णपणें नाहींशीं होण्याचा सुदिन अद्यापपर्यंत अुगवला नाहीं. आज जवळ जवळ हजार वर्षें होत येतील; भारताचें मुख पूर्णस्वातंत्र्यतेजानें अुज्वल होअूं शकलें नाहीं. भारताचें स्वातंत्र्य दुर्भाग्यानें छिनावले गेलें पण भारतीय रक्ताच्या बिंदुबिंदूंतून स्वातंत्र्य-भक्तीची दिव्य शक्ति अद्याप पूर्णतेजानें झळकत नि चमकत राहिली आहे. आणि जोंपर्यंत ही निस्सीम स्वातंत्र्यभक्ति भारताच्या प्रत्येक रक्तबिंदूंतून प्रकट होअूं धावत आहे तोंपर्यंत भारताला आपल्यावरील पारतंत्र्याच्या काळ्या छायेची भीति मुळींच वाटावयाला नको. केवल त्या शक्तीला कार्यक्षम करण्याचाच काय तो अवकाश तो स्वातंत्र्यसूर्य पुन्हां भाग्याचलावर अुदित झाल्यावाचून कधींहि राहणार नाही.

पारतंत्र्याच्या पाशांत अडकलेल्या राष्ट्रांतून ज्यावेळीं वीरता नि पराक्रम ही लुप्त होतात त्यावेळीं पारतंत्र्यानें राष्ट्राचा खरा प्राण हरण केला असें होतें. संपत्ति आणि विपत्ति हीं येतात नि जातात. पण संपत्तिला दासी करण्याचें सामर्थ्य असणारी आणि विपत्तीच्या छातीवर चढून तिच्या नरडीचा घोट घेणारी वीरता राष्ट्राच्या जिवंतपणाची, तेजस्वितेची नि पुनःस्वातंत्र्यप्राप्तीची हमी आहे. हिंदुस्थानचा सम्राट महाराजा पृथ्वीराज अनेक भारतीय वीरवरां-सह हिंदुंच्याच घरभेदीपणाच्या विश्वासघाती विषानें रणशायी केल्यानंतर हिंदुस्थानचा जीव घोटूं धावणारी मुसलमानी धाड सर्व हिंदुस्थानभर निर्वीर·

भूमि झाली अशा भ्रमानें धावत सुटत होती. परंतु भारताची प्रत्येक पिढी या परकीय आक्रमणाच्या गिधाडी भुतावळीशीं प्राणपणानें झुंजत, लढत, झगडत राहिली. केवळ संयुक्ततेनें, अेका वेळीं युगपद रीतीनें सर्व हिंदुजाति मिळून अेकत्रितपणें लढली नाहीं नि म्हणून पारतंत्र्याचा डाग धुतला जाअूं शकला नाहीं. पराक्रम वा वीरता नव्हती म्हणून नव्हे.

महाराज पृथ्वीराज आक्रमणकारी महमद घोरीशीं जेव्हां युद्धार्थ सिद्ध झाले त्यावेळीं त्यांचे परममित्र नि मेव्हणे महाराणा समरसिंह हे आपल्या असीम पराक्रमी सेनेसह पृथ्वीराजाच्या साह्यार्थ गेले. महाराणा समरसिंह त्या कालचे राजर्षि होते. राज्यासनावर असूनहि विदेही जनक राजाप्रमाणें विरक्तपणें राज्यकारभार पहात होते. अुदेपूरचे महाराणे आपल्याला श्रीशंकराचे प्रधान समजतात. श्रीशंकर राज्याचे धनी. राज्य देवाचे. आणि भगवंतांनीं नियुक्त केल्यामुळें त्यांचे प्रतिनिधि म्हणून देवादेश समजून धर्मन्यायानें प्रजापालनाचें कर्तव्य करण्यासाठीं राज्यकारभार बघावयाचा अशा मनोवृतीच्या पायावर अुदेपुरचें राजघराणें राज्यासनावर बसण्याचा विधि आहे. महाराणा समरसिंह खरोखर या मनोवृत्तीनेंच राज्यधुरा धारण करून कर्तव्यपालनरूप धर्मसेवा करीत होते. राज्यासनावर बसण्याचे वेळाव्यतिरिक्त बाकी वेळीं ते बहुतेक काल रक्तवस्त्र परिधान केलेले नि विभूति चर्चिलेले असे महामुनीप्रमाणें व्यवहारत असत. महाराज पृथ्वीराजानें जितके वेळीं महमदघोरी आला तितक्या वेळीं अितर राजपूत राजे आणि विशेषतः महाराणा समरसिंह यांच्या साह्याचे बळावर त्याला पिटाळून लावला. त्याला पकडावें नि त्यानें शरण म्हटलें कीं पुन्हां शरणाला मरण देअूं नये ही आर्यनीति ध्यानांत धरून महाराजा पृथ्वीराजानें त्याला सोडून द्यावें. सापाला केव्हाहि सोडूं नये. कारण तो कितीहि दीन दुबळा झाला तरी वेळ येतांच विषारी दंख मारून प्राणघाती होण्याला चुकत नाहीं. हें अनुभवी सत्य आर्यांना ठाअूक होतें. पण माणसांतहि साप असतात—माणसांतही विश्वासघात हाच ज्यांचा स्वभाव अशा प्राण्यांचा

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
८०३२
नों.......... क्रमांक..........

समुदाय असतो हें हिंदूंच्या अनुभवास आलें नव्हतें. तो अनुभव मुसलमानांच्या हिंदुस्थानांतील आगमनापासून आजपर्यंत सारखा हिंदूंना मिळत आहे; आणि तरीहि परक्यानें जरा गोड बोलून विश्वासुकपणाचा बहाणा केला पुरें कीं हिंदु भाळलाच म्हणून समजावें, अितका हिंदूंचा स्वभाव पूर्वीच्या हजारों वर्षांच्या अेकरूपी अनुभवाच्या प्रवाहानें पक्का विश्वासप्रिय बनून गेला आहे. हजार वर्षांच्या परकीयांच्या विश्वासभंगानें हिंदूंच्या धर्माची, जातीची, अखिल राष्ट्राची सारखी हानि होत असल्याचा अनुभव निरपवादपणें वारंवार येत असून सुद्धां अद्याप हिंदूंचा दुसऱ्यावर–परक्यावर विशेषतः–चटकन् विश्वास बसतो अशी स्थिति आजहि आहे. मग महारज पृथ्वीराजा त्यावेळीं महमद घोरीच्या विश्वासघाती स्वभावाला ओळखूं शकले नाहींत यांत काय आश्चर्य ?

या शेवटच्या वेळीं महम्मद घोरी विशेष सिद्धता करून आला अितकेंच नव्हे तर हिंदुराजांपैकीं राष्ट्रद्रोही कांहीं घरभेद्यांचेंहि पाठबळ त्याला मिळालें. महाराज पृथ्वीराज महम्मद घोरीच्या हातीं सांपडले आणि या शेवटच्या युद्धांत महाराणा समरसिंह रणांत देशशत्रूला मारीत मारीत शत्रुरक्तगंगेत हौतात्म्याचें स्नान करून हुतात्मतेच्या दिव्य स्वर्गी निघून गेले.

त्या महान वीरवर समरसिंहाच्या धर्मपत्नी महाराणी कर्मदेवी ह्या होत. महाराणा ज्या वेळीं दिल्लीला जावयाला निघाले त्यावेळीं त्यांनीं अल्पवयी राजकुमार कर्णसिंह यांना सिंहासनाधिष्ठित केलें आणि श्रीकर्मदेवीजी यांचे हातीं कुमाराच्या अजाणपणासाठीं राज्यभार सोपवून ते दिल्लीस प्रयाण करते झाले. पट्टणच्या पराक्रमी राजकुलांत श्रीकर्मदेवींचा जन्म झालेला–वीरकुलावतंस पुरुष ज्या कुलांत सतत जन्म घेतात त्या महाराणा वंशांतील वीरश्रेष्ठ समरसिंहाशी यांचा विवाह झालेला–वीरकुलांत जन्म घेतला, वीरकुलांतच विवाहबद्ध झाल्या अितकेंच नव्हे तर या स्वतः वीरवरा होत्या. त्या जशा वीरकन्या, नि वीरपत्नी होत्या त्याचप्रमाणें स्वतः वीरनारी होत्या. अल्पवयी कुमार राज्यावर आणि राज्यसूत्रें श्रीकर्मदेवी महाराणीच्या हातांत. त्या जशा शूर नि पराक्रमी होत्या त्याचप्रमाणें राजकार्यधुरंधरहि होत्या.

आपल्या वीरप्रसवशील पितृकुलाला आणि पतिकुलाला शोभेल अशा प्रकारें राज्यकारभार त्या चालवीत होत्या. महाराज पृथ्वीराज यांचा नाश झाल्यापासून दिल्ली मुसलमानांचे हातीं गेली. कांहीं काळानें महम्मद घोरीच्या मृत्यूनंतर दिल्ली नि आसपासच्या प्रदेशाचा कारभार पाहण्यासाठीं नेमलेला कुतुबुद्दीन यांनें आपल्याला राजा म्हणून प्रसिद्ध केलें. हाच गुलाम घराण्याचा पहिला राजा झाला. दिल्लीच्या मुसलमान बादशहांच्या मनांतील अखिल हिंदुस्थानच्या बादशाहीची लालसा त्यांना स्वस्थ बसूं देत नव्हती. तीच लालसा कुतुबुद्दीनच्या मनांतही वसत होती. परंतु या लालसातृप्तीसाठीं हिंदुस्थानांतील पराक्रमी हिंदु राजांशीं लढल्यावाचून त्यांना गत्यंतर नव्हतें. अुदेपूरचें राज्य हें अत्यंत प्रमुख असल्यामुळें या राज्यावर आक्रमण करीत तें धुळीला मिळविण्याचा मानस धरून अनेक दिल्लीच्या बादशहांनीं अुदेपूरवर चढाया केल्या आहेत. त्यांतील कुतुबुद्दीनाची जवळ जवळ पहिली चढाअी होय.

कुतुबुद्दीननें अुदेपूर राज्यावर चढाअीचें रणशृंग फुंकलें. कारण अुदेपूरचा सिंहपराक्रमी समरसिंह महाराणा महंमद घोरीशीं झालेल्या शेवटच्या रणांत हत झालेला त्यानें पाहिला होता. आतां राज्यावर अेक अल्पवयस्क राजा असून राज्यकारभार अेका अबलेचे हातीं आहे तेव्हां चढाअी करावयाला कांहीं चिंता नाहीं असें त्याला वाटलें. सिंहीण ही अबला असली तरी शेकडो कोल्ह्यांना फाडून काढण्यासाठीं ती अबला नसून सबला ठरते हें कुतुबुद्दीनच्या ध्यानींमनींहि नव्हतें. मोठ्या सिद्धतेनें विपुल सेनेसह कुतुबुद्दीनची अुदेपूरवर चढाअी झाली. दिल्लीचा कुतुबुद्दीन आपल्या राज्यावर चढाअी करून येत आहे हें महाराणी कर्मदेवीला कळतांच तिची तळव्याची आग मस्तकाला जाअून भिडली. महाराणीच्या मनांतील महाराणा समरसिंहाच्या शत्रुपक्षियांवर अुगवावयाच्या सूडानें कृतान्त आरोळी ठोकली. आपल्या देशाधर्माचे, आपल्या हिंदु राष्ट्राचे घातकारी आणि आपल्या

प्राणाहूनहि प्रिय पतिदेवाच्या मृत्यूस कारण झालेल्या या मुसलमानांचा केव्हां घोट घेअीन असें वाटून त्यांची वीरवृत्ति अधीर होअून चवताळली. त्यांनीं आपल्या सैन्याची सिद्धता केली, आपल्या सामंतांना बोलावून त्यांना प्रोत्साहित केलें, आणि सर्वांच्या अंगीं वीरावेश चढवून त्यांचेसह रणांत येअून ठाकल्या.

आपणाला रण म्हणजे काय हें चित्रांतून कां होअीना, पुरती कल्पना येण्यासारखें पहावयालासुद्धां मिळण्याचा संभव नाहीं. तेव्हां त्या रणाची सिद्धता काय करावयाची असते, तदर्थ किती प्रकारें नि कसकसे निरनिराळे प्रबंध करावे लागतात, किती धोरणें सांभाळावीं लागतात, याची कल्पना करतां येणें तर दुष्करच. युद्ध चालू असतां राजधानीचे सुरक्षितीसाठीं व्यवस्था, युद्धकाळीं आपल्या प्रदेशावर अितर कोण्या बाजूनें चालू होणाऱ्या युद्ध प्रसंगाचा लाभ घेत नवीन दुसरा शत्रू आला तर त्याचे निवारणाची व्यवस्था; युद्धाचे वेळीं शत्रूंकडून आपल्या प्रजाजनांची होणारी हानि-लूटमार ही होणार नाहींत असा प्रबंध करणें; हजारो सैनिक प्राणपणानें लढत असतां त्यांच्या खाण्यापिण्याची-घायाळ झाल्यास औषधपाण्याची-शस्त्रास्त्रांची तूट पडूं न देण्याची अित्यादि गोष्टींची व्यवस्था; युद्धोत्सुकयांचा अुत्साह सतत वाढत राहील अशी योजना करणें; कदाचित् शत्रु बलवान ठरला तर आपली कमीतकमी हानि कशी होअील नि आपल्याला आपल्या सैन्याचा आणि आपल्या प्रजेचा बचाव कसा करतां येअील यासंबंधींची दीर्घ सूचना नि तदनुरूप पूर्व सिद्धता अित्यादि कितीतरी गोष्टी बघावयाच्या असतात. आपल्या घरीं अेखादें लग्नकार्य निघालें तर घरधन्याची नि घरधनिनीची किती तारांबळ अुडते हें लक्षांत घेतां राज्यावर संकट येअूं घातल्यावेळीं त्या संकटाचा परिहार करून राज्यरक्षण नि स्वातंत्र्यसंरक्षणाचें महान कार्य निघालें असतां राज्यभारवाहकाचे मनाला किती तरी अनेकशः व्यवधानें सांभाळावीं लागत असतील याची कल्पना कल्पनाशक्तीला शक्य तितकी कल्पक बनवून कल्पूं पहातां कांहीं अंशीं यथार्थपणाची रूपरेखा अंधुकपणें डोळ्यापुढें अुभी राहील.

अशी कल्पना मनोदृष्टीपुढें अुभी करून मग महाराणी श्रीकर्मदेवीकडे आतां बघा. घट्टं घातलेल्या घोर समराची व्यवस्था करण्यांत त्यांना किती तरी गोष्टींचीं व्यवधानें सांभाळावीं लागलीं असतील. तसाच प्रसंग आल्यास बाळराण्याचे सुरक्षितीची किती मनोदाहक चिंता त्यांना वाटत असेल. या अेका अबलेच्या मनःशक्तीची कसोटी पहाण्याचा प्रसंग आल्यावेळीं या चिंताकोलाहलापुढें तें वीरवतीचें वीरमन किंचित्‌सुद्धां अस्वस्थ वा विचलित झालें नाहीं. दूरदर्शीनें नि दीर्घसूचनानुसार कराव्या लागणाऱ्या सर्व पूर्वयोजना यथायोग्यपणें महाराणीनें करून ठेवल्या. आणि युद्धाच्या समारंभाला सादर झाल्या.

प्रचंड सिद्धता करून मेवाडविजयार्थ निघालेल्या दिल्लीच्या बादशहाला अेकाच युद्धांत—अगदीं पहिल्याच धडकीला महाराणीनें धूळ चारिली. महाराणीच्या सैनापत्याखालीं राजपूत वीरगण कवचें ल्यालेले कोणी घोड्यावर, कोणी पदाति याप्रमाणें अश्वारोही नि पदाति गणांचें तें व्यूहबद्ध सैन्य बादशहाच्या त्या प्रचंड सेनेला जाअून भिडलें. रणावलेल्या घोड्यांचे खिंकाळणें, राजपूत वीरांचा वीरशब्दघोष, रणवाद्यें आणि तरवारींच्या देमाराच्या घाअीनें अुसळणारा खणखणाट यांचा गगनभेदी घनरव त्या रणांगणावर थैमान घालीत होता. वीरकन्या, वीरपत्नी, वीरनारी वीरवती महाराणी कर्मदेवी पोलादी कवच ल्यालेली नि हातांत शस्त्र धारण करून अेका रणावणाऱ्या तेजवान रणाश्वावर आरूढ होअून अिस्तसातः विजेप्रमाणें संचार करीत असलेली दिसत होती. क्षणांत आपल्या सैनिक सामंतांना प्रोत्साहित करीत आहे तर दुसऱ्या क्षणीं सैन्याची विजयहेतुक संचालना करीत आहे; अेक्या क्षणीं सैन्याचे अेक्या बाजूला तर दुसऱ्याच क्षणीं दुसऱ्या बाजूला. कधीं आपल्या सैन्याला शत्रूवर लोटीत आहे तर तत्काल दुसऱ्या पावलाला शत्रूवर आपणां स्वतःला लोटून घेत आहे अशाप्रकारें वीरांना वीरावेश भरीत नि शत्रूंच्या काळजांत भयाची हुडहुडी भरवीत ती समरभवानी रणांगणावर शत्रूंचीं शतशः प्रेतें पाडीत

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

शत्रुसैन्यांत गोंधळ घालीत होती. आपल्या केसांची वीरगुंठी महाराणीनें बांधली होती ती या अवसानभरांत सुटून केस मोकळे झाले. विपुलकेशा महाराणीच्या मस्तकावरील तो केशकलाप मोकळा सुटून त्यांच्या आजूबाजूला पसरत घोड्याच्या भरधांव वेगानें वातावरणांत अितस्ततः महाराणीच्या भोवतीं चारी बाजूला अुडत राहून महाराणीच्या शरीराला अेक महान भयदायी रणचंडीचें स्वरूप देता झाला. महाराणीला जणूं देहभानच राहिलें नाहीं. ज्या बाजूला जातील त्या बाजूला शत्रूंचीं मुंडें कापीत नि त्यांचीं प्रेतें पाडीत महाराणीची दौड धावूं लागली. सर्वांग शत्रुरक्ताच्या चिळकांड्यानें लालभडक झालेलें आहे; वीरगुंठी सुटल्या केसांनीं कालस्वरूपाचें दृश्य त्यांच्या देहाभोवतीं अुत्पन्न केलेलें आहे नि अत्यंत गनिमतेनें त्या चोहोबाजूला आपल्या घोड्याची फेक करीत असल्यानें कोणत्याहि स्थानावर त्यांच्यावर दृष्टि ठरेल अशी शक्यताच न अुरल्यामुळें प्रलयविद्युत् रक्तवर्ण स्वरूपांत शत्रुसैन्याला जाळून काढण्याकरितां मागें पुढें, आजूबाजूला, बाहेरून मधून शत्रुसैन्यांत ती प्रलयज्वालाच तळपत आहे कीं काय असेंच वाटलें.

अशाप्रकारें रणरंग चढला असतां महाराणीचा घोडा थोड्याशा अनुयायांसह निर्वाणीच्या बाणासारखा अुसळला आणि कुतुबुद्दीनाच्या समीप जाअून भिडला. कुतुबुद्दीन घायाळ झाला. आणि प्राणावरच बेतावयाची पण प्रसंग आल्यास प्राण बचावीत पळून जाण्याच्या पूर्व योजनेप्रमाणें तो घायाळ होण्यापूर्वीं शक्य झालें नाहीं तरी मरण्यापूर्वीं तो तेथून पळून जाअूं शकला. त्याला पळतां भुअी थोडी झाली. दिल्लीचा बादशहा पळाला. मेवाड विजयाची दुराशा धरून आलेला प्रचंड सेनेचा अधिपति–दिल्लीचा बादशहा-यानें मारत्या महाराणीला पाठ दाखविली आणि आपल्या पळून जाण्याच्या भित्र्या कौशल्याचे बलावर बादशहा या कृतांतकाळ बनून आलेल्या सिंहिणीच्या–समरभवानी महाराणी श्रीकर्मदेवीच्या हातून मोठ्या कष्टानें आपला जीव वाचवता झाला.

निःशस्त्र झालेल्यावर, शरण आलेल्यावर नि पळत्या शत्रूवर क्षत्रिय वीर घाव घालीत नाहींत. त्याला वाचूं देतात. ही धर्मरणनीति आर्यांच्या अंगीं मुरलेली होती. महाराणी कर्मदेवीनें त्याचा पाठलाग केला नाहीं. त्याला पळून जाऊं दिलें. बादशहाची फौज सैरावैरा पळूं लागली. रणांत शत्रुपक्ष उरला नाहीं. राजपुतांच्या डोळ्यापुढें यानंतर जिकडे पहावें तिकडे पळत्या मुसलमानांचे थवेचे थवे दिसत होते. अर्थात् पळत्या शत्रूंच्या मागें न लागण्याचे धर्मरणनीतीचे धडे घेतलेले भोळे राजपूत कपटी शत्रूला जिवंत सोडीत परत फिरले. महाराणी विजयवती झाली. दिल्लीच्या मुसलमान बादशाहीला कांहीं काळ तरी मेवाडकडे पुन्हां अभिलाषबुद्धीनें बघण्याची अिच्छा होणार नाहीं असें झणझणीत अंजन मुसलमानी बादशाहीच्या धुंद डोळ्यांत घातलें गेलें आणि आपल्या देशशत्रूचें पारिपत्य झाल्याचें नि आपल्या पतिदेवाच्या—महाराणा समरसिंहाच्या—मृत्यूचें अंशिक कां होअीना अुट्टे काढल्याचें समाधान मिळून महाराणी कृतकृत्य होत्साती आपल्या विजयी राजपूत सेनेसह आपल्या प्रजाजनांना अभिमानोत्पादि आनंद प्रदान करीत आपल्या राजधानींत विजयभरानें प्रवेश करती झाली.

बाळराजे कर्णसिंह वयांत आल्यावर राज्यभार त्यांचे हातीं सोपवून महाराणी श्रीकर्मदेवी निवृत्तकार्य झाल्या. सांप्रत सर्व जगांत अेकमेव स्वतंत्र हिंदुराज्य असलेल्या आपल्या स्वतंत्र नेपाळच्या नेपाळाधिपतींच्या राजवंशाचा मूलपुरुष याच महाराणी कर्मदेवी यांचा दुसरा पुत्र होय. अशा या राष्ट्रकल्याणकारिणी नि हिंदुराष्ट्राच्या शत्रूंचें यथाशक्य दमन करणाऱ्या महाराणी श्रीकर्मदेवीच्या पावन चरणी शतशः प्रणाम असोत ! त्यांचें वीरातेज अक्षुण्णपणें आमच्या आर्यस्त्रियांचे अंगीं निरपवादपणें संचरत राहो !!

# हौतात्म्यस्फूर्ति महाराणी देवी पद्मिनी

रत्नांची दिव्य शक्ति प्रत्येक मनुष्य-मात्राचें मन आपल्याकडे आकर्षून घेत असते. मनुष्य तामसी स्वभावाचा असो, राजसी वृत्ती त्याचे मध्यें खळबळत असो, वा सात्विक भावनांचा त्याच्यांत अुत्कर्ष झालेला असो. रत्न या सर्व प्रकारच्या मनांवर आपलें प्रभावी आकर्षण चालविल्या-वाचून रहात नाहीं. या आकर्षणाचा परिणाम प्रत्येक मनाच्या गुणधर्मानुसार भिन्न भिन्न प्रकारें भिन्न भिन्न व्यक्तींवर होअील, मग तो चांगला असो वा वाअीट प्रकारचा असो; परिणाम झाल्यावाचून मात्र रहात नाहीं. या चरित्राची नायिका देवी पद्मिनी अेक अप्रतिम स्त्रीरत्न होतें. मनुष्य आपल्या मुलामुलींना आवडती नांवें देतो. परंतु पद्मिनी हें नांव या देवकन्येला अन्वर्थक असें ठेवलेलें होतें. स्त्रीपुरुषलक्षण शास्त्रांत स्त्रीजातीय व्यक्तींपैकीं ज्या अप्रतिम नि अद्वितीय अशा स्त्री रत्नांचीं लक्षणें दिलीं आहेत तशा लक्षणांचे स्त्रीला पद्मिनी म्हणतात. जगतांमध्यें पद्मिनी नांवाला अन्व-र्थक करणारी दिव्यलक्षणी स्त्री शेकडो पिढ्यांतून अेखाद्याच दैवी गुणांनींयुक्त भाग्यवान मातापितरांच्या पोटीं जन्माला येते. भारताच्या अितिहासाला माहित असलेल्या हजार दोन हजार वर्षांच्या काळांत सर्व दिव्य लक्षणांनीं युक्त नि पद्मिनी नामधारणाला सर्वस्वीं योग्य अशी ही महाराणीच तेवढी होअून गेली. अशा स्त्री रत्नाचें या दीडदोन हजार वर्षांचे कालांत दुसरें अुदाहरण अपवादालासुद्धां मिळूं शकत नाहीं. अशा प्रकारचें अद्वितीयत्व ज्या लक्षणांनीं स्त्रीरत्नाला प्राप्त होतें तीं लक्षणें शास्त्रांत जरी दिलेलीं असलीं तरी सामान्यतः सर्वांना ठाअूक नसतात; नि त्यासाठीं “अशीं हीं दिव्य लक्षणें तरी कोण कोणतीं असतात” अशा मनामध्यें अुद्भवणाऱ्या स्वाभाविक जिज्ञासेचें समाधान व्हावें म्हणून तीं लक्षणें खालीं टीपेंत दिलीं आहेत तीं बघावींत.

---

पद्मिनी स्त्री लक्षणें ३२ आहेत तीं येणेप्रमाणें:—(१) अंगकाठी किंचित् सडपातळ असून अुंच बांधा आणि शरीर कमलपुष्पतुल्य सुकोमल. (२) अंगकांति

अशा या गुणलक्षणांनीं युक्त ही दैवी कन्या सिंहलद्वीपांत हमीरशंख चव्हाण यांना लाभली होती. अशा स्त्री-रत्नाला स्थलहि दिव्य वंशांतीलच मिळावयाला पाहिजे होतें; धन्य भारतवर्षांतील अुदेपूरच्या शिसोदीय वंशाच्या दिव्य कुलाहून अन्य दिव्यतर कुल कोठें सांपडणार ? या दिव्य कन्येचा विवाह अुदेपूरचे राजा भीमसिंह या क्षत्रिय वराशीं झाला. रत्न जवळ असणें म्हणजे चोरालुटारूचें भयाला अेक प्रकारें आव्हानच असतें. आणि महाराणी पद्मिनी म्हणजे अेक अलौकिक नि अद्वितीय देवदुर्लभ स्त्रीरत्न. मेवाडचे महाराणा म्हणजे हिंदुस्वातंत्र्याभिमानाचा रत्नजडित मुकुट. मेवाडला जिंकून हिंदुस्वातंत्र्याला अेकदां नित्याची समाधि द्यावी म्हणून दिल्लीच्या अेकामागून अेक होणाऱ्या बादशहांची तीव्र मनीषा आणि त्यांतहि देवी पद्मिनीविषयींच्या रावणी अभिलाषेची त्यांत भर पडलेली. आधींच हिंदुविषयीं मुसलमानी बादशहांची पिशाच्चवत् वृत्ति, त्यांत मेवाडच्या

---

तप्तसुवर्णाप्रमाणें अथवा कमळपुष्पाप्रमाणें आरक्त गौरवर्णाची आणि अत्यंत नयनमनोहर. (३) कुसुमकोमल शरीराचा गंध नुकत्याच अुमललेल्या कमल-परागाप्रमाणें (ही अतिशयोक्ति नाही. बहुधा घामाला दुर्गंधीच असते. सुगंध मात्र आढळणे दुर्मिळच. पण सुगंध घामाला असणारे पुरुष नि स्त्रिया असतात हें मात्र निश्चित. सत्वपरिमाणूंनीं बनलेले प्रतिभासंपन्न नि दैवी गुणाच्या मनुष्याचे अंगाला-मग तो पुरुष असो वा स्त्री असो-सुगंध असतो. हें कधीं कधीं अनुभवाला येतें. सर्वसामान्यपणें घामाला सुगंध असणें अशक्यवत् असते म्हणून तसें असणारच नाहीं असें मानणें योग्य नाहीं.) (४) मुखाचा आकार शशामृगाच्या अंड्याप्रमाणें लंबवर्तुळ नि भरदार असून चित्ताकर्षक. (५) मुखावर चंद्रासारखें आल्हादकारी दैवी तेज, मंदस्मित नि गांभीर्य यांनीं ओतप्रोत विलसणारें. (६) फार हसणें वा फार बोलणें, ओरडणें हें आवडत नसून नेमकेंच पण सत्य बोलणें, आणि हंसत हंसत न बोलतां पूर्ण करारी मुद्रेनें नि गंभीरपणें पण प्रसन्न नि मोकळया मनानें बोलणें. (७) दांत हिरकणीप्रमाणें स्वच्छ, शुभ्र नि चमकदार असून कुंदाच्या कळयासारखे बारीक नि सारखे.

स्वातंत्र्यहरणाच्या अिच्छेचें मद्य प्यालेली बादशाही आणि त्यांत आतां देवी पद्मिनीविषयींच्या अघोरी अभिलाषेचा विंचू डसलेला असा दिल्लीचा अल्ला-हुद्दीन खिलजी मेवाडशीं लढण्यास सिद्ध झाला. पहिल्या अेक्या युद्धांत मेवाडच्या वीरपुषरूांनीं पराक्रमाची पराकाष्ठा करून अल्लाहुद्दीनला अुधळून लावला. यावेळीं अल्लाहुद्दीननें अितका भयंकर मार खाल्ला कीं पुन्हां बराच काळ त्याला मेवाडवर चढून जाण्याची सिद्धता झालेली वाटेना. परतु मनांतील राज्य नि स्त्रीरत्न याविषयींच्या रावणी दुरभिलाषा त्याला स्वस्थहि बसूं देअीनात. तो हळूहळूं सिद्धता करीतच होता. आणि पूर्ण सिद्धता झाली असें वाटतांच मागच्या माराचें भयदायी स्मरण मनांमध्यें भयदान करीत असतांहि दुरभिलाषेच्या प्रेरणेनें पुन्हां मेवाडवर चढाअी करून आला.

या वेळीं मेवाडचे सिंहासनावर बालराणा लक्ष्मणसिंह अधिष्ठित झालेले होते. ते वयांत येअीपर्यंत पालक नि संरक्षक या नात्यानें त्यांचे

---

(८) अोठ पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें वा पोवळ्याप्रमाणें फार लाल नि सुकोमल. (९) नेत्र कमलपत्राप्रमाणें विशाल असून कोपऱ्यास आरक्तवर्ण असलेले नि हरिणनेत्रासहि लाजवितील असे पाणीदार. (१०) बुद्धि नि दृष्टि परमपवित्र नि शांत. (११) राघूच्या चोचीप्रमाणें शोभायमान असून बारीक रंध्रें असलेली नासिका. (१२) भुवया धनुष्याप्रमाणें कमानदार असून भरदार. (१३) कर्णद्वय समान, पातळ नि सुकोमल. (१४) कपाळ अुंच, विशाल नि चमकणारें. (१५) मान (कंठ) किंचित् लांब बारिक नि कोमल असून विड्याचा पिक कंठांतून आंत जातांना दिसावा अशा स्वच्छ नि पातळ त्वचेची असून त्रिवलीयुक्त. (१६) केश रेशमाप्रमाणें मृदु, काळे, तुळतुळीत नि दाट असून कमरेच्याहि खालीं पोचणारे. (१७)……(१८) भुजा गजशुंडेप्रमाणें अुतरत्या, मांसल नि मृदु. (१९) हातपायांचे तळवे नि नखें आरक्त. (२०) अुदर लहान, पातळ, रेशमाप्रमाणें मृदु नि त्रिवलीयुक्त. (२१) बेंबी सूक्ष्म नि अंतर्मुखी. (२२) मांड्या केळीच्या गाभ्याप्रमाणें ओजस्वी, मृदु, मांसल नि अुतरत्या. (२३) कमर सिंहाच्या कमरेप्रमाणें परंतु कृशता न वाटूं देणारी. (२४) हातापायांची

चुलते राणा भीमसिंह हेच राज्यकारभार पहात असून देवी पद्मिनी यांचीच धर्मपत्नी. पद्मिनी आपल्या गुणांनीं नि सौंदर्यानें सर्व भारतभर प्रख्यात झालेली भाग्यवती स्त्री होती. त्यांच्याविषयीं सर्व राजपूतांना साभिमान आदरच वाटत होता, असें नसून जवळ जवळ देवी भावनेची पूज्यबुद्धि त्यांचे मनांत महाराणीविषयीं वसत होती. राजपूत स्त्रियांना तें नांव अितकें प्रिय होऊन बसलें कीं पुष्कळशा सुंदर कन्यांना त्यांच्या माता नि सुंदर भगिनींना त्यांचे बंधुगण ' पद्मिनी ' म्हणून संबोधन करण्यांत अेकप्रकारचा साभिमान आनंद मानूं लागले. मेवाडमध्येंच चितोड नांवाचा महादुर्गम दुर्ग ( किल्ला ) बांधलेला आहे. हा दुर्ग लंबवर्तुल अशा अुंच डोंगरावर बांधलेला असून त्या दुर्गाजवळ जातांच पहाणाराला जणूं कांहीं डोंगराचा शिरोभागच वेढला आहे कीं काय असें वाटण्यासारखा अेक प्रचंड तट बांधलेला आहे. त्या दुर्गाची लांबीरुंदी अितकी आहे कीं त्यांत हजारो नागरिकांचें अेक

---

बोटें बारीक, मांसल, अुतार असणारी नि सुकोमल. (२५) शरीर रोमरहित असल्याप्रमाणें स्वच्छ, स्निग्ध, नि कोमल असून पूर्ण निरोगी नि प्रमाणबद्ध. (२६) कंठस्वर कोकिलेपेक्षांहि कर्णमधुर नि भाषण अमृतासारखें गोड, चित्ताकर्षक नि शांतिसुखप्रद. (२७) आहार पूर्ण सात्विक, हितकर नि थोडा. (२८) निद्रा पूर्ण सावध नि अल्प. (२९) स्वभावानें नि वर्तनानें अत्यंत थोर, परमपवित्र, पुण्यशील, दयाळु, अुदार, परोपकारी बुद्धिवान नि गुणवान, मर्यादाशील, विनयवती, सेवातत्पर, स्वधर्मनिष्ठ, आणि अीश्वर नि पति भक्तिपरायण. (३०) चाल हंस वा गज यांच्या गतीसारखी शांत, मोहक, मध्यम ( त्वराहि नाहीं वा फार मंदहि नाहीं ). (३१) पूर्ण स्वच्छता नि शांतता यांची आवड असणारी असून प्रायः शुभ्र वस्त्रें, पांढरी सुगंधी फुलें, तसेंच अत्तरें आदिक सुगंधि द्रव्यें वापरणें, हिऱ्यामोत्यांचे अलंकार यांची आवड असणारी असून स्वतःचे बागेंत पती वा सखी बरोबर फिरण्याची आवड; देवादिकांच्या नि सतीसत्पुरुषांच्या कथांचीं गाणीं गाणें नि अैकण्याची विशेष आवड असणें. (३२) जी अल्पकामा नि आशुतोष म्हणजे अल्पसंतोषी स्वभावाची असते ती पद्मिनी.

नगर अुत्तम प्रकारें वसवितां येअील–अशा प्रचंड तटानीं सुसंरक्षित नि दुर्गम पर्वतभागानें सुरक्षित, हजारो वीरवरांनीं सुसज्जित असा हा पराक्रमी दुर्ग भोवतालीं पसरणाऱ्या अफाट शत्रुसैन्याला तुच्छ गणित आपल्या दुर्गमतेच्या आधारावर नि वीरवरांच्या दुर्दमनीय सामर्थ्यावर आकाशांत अुन्नतमस्तकानें धीरगंभीरपणें अुभा राहिलेला होता.

या दुर्गाभोवतीं–चितोडाभोवतीं–अल्लाहुद्दीन खिलजीच्या अफाट सैन्याचा घेरा पडलेला होता. पुष्कळ दिवस घेरा घालून बसला असतांहि यशाचें चिन्ह दिसेना. चितोड पाडाव करतां येअील अशी आशा वाटेना. त्यावेळीं त्यानें आपल्या अेका अभिलाषेची प्रकट घोषणा केली. त्यानें असें प्रसिद्ध केलें कीं "मला किल्ला जिंकण्याची अिच्छा नाहीं, केवळ पद्मिनी पाहिजे. पद्मिनी मला मिळाली कीं मी मागच्या पायीं परतून आपल्या राजधानीला निघून जाअीन." या घोषणेंत त्यानें बुद्धिभेदाचें विष भरून ठेवलें होतें. केवळ अेका व्यक्तीकरितां–केवळ राणा भीमसिंहाच्या राणी पद्मिनीकरितां अेवढा प्रचंड मनुष्यसंहार काय म्हणून होअूं द्यावा, असें वाटून राजपूत सैनिकांचा व सामंतांचा बुद्धिभेद होअील नि शत्रूंचें निकराचे अेकताबल तुटेल असें त्याला वाटलें असावें. कारण हा त्याचा डाव सफल ठरता तर केवळ पद्मिनीप्राप्तीचीच अिच्छा पुरी झाली नसती तर राजपुतांतील बुद्धिभेदाच्या फुटींतून आपल्या सेनाबलाचा प्रवेश करून चितोडविजयहि त्याला साध्य झाला असता. पण ही त्याची दुरभिलाषा अेका अर्थी–बुद्धिभेदाच्या संबंधीं तरी–अयशस्वी ठरली. या अत्यंत अपमान-कारी घोषणेनें राजपूत वीरांचा संताप अनावर झाला. सर्व चितोडवीरांना क्रोधानें दशदिशा धुंद दिसूं लागल्या. राजपूतांच्या कीर्तिजीवनांची जीवन-लक्ष्मी जी महाराणी पद्मिनी तिच्या रूपानें आपल्या आर्ययशाचें अुदक मुसलमानांच्या हातावर सोडावयाचें? देवकन्येचा मानसिक कां होअीना–अभिलाष करणारा दुष्ट यवन अद्याप जिवंत राहूं शकावा! ही अत्यंत

अपमानकारी घोषणा आम्हीं राजपुतांनीं तत्काळ शासनार्थ अुद्यतायुध शस्त्रहस्त होअून शत्रुवध न करतां शांतपणें सहन करावी ? आमचें वीरत्व आजच लोपलें काय ? या आणि अशासारख्या चित्तदाहक क्रोधप्रश्नांनीं त्यांचीं डोकीं भणाणून गेलीं. अर्थात् या घोषणेला काय अुत्तर मिळालें असेल तें कल्पनेनेंच जाणलेलें बरें !

अल्लाहुद्दीनला मान्यतेचा होकार मिळण्याचे स्थळीं क्रोधोद्धत सिंह-गर्जनेचा हुंकार मिळाला. आणि राजपूत वीरांकडून सिंहवृत्तीच्या सूडाचा पंजा अल्लाहुद्दीनच्या पाठीला जाणवूं लागला. अल्लाहुद्दीन यशाच्या दृष्टीनें पूर्ण निराश झाला. राज्यहरणाचा–हिंदुस्वातंत्र्यहरणाचा मोह त्याला आवरत नव्हताच पण पद्मिनीच्या मोहानें त्याचें मन अनावर करून ठेवलेलें होतें. ही राक्षसी–ही रावणी अभिलाषा त्याचे मनांत अधिकच पेट घेअूं लागली. आपल्या घोषणेनें बुद्धिभेद होऊन यशदायी अनुकूल वारा वाहूं लागेल ही जी त्याची आशा ती पार विलयाला जाऊन त्याला निराशेच्या डोहांत फेकूं पहाणारे प्राणप्रलयाचे तुफान वारे वाहूं लागले. आणि भयंकर अप-यशाची प्राणघेती थप्पड बसून यश तर हरवेलच पण त्याबरोबर कदाचित् प्राणही पण हरवावे लागतील कीं काय याची त्याला भीति वाटूं लागली. शेवटीं स्वजातीसुलभकपटपटुतेच्या विश्वासघाती क्लृप्तीचा आश्रय त्यानें शोधला. राजपूत लोक–राजपूत लोकच नव्हेत तर राजपूतांसमेत अखिल हिंदु जाति कपटकौशल्यांत अत्यंत अडाणी. तिला कोणीहि फसवावें. मुसलमान, युरोपीय अित्यादि जाति फसविण्यांत कुशल तर हिंदु जाति फसण्यांत अद्वितीय. परकीय जातींनीं फसविण्याचा बेत केला आणि त्या फसगतीच्या जाळ्यांत हिंदुजातीय सांपडला नाहीं असें कधींच व्हावयाचें नाहीं. या गोष्टींच्या कारणांची मीमांसा करण्याचें हें स्थल नाहीं पण वस्तु-स्थिति अशी आहे एवढें मात्र खरें. याचा अर्थ असा नाहीं कीं हिंदु-जातीनीं मनांत आणलें तर कपटी चाल चालतां येत नाहीं. पण कपटाचरण

दुसरा करीत असेल अशी कल्पनाच पहिल्यानें हिंदूंच्या सात्विक मनाला वाटत नाहीं. आणि दुसऱ्याच्या कपटाला बळी पडल्यावर सुद्धां कपटी अुपायांचें अवलंबन हिंदूंचा सात्विक स्वभाव करूं देत नाही. परंतु अेकदा डाव खेळावयाचा हिंदूंनीं ठरवला तर तो कपटाचाहि डाव हिंदु अितक्या कौशल्यानें टाकूं शकतो कीं त्यांत कपटपटु परकीयहि अडकल्यावांचून राहूं शकत नाहीं. परंतु कपट ओळखणें नि कपट्यांशीं कपटी आचरणानेंच प्रत्युत्तर देणें हें हिंदुजातीच्या अत्यंत स्वभावविरुद्ध होअून बसलें आहे.

अल्लाहुद्दीनला ठाअूक होतें कीं विश्वास दाखविला तर हिंदुहि विश्वासुकपणें वागतात. अेकदां त्यांचेवर विश्वास ठेवला तर त्यांचेकडून विश्वासघात होण्याची भीति मुळींच नाहीं. आणि हिंदूंच्या या स्वभावज्ञानान्वयें त्यानें अेक युक्ति योजली. त्यानें असा निरोप राणा भीमदेवाला पाठविला कीं ' कृपा करून महाराणी पद्मिनीचें अेकदां दर्शन घडवा म्हणजे पुरें. मी वेढा अुठवून आपल्या स्थानीं परत जातो. " हा निरोप गेल्यावर अर्थात् या गोष्टींतसुद्धां राजपूतांना अपमानसा वाटला. तरीहि महाराणा भीमसिंह नि विशेषतः महाराणी पद्मिनी यांचें असें म्हणणें कीं अगदी अेक्या लहानशा गोष्टीनें भावी प्राणहानि टळत असतां काल्पनिक अपमानाच्या कल्पनेनें भयंकर मनुष्यसंहार—राज्यहानिकर वीरपुरुषसंहार—कां होअूं द्यावा ? तेव्हां याला कांहीं तरी तोड काढली पाहिजे. शेवटीं सर्वानुमतें असें ठरलें कीं ' प्रत्यक्ष देवी पद्मिनीचें दर्शन तर अशक्यच पण आरशांतील देवीपद्मिनीप्रतिबिंबच काय तें पहावयाला मिळेल, ' असा निरोप पाठवावा. त्याप्रमाणें अल्लाहुद्दीनकडे निरोप गेला. अल्लाहुद्दीनचा राक्षसी आनंद गगनांत मावेना. कारण महाराणीला पहाणें हा त्याचा मुख्य अुद्देशच नव्हता. त्या निमित्तानें पुढचा जो डाव त्यानें रचला होता त्या डावाला यश येण्याला राजपुतांच्या अुपरोक्त निरोपामध्यें प्रत्यवाय येण्यासारखें कांहींच नव्हतें; अर्थात् अल्लाहुद्दीननें तत्काल संमति दिली

आणि सिंहांच्या गुहेंत हा कोल्हा प्रतिद्वंदी म्हणून नव्हे तर अतिथी म्हणून कांहीं थोड्याशा नोकरांसह जातां झाला. राजपूत विश्वासघात करून आपल्याला शत्रु नात्यानें अडकवून ठेवतील वा आपल्या जिवाला हानि करतील याची त्याला किंचित् सुद्धां शंका आली नाहीं.

राजपूतांची राज्यश्री नि मानश्री हरण करून हिंदुस्वातंत्र्याचा घात करूं घालणारा अल्लाहुद्दीन राजपुतांच्या सात्विक हिंदु विश्वासूपणावर भरंवसा ठेऊन चितोडमध्यें राणा भीमसिंहाचा अतिथि होऊन गेला. अतिथिरूपानें शत्रूहि आला तरी त्यालासुद्धां मानसन्मानानें वागविणाऱ्या हिंदु सुस्वभावाप्रमाणें त्या दुष्टाचें अुत्तम आदरातिथ्य झालें. देवी पद्मिनीचें प्रतिबिंब आरशांत बघतांच तो अत्यंत आश्चर्यमुग्ध झाला. त्याच्या स्वप्नांत तर नव्हेच पण त्याच्या पराकाष्ठेच्या कल्पनाशक्तीच्याहि स्वप्नांत कल्पितां येणार नाहीं अशी अद्वितीय सौंदर्यमूर्ति बघून तो अवाक् झाला. त्या दैवी दर्शनानें त्याच्या मनांतील राक्षसी दुष्टत्ता अेक क्षणभरच कां होअीना—जणूं कांहीं अदृश्य झाली. क्षणैक दैवीदर्शनोद्‌भूत आश्चर्यातिशयाच्या स्तिमितावस्थेंत राहून दुसऱ्या क्षणीं तो भानावर आला नि आपला विश्वासघाती नारकीय बेत पुन्हां आपल्या दृष्टीसमोर आणून पुढील कार्याचे जुळणीस त्यानें मानसिक आरंभ केला.

अल्लाहुदीनचें अतिथिकारण संपलें. तो जावयाला निघाला. राणा भीमसिंह हिंदु सभ्यरीतीच्या अनुरोधें या राजकीय पाहुण्याला सन्मान दर्शविण्यासाठीं किल्याचे सिंहद्वारापर्यंत पोचवावयाला निघाले. वाटेंत अल्लाहुदीननें अगदीं सात्विक दिसणारें बगुला स्वरूप धारण केलें नि आपल्या हातून झालेल्या अपराधांची नि त्रासांची तो वारंवार राणा भीमसिंहाजवळ क्षमायाचना करूं लागला. हेतु हा कीं यायोगें राणाजींचा विश्वास वाढून पसरून ठेवलेल्या जाळ्यांत विनायासें ते चालून यावेत. राणाजी ठरल्या स्थानाच्याहि पुढें थोडेसे गेले. जसे अल्लाहुदीन नि अितर त्याचे बरोबरचे लोकहि जवळ जवळ निशस्त्र होते त्याचप्रमाणें राणा भीमसिंह नि त्यांचे सहचरहि निःशस्त्रसे

होते. अल्लाहुद्दीनच्या संकेत स्थानापर्यंत ही मंडळी येतांच विश्वासघाती अल्लाहुद्दीननें आपल्या विश्वासघाताचे जाळे पसरलेल्या डावाप्रमाणें जवळच्या अेका गुप्त जागेकडून अेकाअेकीं सशस्त्र मुसलमान गुंडांची मोठी टोळी धांवत येअून असावधपणें विश्वस्त स्थितींत असलेल्या या राजपूतसिंहांना त्यांनीं विश्वासघाताच्या पिंजऱ्यांत अडकविलें. राणा भीमसिंहासह सर्व राजपूत अल्लाहुद्दीनचे बंदी ठरले. शस्त्रयुद्धांत अजिंक्य ठरणाऱ्या राजपूतांना या कपटी अल्लाहुद्दीननें विश्वासघाताच्या डावानें आहारीं आणलें. आणि अितकें झाल्यावर अल्लाहुद्दीननें अशी घोषणा केली कीं

"पद्मिनी हातीं येतांच राणा भीमसिंहाला सोडून देअूं"

अेखाद्याला 'तुझे प्राण खेचून घेतों नि मग जीवदान देतों' असें म्हटलें तर तें सुद्धां अेक वेळ शक्य कोटींतलें वाटेल पण वरील घोषणा राजपुतांचे संबंधांत अशक्यवत् ठरणारी होती. सहचरांसह भीमसिंहजी बंदी झाल्याची दुःखद वार्ता चितोडगडीं पोचतें न पोचतें तोंच अल्लाहुद्दीनच्या वरील घोषणेचीहि वार्ता दुर्गवासियांना मिळाली. आणि राजपूतांच्या मनांत अनंत विकारविचारांचा कोलाहल माजला. काय महाराज भीमसिंहाकरितां महाराणी पद्मिनीदेवीचा त्याग करावयाचा ? ही कल्पनाच असह्य ! अेक क्षणभर देखील अेकाहि राजपूताच्या मनांत या गत्यंतराचा प्रश्न अुभा राहूं शकला नाहीं. मग काय असीम साहसाचा अवलंब करून तरवारीच्या तिखट पाण्याचें अंजन अल्लाहुद्दीनच्या डोळ्यांत घालून त्याची धुंदी अुतरावी आणि महाराज भीमसिंहाला सोडवून आणावें, आणि जर त्या प्रयत्नांत अपयश आलें नि अल्लाहुद्दीनच्या असंख्य सेनेचा पाडाव करून भीमसिंहजींना जर सोडवून आणूं शकलो नाहीं तर ? मग काय करावें ? दुष्ट अल्लाहुद्दीन महाराणीचा अभिलाष धरून जर पुढें सरकला तर कसें होअील ? या पेचाला कसा अुलगडावा. अशा विचारांत सरदारगण निमग्न झाले. महाराणी पद्मिनीला हें सर्व वृत्त कळलें. आणि महाराणी या विषयसमस्येंत काय विचार सुचवितात यांकडे सर्वांचें लक्ष्य लागलें.

हिंदु कपटाचा अवलंब कधीं करीत नाहींत पण जर कधीं कपटावलंबन करावयाचेंच त्यांनीं ठरवलें तर त्यांतहि ते अितरांहूनहि वरचढ ठरतात असें जें विधान मागें याच चरित्रचित्रणांत केलें आहे त्याची सत्यता पटण्याचा प्रसंग येथें आला आहे. महाराणी पद्मिनीनें "महाराज भीमसिंहजीची सोडवणूक करण्यासाठीं महाराणी स्वतः अल्लाहुद्दीनकडे जावयाला सिद्ध झाल्या आहेत !" असें घोषित केलें. हें अैकतांच सर्व राजपूत विस्मयचकित झाले. काय ! भीमसिंहजींचे सुटकेनिमित्त महाराणी आपला दिव्यदेह त्या पापात्म्याच्या स्वाधीन करणार काय ? ही अशक्य गोष्ट शक्य होणार काय ? महाराणी भीमसिंहजीकरितां आपल्या पावित्र्याचा होम करूं पाहणार काय ? या मेरुस्खलनासारख्या सर्वस्वीं अशक्य असणाऱ्या योजनेंत काय तथ्य असेल बरें ? अशा विस्मयी विचारांचा भंवरा दुर्गनिवासीयांचे मनांत चक्कर खाअूं लागला. महाराणीनें आपला सर्व बेत अुघडा केला नाहीं. महाराणीबरोबरच त्यांचे माहेराहून अितरांबरोबर आलेले त्यांचे चुलते श्रीमान गोराजी आणि लहान भाअू वीरबालक बादल हेही येअून राहिले होते. त्या दोघांबरोबर आपल्या बेतासंबंधीं सर्व सूत्रें यथायोग्यपणें जुळवतीं करून पुढील कामाला त्या लागल्या. हे चुलतेपुतणे जसे अुत्कृष्ट वीर होते तसेंच मंत्रणाकुशलहि होते. त्या दोघां व्यतिरिक्त घट्ट घातलेल्या योजनेंतील रहस्य कोणालाहि महाराणीनें कळवलें नव्हतें. या मंत्रणेंत देवी पद्मिनीच्या पावित्र्याचें रक्षण नि राणा भीमसिंहजींचा अुद्धार या दोनही गोष्टी साध्य करण्याची युक्ति होती आणि ती पूर्णपणें यशस्वीहि ठरली.

ही योजना ठरतांच अल्लाहुद्दीनकडे गडावरून दूत पाठविला गेला नि त्याला महाराणीनें कळविलें कीं, "बादशहा ! चितोडवर आक्रमण करण्याकरितां चितोडगडाभोवतीं पसरलेली फौज काढून घेअून दूर नेअून ठेवा. ज्या दिवशीं हें घडेल त्याच दिवशीं महाराणी पद्मिनी बादशहाकडे येतील. दुसरें असें कीं आपण बादशहा आहांत आणि महाराणीहि फार

थोर कुळांतल्या आहेत. म्हणून त्या आपल्या कुळाचाराला शोभेल अशा प्रकारें आपल्या हेतूच्या सिद्धर्थ आपल्याकडे येतील. महाराणीचा जो परमप्रिय सखीवर्ग आहे त्यांतील सर्व सख्या त्यांना शेवटचा निरोप देण्याकरितां त्यांचेबरोबर थेटपर्यंत येतील. त्याचप्रमाणें त्यांचेबरोबर ज्या दिल्लीस येणार आहेत त्याहि प्रियसख्या बरोबर असतील. त्या सर्व कुलिन नि थोर घराण्यांतील आहेत. त्यांनीं घराबाहेर अद्याप पाऊलहि टाकलेलें नाहीं. पण आपल्या आज्ञेकरितां आपली पूर्वपरंपरा सोडून त्या तेथपर्यंत येत आहेत. तेव्हां बादशहाला विनंति अितकीच कीं महाराणीचा परमप्रिय सखीवर्ग जेव्हां त्यांच्यासाठी नि बादशहाचे आज्ञेसाठीं अेवढा त्रास सोसून येत आहे तेव्हां आपणहि त्यांच्या मानरक्षणाची काळजी घेतली पाहिजे. कधीं असें न होवो कीं सैनिक-सरदारांपैकीं कोणी पालखीजवळ येअून त्यांची थट्टा वा अपमानकारी भाषण करूं शकेल. असें यत्किंचितही कांहीं झाल्यास त्यांचा नि महाराणीचा तो भयंकर अपमान केल्यासारखें होअील." हें सर्व अल्लाहुद्दीननें मान्य केलें.

अल्लाहुद्दीन पद्मिनीच्या आगमनाच्या अशक्य वाटणाऱ्या पण आतां प्रत्यक्षप्रतेंत येअूं पहाणाऱ्या वार्तेनें धुंद झाला. पतिव्रता हिंदुललना आपल्या हातानें आपले हृदयाचा छेद करतील, हंसत हंसत प्रचंड अग्निज्वालेंत आपल्या प्राणांचा होम करूं शकतील, आपल्या प्राणांचा नि प्रत्यक्ष पोटच्या परमप्रिय पुत्रांचा बळी देअूं शकतील पण—आपलें पावित्र्य, आपलें सतीत्व-धन छिनावलें जाण्यापूर्वी त्या धनासह त्यांचे धन्यात्मे धन्य देवलोकीं तरी जाअून पोचलेले सांपडतील वा शत्रूच्या पापात्म्याला नरकीं धाडून स्वतः त्या निर्भय तरी झालेल्या असतील हें त्या मदांधाच्या ध्यानी क्षणभरहि आलें नाहीं. पण ही गोष्ट, हें दिव्य त्याचे ध्यानीं आलें नाहीं हेंच महाराणी पद्मिनीच्या यशासाठीं हवें होते. आणि सत्वजातीय हिंदु पद्मिनींनें विण-लेल्या नि योजलेल्या जाळ्याच्या प्रत्येक धाग्यांतून कुशलतेचे तंतु गोवलेले असल्यामुळें कपटपटु अल्लाहुद्दीन हिंदुकपटकौशल्यापुढें फिका पडला.

अटींत सांगितल्याप्रमाणें अल्लाहुद्दीननें आपलें सैन्य दुर्गाभोवतून आवरून दूर काढून घेतलें. आणि त्यानंतर ठरलेल्या दिवशीं गडावरून अेकामागून अेक ७०० पालख्या बादशहाच्या तंबूकडे जावयाला बाहेर पडल्या. या सर्व पालख्या बादशहाच्या सैन्यांत शिरून बादशहाच्या डेऱ्याकडे येअूं लागल्या. महाराणी पद्मिनीनें शेवटची भेट म्हणून राणा भीमसिंहाशीं अर्धा तास भेटीची अनुज्ञा बादशहाकडून मिळविली आणि बादशहाच्या तंबूंत ती भेट झाली. सातशें पालख्यांचा गराडा त्या तंबूभोवतीं पडलेला. बादशाही सैनिकगण बऱ्याच अंतरावर होते. आंत काय चाललें आहे हें दिसणें शक्य नव्हतें. ठरल्याप्रमाणें राणा भीमसिंहाला अेका पालखींत बसवून पालखी काढली. या सर्व पालख्या सखीवर्गाच्या पालख्या म्हणून वस्त्राच्छादित केलेल्या होत्या. अर्थात् महाराज पालखींतून जात असतांहि ते आंत आहेत हें बाहेरून कळणें शक्य नव्हतें. कांहीं दासी निरोप घेअून परतणाऱ्या होत्या. तेव्हां महाराजांच्या पालखीबरोबर आलेल्या पालख्यांपैकीं कांहीं पालख्या परतल्या तरी शंका येणें शक्य नव्हतें. या परतलेल्या पालखींपैकीं अेका पालखींत महाराज भीमसिंह नि दुसऱ्या अेका पालखींत महाराणी पद्मिनीं असे दोघे जण होते. दुसऱ्या अेक्या तंबूंत अल्लाहुद्दीन अर्धा तास भीमसिंहाची भेट होऊन महाराणी परत येण्याची वाट पहात बसला होता. परतणाऱ्या पालख्या परत जात असतां बादशाही सैनिकगणहि गंभीरपणें ही सर्व हालचाल पहात होते. अर्धा तास होअून गेला. महाराज परत येत नाहींत. कांहीं अधिक वेळ झाला तरी महाराजांचा पत्ता नाहीं. अल्लाहुद्दीन अधीर झाला. अधीरपणांतून संशयाचा अुदय झाला आणि संशयाची वाढ होत होत जसा जसा वेळ अधिक होअूं लागला तसतसा संशय क्रोधाचें स्वरूप धारण करूं लागला. बादशहा क्रोधाविष्ट झाला. तरीहि भीमसिंहाचा पत्ता नाहीं. आतां मात्र बादशहा धीर धरूं शकला नाहीं आणि तेथून निघून तंबूजवळ थांबलेल्या पालख्यांजवळ गेला. अितक्या अवधींत अिकडे महाराज भीमसिंह महाराणीसह कांहीं

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २,
वर्ग........ क्रमांक

अंतरावर त्यांचेसाठीं सिद्ध ठेवलेल्या वेगवान अश्वावर आरूढ होऊन चितोडगडीं निघून गेले होते.

पालख्यांजवळ बादशहा आला मात्र तों काय भयंकर प्रकार ! पालखींत दासीबिसी कोणी नसून पालखींत बसणारे नि पालखी वाहणारे सशस्त्र राजपूत वीरगण अेकदम अुसळून बादशहावर तुटून पडले. पण बादशहाहि अगदीं असावध नव्हताच. तो अेकटा येता वा थोडेसेच सहचर त्याचेभोवतीं असते तर निश्चितपणें तेथेंच त्याला अल्लाची जागा—जर कोठें असलीच तर !—धुंडावी लागली असती. परंतु तो सैनिकपरिवेष्टित होता. अर्थात् या जिवावर अुदार झालेल्या वीरवर पण अल्पसंख्य राजपूतांची नि बादशाही सैन्याची धुमश्चक्री चालू झाली. या सातशें पालख्यांपैकीं प्रत्येक पालखींत १।१ सशस्त्र राजपूत साहसी वीर बसलेला होता. आणखी पालखीला लागलेले भोअीहि गुप्तपणें शस्त्रसिद्ध असलेले सैनिक कहार लोक होते. कांहीं थोड्या पालख्या परतल्या त्या सोडून साधारणतः चार साडेचार हजार राजपूत वीर सैनिकांनीं सर्वजण निःशेषपणें ठार होअीपर्यंत बादशाही सेनेला चितोडच्या मार्गाकडे पुढें पाअूल ठेवूं दिलें नाहीं. ४—४॥ हजार अत्यंत शूर धाडसी असे अगदीं निवडक वीरगण येथें बळि दिले गेले. त्यांतून अेक-जणहि वाचला नाहीं. स्वतः मरून आपला राज्यसंचालक राणा भीमसिंह आणि आपली मानमूर्ति—हिंदुमानमूर्ति—देवी पद्मिनी यांची सुरक्षितता साधण्या-साठीं म्हणून ते तेथें आले होते. त्यांनीं आपल्या स्वर्ग जिंकणाऱ्या अतुल-पराक्रमी प्राणांचा शत्रूच्या मार्गात दुर्लंघ्य अडसर बनवून महाराणा नि महाराणी यांच्या सुरक्षिततीसाठीं समरांगणी आपले बळी दिले आणि यशस्वी ठरले. त्या वीरवर यशस्वी हुतात्म्यांना आमची—आपणा सर्वांची—नम्रभाव-पूर्वक आणि धन्योद्गारयुक्त कृतज्ञतांजली समर्पण असो.

ही फसवणूक त्या मदांध नराधमाला कशी सहन होणार? तो आपल्या सेनेसह तसाच लगट करीत चितोडच्या सिंहद्वाराजवळ येअून

थडकला. तेथें महाराणीचे चुलते वीरवर गोरा आणि महाराणीचा धाकटा भाऊ वीरबालक बादल यांनीं सिंहद्वार अडवून धरलें. तेथें घनघोर युद्ध झालें. अल्लाहुद्दीनच्या कपटी नि विश्वासघाती डावावर तोड करून त्याचेच दांत त्याच्या घशांत अुतरविल्यानें तो चिडून जाअून त्याच पावलीं चितोडवर आल्यावांचून राहणार नाहीं ही गडावरील सूत्रचालकांना निश्चिति असल्यामुळें सिंहद्वाराजवळ निवडक सैन्य गोराबादल या महापराक्रमी वीरांच्या नेतृत्वाखालीं तेथें अल्लाहुद्दीनला तोंड देण्यासाठीं सिद्ध ठेवलें होतें. अल्लाहुद्दीनचें सैन्य येअून थडकतांच दोन्हीही बाजूंचीं सैन्यें घेमार करीत परस्परांवर अुसळलीं. अेका बाजूला बादशाही अपमानाच्या खवळण्यानें प्रेरित झालेली धर्मांध मुसलमानी सेना तर दुसऱ्या बाजूला आपल्या धर्मासाठीं, जातीय मानासाठीं, आपल्या परमश्रेष्ठ राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं लढणारी हटेली शूर राजपूत सेना अशा या दोन सेना परस्परांवर आघातप्रत्याघातांचा पाअूस पाडूं लागल्या. बादशाही सेनेमध्यें अधिकसंख्याक सैनिक होते तर हिंदुस्वातंत्र्याच्या पक्षाकडे अधिक शौर्यवान् नि जातीय मानार्थ नि हिंदुराष्ट्रस्वातंत्र्यरक्षणार्थ प्राणपणानें लढण्याचा अधिक त्वेष असलेले सैनिक होते. मुसलमानांच्या संख्याधिक्याला राजपूतांकडील हें गुणाधिक्य तोंड देण्याला अुभे असल्यामुळें मुसलमानांच्या संख्याधिक अफाट सैन्याचा दुर्गप्रवेशाचा हेतु त्यादिवशीं साध्य झाला नाहीं. मुसलमानांकडील सैनिकांच्या प्रेतांचे ढीग पाडीत अेक अेक राजपूत रणांत गळूं लागला. राजपूत वीरानीं आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली नि म्हणूनच मुसलमानांचा प्रचंड सैन्यसमूह दुर्गप्रवेश करण्याला असमर्थ झाला. राजपूत मूळचेच वीरपुरुष पण त्यादिवशीं वीर्यशाली गोरा-बादलनीं जो अद्वितीय आवेश नि पराक्रम दाखविला त्यामुळें मुसलमानांच्या तोंडचें तर पाणीच पळालें पण प्रत्यक्ष राजपूतांनासुद्धां त्यांचेकडे पाहून दुप्पट रणावेश चढला. तेहि आश्चर्यचकित झाले. आपला वीरबालक बादल अगदीं कोमलवयस्क होता. बारा वर्षांचें लेकरूं. ओठ पिळले तर मातृदुग्धाचे अद्याप ताजे असलेले थेंब गळतील अितकें अल्पवय. पुण पराक्रमांत मोठ-

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे २.
वर्ग............क्रमांक.......... ८०३९

मोठ्यांनीं थक्क व्हावें असा प्रभावशाली बालक–देवी पद्मिनीचा लहानगा भाऊ. तो ज्या बाजूला जाई त्या बाजूला जवळ असला तर तरवारीनें–दूर असला तर भाल्यानें मुसलमानांच्या सैनिकांना रणांत लोळवूं लागला. त्यानें विलक्षण पराक्रम केला म्हणण्यापेक्षां पराक्रम स्वतःच त्याचें परमपवित्र बालशरिरांत प्रवेश करून दुष्टनाशनाची आपली हौस फेडून घेऊं लागलेला होता असेंच म्हणणें अधिक अन्वर्थक ठरेल. बादलच्या मनांत महाराणी पद्मिनीचा सन्मान रक्षण करणें आणि हिंदुस्वातंत्र्यप्रतिनिधी शिसोदीय कुलाचे गौरवाला अभंग राखणें या हेतूंचा दिव्यावेश आंदोलत राहून त्यांतून या शत्रुविध्वंसक पराक्रमाच्या ज्वाला चारी बाजूला फैलावत होत्या. त्या दिवशीं या वीरश्रेष्ठ गोराबादलच्या नेतृत्वाखालीं पराक्रमी राजपूतांनीं मुसलमानी सेनेचा असा घोर संहार केला कीं त्यामुळें चितोड घेण्यास अुताविळ होअून महाराणी पद्मिनीला स्वाधीन करून घेण्यासाठीं रावणी प्रयत्न करूं धांवणाऱ्या अल्लाहुद्दीनला देखील आपल्या सेनेचा अकल्पनीय संहार पाहून कांहीं काळ युद्धाचा बेत सोडून द्यावा लागला.

या युद्धांत राजपूत सेनेचाहि बहुतेक भाग कामीं आला. पराक्रमशाली गोरा याच रणांत धारातीर्थीं देह ठेवते झाले. बादल आणि आणखी कांहीं थोडेसे राजपूत सैन्य अेवढेच अुरले. आणि ही विजयी पण प्राणघातकपणें घायाळ झालेली राजपूत सेना मागें परतली. अल्लाहुद्दीन या वेळेपुरताच अपयशी होअून मागें परतला. कशाकरतां ? हें पुढें कळेलच. आपल्या हेतुसिद्धीच्या आनंदानें कृतकृत्य झालेला पण आपल्या चुलत्याच्या निधनानें हतोत्साह बनलेला बादल राजगृहांत येअून अंतःपुरांत प्रवेश करता झाला. बादलचीं सर्व वस्त्रें रक्तानें भरलेलीं, अंगावर घाव झालेले, शत्रुरक्तानें माखलेलीं शस्त्रें हातांत असलेलीं, अशा रणवेषांत पण अेकटाच बादल अंतःपुरांत येतांना पहातांच अंतपुरांतील राजवंशीय स्त्रियांत शोकाचे वारे वाहूं लागले. गोरावीर कामास आला हा सर्वांचा तर्क झाला. आपल्या काकूपुढें–

वीर गोराच्या पत्नीपुढें—बादल येऊन मुग्धपणें अुभा राहिला. त्या यशस्वी पण दुःखी कुमाराच्या तोंडून अेक अक्षरहि निघेना. शोकार्ता गोरापत्नि म्हणते "बालबादल! तूं अधिक काय सांगणार? मला सर्व समजून आलें आहे! पण मी अेक प्रश्न विचारते त्याचें अुत्तर तूं दे. सांग! माझ्या प्राणेश्वरानें कशा प्रकारें वीरता प्रकाशित करून स्वर्ग लोकची वाट धरली? सांग बाळ! अेवढें मला नीट सांग—म्हणजे माझे मनाला शांति मिळेल." हें अैकतांच बादलला अनावर गहिवर येअून त्याचे डोळे अश्रूंनीं डबडबले, आणि त्या शोकावेगानें त्याच्या घावांतून रक्तप्रवाहहि अधिक जोरानें वाहूं लागला. तो म्हणाला "माताजी! माझ्या काकांची वीरता कशी वर्णन करूं? आज त्यांच्याच सिंहपराक्रमामुळें शिसोदीय वंशाची मानमर्यादा रक्षण झाली. जसें गवत कापावें त्याप्रमाणें त्यांनीं असंख्य मुसलमानी सैनिक लीलेनें कापून मृत्युमुखीं लोटले. मी केवळ त्यांचे मागें मागें फिरत नि जे कांहीं अुरले सुरले आजूबाजूचे २।४ मुसलमान सैनिक सांपडत त्यांना कापीत त्यांचें मागें जात होतों. याप्रमाणें असीम पराक्रम करून रणभूमीवर शत्रूंच्या शरीरांचें अंथरूण पसरून त्यावर अंग टाकीत महानिद्रेंत माझे काका निजलेले आहेत! त्यांच्या अुशाशीं अुशीच्या स्थळीं अेक्या यवन राजकुमाराचा छिन्नदेह लागलेला आहे." आपल्या पतिदेवाच्या वीरतामाहात्म्यश्रवणाची भूक आणखी वाढून राजपूतबाला म्हणाली, "बाळ बादल! माझ्या प्रियकरानें रणांत कशी वीरता दाखवली हें अेकदां मला पुन्हां सांग." वीरकुमार म्हणतो "आअीमहाराज! मी अधिक काय सांगूं? त्यांच्या वीरत्वाचें वर्णन कसें करूं? त्यांची असीम वीरता पाहून आणि अद्‌भुत वीरावेश बघून शत्रुसेनेमध्येंसुद्धां आश्चर्योद्गार आणि धन्योद्गार निघाले! द्वाराशीं भिडलेल्या शत्रुसेनेंतून अेकहि वाचला नाहीं!" वीरवर गोरांच्या वीर पत्नीनें समाधानाचें स्मित केलें आणि म्हणाली "आतां मला जर विलंब लागला तर माझे प्रियकर माझा तिरस्कार करतील! तेव्हां बाळ बादल! मी आतां जाते. देव तुझें कल्याण करो."

अिकडे हुतात्मा गोराच्या प्रेतसंस्काराची चिता पेटविली गेली होतीच. सर्वांचा प्रेमाचा निरोप घेअून ती वीरपत्नी सती गोरावीराला भेटण्याला अुत्साहभरानें धांवत जाअून अग्निकुडांत अुडी घेती झाली. अग्नि-ब्राम्हणांचे साक्षीनें विवाह झालेला होता. शत्रुयुद्धांत अभिमुखमरणानें हुतात्मा झालेल्या त्यांच्या वीरपतीनें अिहलोक सोडला. हा झालेला वियोग तोडून पुन्हां पतिभेट व्हावी यासाठीं ब्राम्हण—अग्नीच्या पुनःसाक्षीनें अग्निज्वालांच्या पावन वाहनावर आरूढ होअून स्वर्गस्थ गोरावीराला भेटण्याला सती गोरापत्नी निघून गेल्या.

चितोडगड ४ वेळां अुजाड झाला. त्यापैकीं ही अेक वेळ होती. राजपूत या प्रसंगाला अर्धा म्हणतात. कारण ३ वेळां चितोड शत्रूचे हातीं सांपडला होता. यावेळीं शत्रूला परतावें लागलें अितकेच. पण चितोडचा मनस्वी नाश झाला. यावेळीं ज्या ज्या साहसी वीरांचा संहार झाला ते सर्व निवडक निवडक होते. आणि अशा या निवडक वीरपुरुषांचा झालेला संहार लवकर भरून निघण्यासारखा नव्हता. सर्व कर्ता पुरुष कापला गेला. हा झालेला भयंकर संहार भरून निघण्यापूर्वी चितोडवर पुन्हां दुष्ट मुसलमानांचें आक्रमण झालें. अल्लाहुद्दीन जो परत गेला तो चितोड नि चितोडवरील देवता महाराणी पद्मिनी यांचा नाद सोडून द्यावयाचा म्हणून परत गेला नसून पुन्हां प्रचंड सैन्याची जमवाजमव करून यशस्वी आक्रमण करतां यावें म्हणून परत गेला होता. तो पुन्हां प्रचंड सेना घेअून चितोडवर चालून आला. आतां यावेळीं चितोडचें रक्षण करावयाला वीरसेना कोठून मिळणार? जेवढा म्हणून लढवय्यावीर होता तेवढा सर्व मागचे निकरीं कामीं आला होता. जवळच्या दक्षिण बाजूची पहाडी हस्तगत करून तेथें बादशहानें आपला तळ ठोकला. त्यानें आपले तळाभोंवतीं एक खंदक खोदून आपल्या सेनेची सुरक्षितता करून घेतली आणि चितोडच्या दुर्गाला पूर्ण वेढा दिला. असें हें महान संकट अुपस्थित झालें. बाहेर प्रचंड सेनेसह शत्रूचा वेढा—आंत

वीरगणांचा युद्धार्थ तुटवडा! कसें होणार?. संकटापन्न झाला तरी सिंह सिंहस्वभाव कसा विसरेल? हिंदुत्वरक्षक क्षत्रियगण स्वातंत्र्याची क्रीडाभूमि झालेला चितोड काय विनाप्रतिकार–विनाविवाद–शत्रूच्या हातीं लागूं देतील? अशक्य! जोंपर्यंत वीर्यवान राजपूतांचा अेक वीर जिवंत असेल आणि त्याच्या धमनींत जोंपर्यंत रक्ताचा अेक बिंदु तरी प्रवाहित होत असेल तोंपर्यंत–राजपूतांच्या देहांत प्राण आहेत त्यावेळेपर्यंत–तो भागूबाअी होअून छपून बसणार नाहीं–अत्याचारी देशशत्रूच्याविरुद्ध रणक्षेत्रांत खड्गधारी झाल्यावांचून रहाणार नाही.

चितोडवरील या महाभयाण संकटसमयाला चारीबाजूला यशाचा संभवहि दिसत नसतां युद्धाकरितां आणि आक्रमक अत्याचाऱ्यांचा घेतां येअील तितका बदला घेत त्याचें अजूनहि शक्य तितकें पारिपत्य करण्याकरितां चितोडवरील प्रत्येक वीर सज्ज नि अधीर झाला. सर्वांनीं युद्धाचा कृतनिश्चय केला. यावेळीं राजपूत वीरांच्या मागील पराक्रमाच्या प्रखर ज्वालांनीं पोळलेल्या अल्लाहुद्दीनला अेकाअेकीं अुघड चाल करून चितोडवर चढून जाण्याचें धैर्य होअीना. तोहि बेताबेतानें, साधेल तसतसें, अंगावर फारसें संकट ओढवून न घेतां युद्धक्रम चालू ठेवीत होता. राजपूतांचे अचानक छापे यावेत, थोडीशी काटाछाट व्हावी, पुन्हां थांबावें. याप्रमाणें चाललें होतें. अशा प्रकारें वेढा देअून हाडें खिळखिळीं करावयाचीं नि मग शक्य दिसेल तेव्हां चितोडवर चाल करावयाची अशा प्रकारें युद्धाचा कार्यक्रम अल्लाहुद्दीननें आंखला. यावेळीं चितोडवर अेक विशेष घटना घडून आली, ज्या घटनेसंबंधीं कांहीं प्रारंभिक स्पष्टीकरण आवश्यक आहे.

प्रत्येक मनुष्य झालेल्या ज्ञानाचे अल्पशा पुंजीच्या बळावर आपणाला सर्वज्ञ मानतो, आणि त्याच्या कक्षेंत न येण्यासारख्या अथवा त्या ज्ञानाचे पायावर अुभारलेल्या तर्कांच्या आटोक्यांत न सांपडण्यासारख्या सर्व गोष्टींना अगदीं पूर्ण निश्चिति पटल्यासारख्या पण वास्तवतः खोट्या अभिनिवेशानें

"अगदीं खोट्या", "सर्वथैव अविश्वसनीय", "असंभवनीय" अशा मानतो. अनंत कालांतील अनंत शक्तिमय जगांत केव्हां कोणती शक्ति कोणत्या स्वरूपांत कशी प्रकट होओील वा प्रकट केली जाओील याचा थांग कोण लावूं शकेल ? ज्या गोष्टी ५० वर्षांपूर्वी भंगडाच्या भंगड तारेंतसुद्धां त्या भंगडाला खऱ्या वाटल्या नसत्या त्याच गोष्टी आज आपण प्रत्यक्ष घडलेल्या आणि घडवलेल्या पहात आहोंत. जगाच्या भौतिक, मानसिक नि बौद्धिक क्षेत्रमधील सहस्रशः शक्ति नि रहस्यें प्रकट होण्यासाठीं अनुकूल संधीची वाट पहात बसलेलीं असतात. त्या त्या क्षेत्रांतील त्या शक्ति वा रहस्यें बघणारा द्रष्टा जेव्हां जेव्हां योग्य मनस्थितींत असतो, त्या त्या वेळीं त्या त्या क्षणांच्या मनस्तलाच्या योग्यतेप्रमाणें तें मन त्या त्या स्थितीमध्यें प्रकट होणाऱ्या शक्तींना वा रहस्यांना जाणूं शकतें. नवीन शक्ति वा रहस्यें प्रकट होण्यापूर्वी त्या त्या गोष्टी जगांत कोठेंच दिसणाऱ्या नसतात. त्या नव्हत्या नि नसतात म्हणून त्यावेळीं कोणी त्या असल्याचें आपल्या कल्पनाशक्तीनें वा साक्षात्कारानें जर शक्य नि सत्य म्हणून प्रतिपादेल तर त्या सर्वथैव सत्य म्हणून ठरवणें जशी आंधळीं मान्यता होओील त्याचप्रमाणें 'अगदीं खोटें' पणाचा आरोप करणेंहि अहंमन्य मूर्खता ठरेल. मानसिक जगतांत पुष्कळ अशा गोष्टी घडतात कीं सर्वांना सर्व वेळीं त्या प्रत्ययाला येणें कठिण असतें. पण येवढ्याच कारणासाठीं त्या खोट्या म्हणून शहाणपणाचा डौल मारणें हें अवैज्ञानिक मूढवृत्तीचें द्योतक ठरेल. आरंभीं आरंभीं भौतिक शास्त्रवाद्यांना फोलकट भाकडकथा वाटणाऱ्या पुष्कळशा मानसिक नि आत्मिक जगांतल्या गूढ गोष्टींची सत्यता पाश्चात्य परिशोधकांना मान्य होऊं लागली आहे. प्रत्येकानें सत्यान्वेषणी बुद्धि राखावी हें अवश्यक. पण याचा अर्थ असा नाहीं कीं आपल्या ज्ञानाच्या वा तर्काच्या कक्षेंत न येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला अविचारी झोकानें 'सब झूट' म्हणावें ! यापुढें जी घटना दिली आहे ती कशी घडली असेल ? कां घडली असेल ? सर्वत्र नि सर्व काळीं असें कां घडत नाहीं ? अित्यादि गोष्टींचा ऊहापोह

करणेचें हें स्थळ नाहीं नि शक्तीहि नाहीं. केवळ झालेली घटना देणें अेवढेंच येथें करावयाचें आहे. पण वाचकांनीं ही केवळ दंतकथा असून सर्वस्वी झूट आहे असें समजूं नये. चिकित्सक बुद्धीनें या वा अशाच घटनांचें रहस्य जाणण्याच्या अिच्छेनें चिकित्सापूर्वक परिशोधन करावें. पण केवळ अहंमन्य अैटीनें त्या अैतिहासिक पुरुषांकडे "भोळसट मूर्खपणा" म्हणत अनादरानें पाहूं नये. यासाठीं प्रास्ताविक थोडेसें लिहावें लागलें. जिच्यासंबंधीं हें स्पष्टीकरण केलें ती घटना पुढील प्रमाणें घडली.

"भोवतालीं अल्लाहुद्दीनचा वेढा पडलेला आहे. तो वेढा अुठवण्याचें सामर्थ्य आपणांत नाहीं. तो वेढा फोडून निसटून जाण्याचीहि शक्ति नाहीं ! कदाचित् तसा प्रयत्न केलाच तर चितोड शत्रूच्या हातीं पडेल ! जिवंत असेपर्यंत तो अपमानाचा डाग लागूं द्यावयाचा नाहीं. शिसोदिय वंशातील राजपुरुष आणि त्यांचे सामंत सरदार नि सैनिक यांपैकीं अेकजणहि जिवंत आहे तोंपर्यंत चितोड–स्वातंत्र्याचा ध्वज आकाशांत अुंचपणानें स्वाभिमान-पूर्वक फडकतच राहिला पाहिजे. जिवंत राजपूत रक्त अंगात वाहत आहे असा अेखादा देहसुद्धां जोपर्यंत अुभा आहे तोंपर्यंत चितोडचा स्वातंत्र्यध्वज नि स्वातंत्र्यमंदिर चितोड हे शत्रूपुढें नमणार नाहींत. शत्रूचे हातीं जाणार नाहींत. तेव्हां येथून निसटून जाण्याचाहि प्रश्न संपला !! मग काय करावें ? चितोड कसा वाचेल ? हिंदुस्वातंत्र्याचें पुढील भवितव्य काय आहे ?" अित्यादि मनोदाही चिंतायुक्त विचारांच्या धक्यांनीं आंदोलितमनस्क होत असलेले महाराणा लक्ष्मणसिंह आपल्या विश्रामभवनांत अर्ध्या रात्रीं बसलेले होते. चारी बाजूंना सर्वत्र शांत नि स्तब्ध होतें. चोहोबाजूला घोंघावणारा वारा मधून मधून विश्रामभवनाच्या द्वारांना धक्के देअी त्यावेळीं होणारा द्वारांचा ध्वनि नि रानांत दूर असणाऱ्या कोल्ह्यांची मधून मधून होणारी कोल्हेकुअी यांवाचून कांहींहि शब्द अैकूं येत नव्हते, प्रतिदिवशीं सरदार आणि सैनिक मारले जात आहेत, चितोडच्या भाग्यलक्ष्मीचे दुर्दिन जणूं जवळ

येत आहेत, चारी बाजूस संकटाचे पर्वत दिसत आहेत, १२ राजपुत्रांतून अेक तरी शिसोदीय वंश चालविण्यास जिवंत राहूं शकेल काय याची शंका अुत्पन्न झालेली, या विपत्तींचा विचार मध्यरात्रीं करीत नि अुपाय–चिंतन चिंतीत महाराणाजी विमनस्कसे बसले आहेत अशावेळीं अेकाअेकीं "मैं भूखी हूं"! (मी भूकेली आहे!) अशी घनगंभीर पण भयद वाणी त्यांचे कानावर आली. हे शद्ब अेकतांच महाराणाजींचे सर्व विचार नाहीसें होअून ज्या दिशेनें तो शद्ब आला त्या दिशेकडे ते न्याहाळून पाहूं लागले. तोंच तेथील मंद दीपप्रकाशामध्यें चितोडची अधिष्ठात्री देवता भयंकर रूप धारण केलेली अशी दगडी खांबाच्यामध्यें प्रकट झालेली आहे असें त्यांना दिसलें.

अत्यंत शोकपूर्ण शद्बांनीं महाराणांनीं विचारलें "अद्याप तुझी भूक शमली नाहीं! मागच्या प्रसंगीं आमच्या राजवंशांतील ८००० वीर पुरुषांनीं रणांगणांत आपले प्राण अर्पण केले आणि तरीहि तुझ्या या भयंकर खपराची (आधाशी पोटाची) खाअी भरली नाहीं काय! येवढयानें-सुद्धां तुझी रक्ताची दारुण तृष्णा शमलीच नाहीं कां?" "मी राजबलींची अिच्छा करीत आहे. राजमुकुटधारी बाराहि राजकुमार चितौड रक्षण करण्याकरितां म्हणून संग्रामांत प्राण देणार नाहींत तर मेवाडराज्य शिसोदीय कुलाचे हातीं राहणार नाहीं" असें म्हणून ती देवतामूर्ति अंतर्हित झाली–अंतर्धान पावली.

कल्पनेपेक्षांही संकटापन्न स्थिति आल्यासारखें महाराणांना वाटलें. त्या सबंद रात्रभर त्यांना झोंप आली नाहीं. प्रातःकाल होताच सर्व सरदार सेनाधिपतींना बोलावून रात्रीं घडलेला अद्भुत वृत्तांत त्यांनीं सर्वांना सांगितला. पण सरदारादि लोकांचा त्यांवर विश्वास बसला नाहीं. सर्वांना वाटलें कीं महाराणाजींच्या चित्तभ्रमानें हें दृश्य त्यांचेपुढें अुभें केलें नि त्याप्रमाणें सर्वांनीं महाराणाजींना बोलूनहि दाखविलें. महाराणा म्हणाले, "तुम्हांला विश्वास वाटत नाहीं. त्याला माझा निरुपाय आहे. तर असें

करा कीं आज मध्यरात्रीं तुम्हीहि तेथें असा. बघूं देवीजी पुन्हां प्रकट होतात कीं नाहींत तें !" सर्वांनीं ही गोष्ट मानली. आणि त्या दिवशीं रात्रीं महाराणांच्या विश्रामभवनांत सर्वजण जमले. त्या रात्रींहि पुन्हां तेंच दृश्य सर्वांपुढें अुभें राहिलें. देवी पुन्हां प्रकट होअून म्हणते "जरी प्रत्येक दिवशीं हजारों हजार मुसलमान रणांत पतन पावतात तरी मला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे? प्रत्येक दिवशीं राजकुमाराला राज्याभिषेक करून छत्रचामरादि राजभूषणांनीं भूषित करा, राजसन्मानांनीं वागवा; तीन दिवस त्याची आज्ञा पालन करा आणि चवथे दिवशीं तो संग्रामांत जाअून भाग्याज्ञेचें त्याला पालन करूं द्या. याप्रमाणें बाराहि संग्रामभूमीमध्यें आपले प्राण अर्पण करतील तरच मी राहूं शकेन!!" अितकें सांगून देवी-दृश्य पुन्हां अंतर्हित झालें. सर्व सरदारगण विस्मित आणि चकित झाले. कोणालाहि त्या प्रत्यक्ष दृश्याची शंका राहिली नाहीं. वीरहृदय नि सत्वगुणी राजपूतांना देवीदर्शन होणें असंभवनीय नाहीं. देवतेच्या या अपूर्व प्रकटनावर राजपूतांचा दृढ विश्वास आहे. हा विश्वास नष्ट होणें अशक्य आहे. विशेषतः चितोडचे अधिष्ठात्री चतुर्भुजादेवीनें चितोडदुर्ग सोडण्याचा हेतुवाद दाखवल्या-वर स्वदेशप्रेमी, तेजस्वी नि निर्मलचित्त राजपूताचें वीरचरित्र आणि त्यांचे संस्कार यांचें अनुसारें ही गोष्ट झाली असल्यास कांहीं शंका घेण्याचें कारण नाहीं. भगवतीजींची आज्ञा जरी अशी कठोर होती तरीहि राजपूतगण त्या आज्ञेचें पालन करण्यास अुत्कंठित झाले. "आम्हीं जिवंत असतां दुष्ट यव-नांचा दुर्गप्रवेश व्हावा—त्यांनीं सर्वस्व लुटावें—आपल्या प्राणाधार स्त्रियांचें सतीत्वधन हरण करावें! अशक्य." समस्त राजपूतगण अेकत्र झाले. भगवान् अेकलिंगजींची शपथ करून चतुर्भुजादेवीच्या आज्ञेचें पालन करण्याची त्यांनीं प्रतिज्ञा केली आणि 'देहांत प्राण आहे तोंपावेतों चितोडांत या धर्म नि राष्ट्रशत्रु मुसलमानांचा कधींहि प्रवेश होअूं देणार नाहीं.' हा कृतनिश्चय त्यांनीं धारण केला.

महाराणाजींच्या मुलांत देवीची आज्ञा पालन करण्याकरितां पहिल्यानें कोणी युद्धाला जावें यावर वाद माजला. सर्वांत वडील मुलगा अरिसिंह यानें "मी सर्वांत वडील तेव्हां माझें पहिलें कर्तव्य म्हणून मी आज्ञापालन पाहिल्यानें करीन." असें म्हणून पुढे पाऊल ठेवलें. त्याला राज्याभिषेक झाला. तीन दिवस हे अरिसिंह महाराणा राज्यकर्ते म्हणून वंदिले गेले. चवथे दिवशीं हा तरुण महाराणा शत्रुसैन्यावर कांहीं सैनिकांसह तुटून पडून मुसलमानांच्या दलाला मारीत पिटीत आंत घुसला, आणि मुसलमानांना यमसदनीं पाठवीत पाठवीत जणूं त्यांच्या प्रेतांच्या पायऱ्यांवरून हुतात्मतेच्या दिव्य स्वर्गीं जाऊन पोचला. अरिसिंह महाराणा रणांगणावर स्वर्गवासी झाले. त्यांचे मागून त्यांचा धाकटा भाऊ अजयसिंह याची पाळी आली. या अजयसिंहावर महाराणाचें प्राणाधिक प्रेम. त्याच्या हुतात्मतेला महाराणा अनुज्ञा देईनात. पितापुत्रांत खूप वाद झाला. जों जों अजयसिंहाचा हुतात्मतेचा निश्चय अधिकाधिक प्रकट होऊं लागला तों तों महाराणा लक्ष्मणसिंहाचें मोडा घालण्याचें मान वाढत चाललें नि शेवटीं महाराणा नात्याच्या आज्ञेच्या बळावर आणि पित्राज्ञेच्या अधिकाराचा अुपयोग करीत अजयसिंहाला महाराणानें मागें हटविला. तेव्हां अर्थात् तिसऱ्या पुत्रावर पाळी आली. पुत्रप्रेम आडवें येऊं लागलें. पण देवीची आज्ञा मानावयाचीच म्हणून पुढील १० मुलांनीं अेकामागून अेकाचा राज्याभिषेक व्हावा–तीन दिवस त्यांनीं महाराणा नात्यानें राजमान घ्यावा नि चवथे दिवशीं मोठ्या अुत्साहभरानें रणांत शत्रूसैन्यावर अुडी घेत मारीत मारीत मरणाचे द्वारें धर्म नि राष्ट्र शत्रुहन्त्याला मिळणाऱ्या श्रेष्ठ गतीला पात्र व्हावें असें चाललें. याप्रमाणें ११ महाराणापुत्र तीन तीन दिवस राज्याधिकारी होअून रणयज्ञाच्या व्रताला अनुसरत शत्रुसैन्याच्या असंख्य आहुति देअून स्वतः अग्निमय देहानें दिव्यलोकींचे अधिष्ठाते झाले. आतां शेवटीं अेक अजय काय तो अेकटा राहिला. महाराणांचें प्रेम अजयवर अत्युत्कट. "माझ्या प्राणांत प्राण आहेत तोपर्यंत अजयला युद्धांत मी पाठवणार नाहीं." हा महाराणाजींचा दृढनिश्चय. "अजय गेला तर वंशवेल कोणाच्या आधारावर

अुभा राहील ? पितृपुरुषांना पिंडदान कोण करील ? अजयसिंह संग्रामांत गेला तर शिसोदीय कुळ नष्ट होअील. वीर बाप्पारावळच्या वंशांत पितृ-पुरुषांना ओंजळभर पाणी द्यावयालाहि कोणी पुरुष अुरणार नाहीं. मग कसें होअील ? यवनांच्या हातून परमपवित्र चितोडपुरीचा कोण अुद्धार करील ? या गिल्हौट ( शिसोदिय कुलाचें दुसरें नांव ) कुलाला अनंत नाशापासून वाचवील असा कोण आहे ? अजय रणांत जाणार नाहीं—त्याचें स्थलीं मी रणांत जातों " असें बोलून त्यांनीं सर्व सरदारांना जवळ बोलावलें नि म्हणतात " माझें आयुष्य संपलें. यावेळीं चितोडपुरीच्या रक्षणार्थ रणांत मी जाणार आणि आपल्या प्राणांचा बली देणार ! "

आपल्या हृदयांतील अुष्णोष्ण रक्तदान करून देवीची रक्तपिपासा तृप्त करण्याकरितां महाराणा लक्ष्मणसिंह सिद्ध झाले. पण आतां महाराणा नि महाराणाजीबरोबरच सर्व चितोडगडवासी राजपूतगण या युद्धाच्या यज्ञ-कुंडांत जाअून अुडी घेणार. चितोडवरील वीरमात्र नष्ट होणार ! मग मागील रहाणारांची—स्त्रीधनाची—काय गति होअील ? तेव्हां रणांत अुतरावयाचे आधीं जोहार व्रताचा स्वीकार केला पाहिजे. आतां शेवटच्या पूर्णाहुतीची वेळ आली. आणि म्हणून त्या भयंकर जोहारव्रताची अत्यंत अवश्यकता आहे. आपल्या सतीत्वाचें नि स्वातंत्र्यधनाचें रक्षण व्हावें म्हणून स्त्री-वर्गानीं अग्निकुंडांत अुडी घेऊन स्वर्गमार्गस्थ व्हावें नि वीरवर्गानीं रणकुंडांत अुडी घेअून शत्रूंच्या सैन्यांत हाहाःकार माजवीत शत्रूंच्या भयंकर संहारानें रक्तनदी वाहवावी आणि त्या शत्रुरक्तनदींतून पोहत पोहत स्वर्गाचे दरवाजे फोडून स्वर्गमार्गस्थ झालेल्या वीरयुवतींच्या आधीं स्वर्गात जाऊन त्यांचें स्वागताला सिद्ध व्हावें असें ठरलें. हें भयंकर जोहारव्रत आहे. धर्म नि राष्ट्र-शत्रूंशीं होणाऱ्या भयंकर युद्धाचे समयीं जेव्हां जयाची आशा सर्वस्वीं नाहींशी होते नि अेक तर शरण वा मारीत मारीत मरण यांवाचून दुसरें गत्यंतर अुरत नाहीं त्यावेळीं—आशेच्या अंतसमयाला शरणमयजीवनाला

तुच्छ करून जोहार व्रताचें अनुष्ठान करीत मारीत मारीत मरणाच्या दिव्यमार्गाला राजपूत अनुसरतात. कारण त्यांना माहीत असतें कीं शरणमयजीवनाच्या अंतीं नाटकी मृत्यूचें स्थान मिळतें परंतु मारीत मारीत मरणाच्या मार्गांतूनच चिरंतनपणें तेजस्वी जीवनाचा जिवंत स्वर्ग सांपडतो. वीरहृदय नि विरवृत्त हिंदु क्षत्रियगण–राजपूतलोक–दिव्य चिरंतन मार्गाचाच अवलंब करतात. ती वेळ चितोडगडच्या या तेजस्वी राजपूतांवर या प्रसंगीं आली आणि त्यांनीं जोहार व्रताचे अनुष्ठानाचा श्रीगणेशा केला.

चितोडगडावरील राजस्त्रीवर्गाचें मंदिराच्या खालींच अेक प्रचंड भुयार होतें. दिवसासुद्धां या खोल नि सुदीर्घ भुयारांत भयंकर अंधकार पसरलेला होता. त्यांत शाल वृक्षाची खंडोगणती लाकडें भरलीं आणि त्यांना अग्नि लावून दिल्यावर ही सर्व-संहारकारी चिता जळूं लागली. चितोडवरील सर्व राजपूत स्त्रिया अेकत्र झाल्या. ज्यांचे नखहि दुसऱ्यांना कधीं दिसलें नसेल, ज्यांना आपले पुत्रबंधुगण वा पति रणशायी झाल्याचें दुःखद वृत्त अैकण्या व्यतिरिक्त दुसरें दुःख माहित नव्हतें, अशा राजपूत पुरुषांच्या अर्धांगिनी नि प्राणांहून प्रिय असा तो सुकुमार स्त्रीवर्ग त्या भयंकर चिताद्वाराकडे जावयाला निघाला. सर्व राजपूत स्त्रियांच्या मागें–त्यांची स्वामिनी दिव्यसौंदर्यशालिनी–महाराणी पद्मिनी होत्या. सर्व पुरुषवर्ग दूर अुभा होऊन निरुपायग्रस्ततेनें हें करुणदृश्य बघत स्तब्ध अुभा आहे. सुकुमार स्त्रीवर्गीयांना किंचित्‌हि झालेली पीडा ज्यांना दुस्सह होते असा हा राजपूत वीरगण यावेळीं निस्तब्धतेनें अुभा–डोळ्यांत अेकहि अश्रुबिंदु नाहीं–अुलट शत्रूवरील क्रोधा-मुळें जणूं कांहीं ठिणग्या पडत आहेत असे आरक्त नेत्र झालेला अुभा आहे, आणि या राजपूत स्त्रिया त्या अग्निकुहराकडे दृढपदानें गंभीरपणें आणि तोंडानें ‘ जोहारगीत ’ गात चालला आहे. कोणाच्या प्रेमळ माता, कोणाच्या लाडक्या भगिनी, कोणाच्या प्रियकरिणी ज्यांत आहेत असा

तो स्त्रीसमूह मृत्यूला वाकुल्या दाखवीत आपले देह अग्निसमर्पण करण्याकरितां चाललेला आहे. आणि त्यांचा बंधुवर्ग–पितृवर्ग–पुत्रवर्ग नि पतिवर्ग निरुपायाच्या निष्ठुरतेनें त्यांचें अग्निप्रवेशकार्य संपन्न झालेलें पहाण्यासाठीं अुभा आहे. त्या स्थळींच्या राजपूत स्त्रीपुरुषवर्गाच्या यथार्थ मनोवृत्तीची अंधुकशी कल्पनासुद्धां सांप्रतच्या आमच्या या दुर्बलचित्त मनाला करतां येणे सर्वथैव अशक्य आहे. त्यांच्या स्वदेशप्रेमाची केवढी थोरवी, स्वातंत्र्यभक्तीची किती श्रेष्ठता ! त्यांचा दुर्दमनीय स्वाभिमान, तेज, आस्तिक्यबुद्धि, प्रचंड अिच्छाशक्ति, स्वार्थहीनता, दैवी त्यागसामर्थ्य, अप्रतिम साहस, दिव्य वीरभाव, अित्यादि अुदात्ततम गुणराशींची यथार्थ महनीयता हीं सर्वथा वंदनीय, स्मरणीय नि चिंतनीय आहेत. ज्या देशाला, ज्या जातीला, ज्या राष्ट्राला या प्रकारच्या दैवी संपत्तीनें युक्त अशा परमश्रेष्ठ संततीचा–स्त्री-पुरुषवर्गाचा–लाभ होतो तीं जगद्वंद्य ठरतील यांत काय आश्चर्य ! धन्य भाग्य आमचें, आम्हांलाहि त्याच जातींत, त्याच धर्मांत नि त्याच राष्ट्रांत जन्म मिळाला कीं ज्या राष्ट्राला अशा दिव्य विभूतियुक्त संततीच्या पिढ्यामागून पिढ्या लाभत आलेल्या आहेत. देव करो नि जगाला दिपवणाऱ्या नि जगद्वाग्य पायाशीं शरण यावयाला लावणाऱ्या या दिव्यगुणराशी आमच्यांत पुन्हां कधींहि लुप्त होणार नाहींत अशा प्रकारें प्रकट होवोत.

महाराणी पद्मिनी–प्रमुख त्या राजपूत स्त्रिया त्या प्रज्वलित अग्निगव्हरांकडे जातांना जें गीत गात जात होत्या त्या गीतांतील कांहीं भाग येथें अुद्धृत केल्यावाचून आमच्यानें रहावत नाहीं.

## ॥ गीत ॥

*हे अगन ! अब राखो लाज हमारी ॥धृ०॥*
*हम सब बाला निपट बिहाला पतिबिन परम दुखारी ॥*
*वेग चिताधकि भस्म करो प्रभु हम सब सखा तिहारी ॥*
*सुनरे ! यवन ! अधम चंडालो ! हृदय दियो तुम जारी ॥*

*साखी सुर, प्रतिफल पाओगे भोगोगे दुख भारी ॥*
*अगन सहाय होअुं याही छिन्न पतिनसो करहु मिलान ॥*
*असहाया अबला दुख बूडी कृपा करो भगवान ! ॥*
*जग ! देख, खोलकर नयना ! हम पतिव्रत धर्म तजैना ॥*
*रवि शशि गगन सकल सुर देखो, देखो यवन अपैना ! ॥*
*तृणसम प्राण अनलमें दहनीं सतीधर्मते टरैना ! ! ॥*

मराठी वाचणाऱ्यांना समजणार नाहीं त्याकरितां प्रत्येक चरणा-चरणाचा शक्य तोंवर त्यांतीलच शद्ब ठेवून अर्थ खालीं दिला आहे.

## ॥ गीतार्थ ॥

हे अग्निदेवते ! आतां आमची लाज तूंच राख ॥धृ०॥
आम्हीं सर्वस्वी दीन अशा सर्व अबला पतीवाचून परमदुःखी आहोत !
चितेच्या अग्नींत आम्हांला तात्काल भस्म करा !

प्रभूजी ! यावेळीं तुम्हींच आमचे सखे ( कैवारी ) आहांत !
अरे ! अधम चांडाळ यवना ! अैक ! ज्यानें तुलाहि हृदय दिलें आहे ।
तो देव तुझ्या दुष्कृत्यांचा साक्षी आहे, याचें प्रतिफल तुला मिळेलच.
( आणि ) भारी दुःख भोगशील !
अग्नि आम्हांला साह्य होअून रणहत पतींशीं आमचें मीलन करो ! ! ।
आम्ही असहाय्या, अबला दुःखमग्न ( झाल्या आहोंत ),
भगवान् कृपा करा ।
जगा ! डोळे अुघडून बघ ! आम्ही पातिव्रत्य धर्माचा त्याग करीत नाहीं ।
हें चंद्र ! हे सूर्य ! हे आकाश देवते ! सर्व देवांनो !
बघा ! हे यवना तूंहि बघ ! ।
प्राण तृणासमान अग्नींत अर्पीत आहोंत (पण)
सतीधर्मापासून च्युत होत नाहीं ! ! ।

याप्रमाणें देवदेवतांना साक्षी ठेवीत, दुष्ट शत्रू यवनांना 'तुमच्या दुष्ट कृत्यांचीं दुष्टफळें भावी कालांत तुम्ही भोगाल' असें बजावीत, आपल्या अटल नि अचल पातिव्रत्यधर्माच्या अनुष्ठानाकडे सर्व जगाचें लक्ष वेधीत, आणि रणहतपतींची पुन्हां दिव्यलोकीं आम्हाला अचिरात् भेट करून दे असें भक्तसख्या भगवंताला प्रार्थीत त्या प्रज्वलित अग्निमय गव्हराकडे दृढपदानें तो स्त्रीसमुदाय जाऊं लागला. अग्निमुख गव्हराजवळ तो सतीसंघ पोंचला आणि या मृत्युलोकाकडे नुसते धावत्या दृष्टीनें पुन्हां अेकदांहि न बघतां त्या अेक अेक करीत शिडीवरून अुतरत त्या अग्निगव्हरांत सर्वजणी प्रवेश करत्या झाल्या. सर्वांचा प्रवेश झाल्यावर महाराणी पद्मिनीनें आंत प्रवेश केला आणि त्या गव्हराचें लोहद्वार धाडकन् बंद झालें.

नुसत्या कल्पनेनें कल्पितांहि हृदयाला कंप आणणारे स्वेच्छानुसारी देहबलिदान कल्पनाप्रवीण कल्पकालाहि कल्पितां आलें नसतें. देहाची ममता, भोगविलासाची अिच्छा, जीवनाची बलवती आशा, शरण गेल्यास जगांतील भोगसुखप्राप्तीचा संभव, यांपैकीं अेकअेकटी गोष्टसुद्धां मनुष्याच्या मनाला मोह अुत्पन्न करून सामान्य संकटापुढेंहि हात टेकावयाला लावते. परंतु या दिव्य घटनेंत स्वातंत्र्यनिष्ठा, राष्ट्रभक्ति, पतिव्रताधर्मव्रतस्थता, या दिव्य ध्येयांसाठीं मानवी मनाला दास करणाऱ्या देहममताजीवनाशादिक अजिंक्यवत् असणाऱ्या नैसर्गिक स्वभावांवर विजय मिळविणारी अिच्छाशक्ति किती प्रचंड असेल बरें! जगद्विजयाचें सामर्थ्य मानवी मनांत अुत्पन्न करणारी असली अिच्छाशक्ति अेखाद दुसऱ्या मनुष्यांत अुत्पन्न करणारी संस्कृति सुद्धां प्रशंसनीय ठरेल. भारतांतील अशा अनुपम सामर्थ्यधारी नि दुर्दमनीय अिच्छाशक्तीचा प्रचंड स्रोत सहस्रावधि मानवी मनांत पिढ्यान्‌पिढ्या अखंडपणें प्रवाहित करूं शकणारी संस्कृति नि ती संस्कृति अुत्पन्न करणारा तत्त्वज्ञानधारी धर्म यांची महती किती आणि कशी गावी?

या अग्निप्रवेशांत १२००० हजार राजपूत स्त्रिया शिरत्या झाल्या असा अुल्लेख आहे. वरील अग्निप्रवेश झाल्यानंतर चितोडगडावरील राजपूत वीरगण

निश्चित झाले. युद्धांत शिरल्यावर ज्यासाठीं मागे जीव ओढवला जाअील असें या जगांत कांहीं अुरलें नाहीं. अुलट प्राणप्रिय धर्मपत्नींना ज्या दिव्यलोकीं पोचविण्यासाठीं त्यांना अग्निद्वारांतून जाअू दिल्या त्या लोकीं त्यांची त्वरित भेट घेण्याची अुत्सुकता मात्र वाढलेली होती. आतां अेकच चिंता राहिली. तिचें निराकरण झालें कीं मग केवळ शेवटचा 'जयहर'! बोलावयाचा. कुमारराणा अजय सुरक्षित स्थळीं पाठवावयाचा राहिला. महाराणा लक्ष्मणसिंहांनीं कुमार अजयला पाठविण्याची सिद्धता चालविली. त्यावेळीं पुन्हां अजयनें हट्ट धरला. त्याचें म्हणणें कीं "देवीच्या आज्ञेप्रमाणें मी युद्धाला जावें." आपल्या वडिलांशीं तो कुमार तसा हट्ट धरून पुष्कळ लढला झगडला. पण अंतीं महाराण्यांनीं आपल्या पितृपदाच्या नि महाराणा नात्याच्या अधिकारानें त्याचें म्हणणें न मानून त्याला तेथून सुरक्षित जागीं पाठवावयाचेंच ठरवलें. कुमार अजयसिंह आणि महाराणाजींचा हा वाद "कोणी मरावे" या संबंधाविषयींचा होता. प्रत्येकजण मरणाचा हक्क माझा असें म्हणावयाचा आणि दुसऱ्यानें तो मानावयाचा नाहीं. कसें दिव्य दृश्य! सामान्य मानवी मनें "तूं मर—मला जगूं दे" म्हणणारीं असतात. "तूं जग—मी मरतों" असें यथार्थपणें सक्रिय म्हणणें असामान्य मनेंच वदूं जाणत. असली असामान्य मनें जितकीं अधिक अुतन्न होतात तितकीं ती जाति नि राष्ट्र अुन्नतीला नि प्रकर्षाला अधिकाधिक पात्र ठरूं शकतात.

कुमार अजयला कांहीं सैनिकगण बरोबर देअून आणि शत्रूंच्या गराड्यांतून युक्तिप्रयुक्तीनें पार करीत कैलवाड्यामध्यें पोचवून राणाजींनें त्याची सुरक्षिति निश्चित केली. आणि नंतर महाराणा लक्ष्मणसिंह पुढील सिद्धतेला लागले. वीरवर बाप्पारावळच्या वंशाचा दीप अगदींच बुझणार नाहीं. अेक वंशांकुर सुरक्षित झाला. आतां काय चिंता आहे? आतां केवळ शत्रुमारणाच्या समारंभांत भाग्यपूर्ण मरण, येवढी अेकच काय-ती गोष्ट करावयाची अुरली. सर्व राजपूतांनीं केशरी वेष धारण केले.

८०३९

ज्या वेळीं शत्रूला मारीत मारीत मरणाचें अनुष्ठान करावयाचें असतें त्याच वेळीं राजपूत केशरी वेष धारण करून खड्गहस्त होतात. राजपूतांनीं केशरी वेष धारण करीत खड्गहस्त होत चाल केली म्हणजे समजावें कीं या लोकांची जीवनाशा सोडीत ते दिव्य लोकाच्या आशेनें रणमत्त होअून शत्रूंचा करता येअील तितका विध्वंस करीत मरणाला मिठी घालणार ! चितोडगडाचें महाद्वार सताड अुघडलें. सर्व स्त्रियांनीं अिहलोक आधींच सोडून अग्निद्वारानें स्वर्गमार्ग आक्रमला होता. गडावर केवळ पुरुषवर्गच काय तो राहिलेला होता. स्त्रीवर्गानें गव्हराग्नीत अुडी घेतली तर आतां सर्व पुरुषवर्ग रणाग्नींत अुडी घेण्यासाठीं महाद्वारांतून अुतरत आहेत. हजारो राजपूत गण महाराणा लक्ष्मणसिंहासह सिंहासारखे शत्रु सैन्यावर तुटून पडले. राजपूतांच्या तीक्ष्ण तरवारींची अप्रतिहत, चौफेर गति चारी बाजूला मुसलमानांची गवतासारखी सारखी कापणी करीत होती. आणि तरीहि अगणित सैन्याचें तेवढयानें पारिपत्य काय होणार ? पण येथें जयाचा प्रश्नच नव्हता. पांडवाकडील महायोद्धा घटोत्कचानें जेव्हां कर्णाची वासवी शक्ति आपणांवर येत आहे असें पाहिलें तेव्हां वाटेल तेव्हां प्रचंड देह धारण करण्याच्या आपल्या शक्तीचा अुपयोग करण्याचें त्यानें ठरविलें. मरण निश्चित तेव्हां पडतां पडतां आपल्या वाढलेल्या पर्वतप्राय देहानें शत्रु-पक्षाकडील मारतां येतील तितके सैनिक आपल्या देहाखालीं चिरडून तरी मरावेत म्हणून देहवर्धनाच्या त्याच्या अंगीं असलेल्या शक्तीचा त्यानें अुपयोग केला. वासवी शक्ति सुटली त्यावेळीं घटोत्कच आकाशगामी होअून आकाशांतून युद्ध करीत होता. वासवी शक्ति लागून प्राणहरण करण्यापूर्वी आपला देह वाढवतां आला तितका त्यानें वाढवला. वासवी शक्तीनें त्याचें प्राणांचें हरण केलें. आणि मृत घटोत्कच वीराचे त्या पर्वतप्राय प्रेतानेंसुद्धां पडतां पडतां आपल्या त्या असह्य भारांखालीं कौरवपक्षीय शत्रु सेनेंतील शेंकडो वीरांना चेंदून मारलें. मरण वरावयाचेंच, तर आतां अधिकांत अधिक शत्रूंचे देह

फोडीत नि त्यांचे जीव घेतच मरावयाचे हें ठरवूनच प्रत्येक राजपूत वीर रणोन्मादानें धुंद होऊन शत्रुसैन्याशीं टकरत होता. मुसलमान सेनेंतील मारतां येतील तितक्या मुसलमान सैनिकांना मारीत प्रत्येक राजपूत वीर मरणाची भेट होतांच जणूं मरणाच्याच पाठीवर पाय देत मरणाची पायरी बनवून स्वर्गी चढून जाऊं लागला. अशेष राजपूतगण मारला गेला. मुसलमान सेनेला शत्रू कोणी समोर उरला नाहीं. अल्लाहुद्दीनानें विजयोन्मादांत विजयफलाच्या आशेनें दुर्गप्रवेश केला. तों आंत काय पाहिलें?

सर्व चितोडभूमी–ती अिंद्राच्या अमरावतीतुल्य वैभवशाली चितोड-दुर्गनगरी-भयंकर स्मशानभूमींत परिणत झालेली होती. चारी बाजूला प्रेतांचा खच. नगरांत जिवंत मनुष्य अेकहि नाहीं. सर्व दुर्ग निर्मनुष्य झालेला. अुन्मत्त अल्लाहुद्दीन पद्मिनीदेवीचा शोध करीत अुन्मत्ताप्रमाणें हिंडूं लागला. पण! नरपिशाच्चा! पद्मिनीदेवी तुला कशी मिळणार? ती सतीशिरोमणि सुरसुंदरी पद्मिनीदेवी आपल्या सर्व स्त्रीवर्गासह जगांतील सहृदयतेला शोकाचे पाझर फोडीत, चितोडपुरीला स्मशानरूप देऊन केव्हांच स्वर्गवासिनी झाली. तूं राख फुंकीत फीर!

ज्या गव्हरांत हा भयंकर संहार झाला त्या गव्हरांतून अद्यापही ज्वालामुखी पर्वताप्रमाणें अेकप्रकारचा धूर निघत असतो असें म्हणतात. त्या वेळेपासून त्या गव्हरांत कोणीहि प्रवेश करूं शकला नाहीं. दिवा घेऊन कोणी जाऊं लागला तर आंतील भयंकर नि प्रचंड सर्पांच्या श्वासप्रश्वासानें दीप विझून जातो. कर्नल टॉडचा त्या गव्हरांत जाण्याचा हेतु होता. परंतु त्या गव्हरांतील अनेक विषधर सर्प आणि प्राणनाशक दूषित वायु यांच्या भयानें त्यानींहि तो नाद सोडून दिला. या भयंकर संहाराच्या दिवसापासून चितोडभूमी नि हा 'जयहर' गव्हर हें अेक पवित्र क्षेत्र बनून गेलेलें आहे. शेकडो लोक येथें पवित्रस्थळ ह्या दृष्टीनें चितोडदर्शनार्थ येत असतात.

# अेक वीरबाला–हमीर माता

श्रीचितोडपुरीचे हुतात्मे महाराणा लक्ष्मणसिंहजी ह्यांनीं जेव्हां 'जोहार-व्रता'चें अनुष्ठान करावयाचें ठरवलें तेव्हां पहिल्यानें कुमारराणा अजयसिंहाला अेका सुरक्षित स्थलीं पोचवून दिल्याचें वृत्त "हौतात्म्यस्फूर्ति महाराणी देवी पद्मिनी" यांचे कथानकांत सांगितलेंच आहे. कुमार राणाला जाते वेळीं महाराणा लक्ष्मणसिंहजीनीं सांगितलें होतें कीं "तुझ्या मागून कुमार अरिसिंहाचा पुत्र राज्याधिकारी होअील." श्रीभगवतीचे आज्ञेनुसार महाराणा लक्ष्मणसिंहजींचे ११ राजकुमार महाराणा पदाधिकारी बनत अेका मागून अेक जे युद्धकार्यीं कामीं आले त्यापैकीं कुमार अरिसिंह हे महाराणाजींचे सर्वांत जेष्ठ पुत्र नि युवराज होते हें वाचकांचे ध्यानीं असेलच. चितोडपुरीच्या वरील भयंकर जोहारव्रतानंतर मेवाडाधिपत्याचा मुकुट अजयसिंहाच्या मस्तकीं चढून ते महाराणा झाले. त्यांच्या आयुष्यभरांत चितोडचा अुद्धार होअूं शकला नाहीं. राज्यांतील अेक सबंद शूर पिढीची पिढी कापली गेली. पुरेसा कोश नाहीं: हवें तितकें सैन्य नाहीं कीं ज्याचें बळावर चितोड सोडविण्याचा प्रयत्न करतां येअील. त्यांचें सर्व आयुष्य हेतुसिद्धीची चिंता आणि हेतुविफलतेचा खेद यांतच गेलें. वृद्धावस्था आली. हुतात्मा लक्ष्मणसिंहजीची पितृवाणी महाराणा अजयसिंहाला आठवत होती. वडिलांच्या म्हणण्याप्रमाणेंच घडणार असा त्यांना दृढ विश्वास होता. पण वीरलोकवासी वडील बंधु अरिसिंहजीच्या पुत्राचा–आपल्या पुतण्याचा–शोध त्यांना कसा लागणार? प्रयत्न करून सुद्धां कोठेंहि शोध लागेना. ज्या कुमाराचा महाराणा शोध करीत होते त्याचें नांव हमीर होतें. याच पुरुषानें शिसोदीय कुलाचें नष्ट-गौरव पुन्हां प्रस्थापित केलें.

हुतात्मे लक्ष्मणसिंहाचे ज्येष्ठपुत्र कुमारराणा अरिसिंह अेकदा रानांतून आपल्या मित्रवर्गासमवेत घोड्यावर बसून जात असतां समोरून अेक वनवराह

(रानडुक्कर) येत होता. वराहाची मृगया (शिकार) करणें मोठें धोक्याचें नि कठीण असतें. पण जेथें भय असेल, जें कठीण असेल, जें कष्टसाध्य असेल तेथें क्षत्रिय जाणून अुडी घ्यावयाचेच. अरिसिंहासह मंडळी वनवराहामागें लागली. अरिसिंहानें बाण मारला. पण लक्ष्यवेध अचूक झाला नाहीं. बाण न लागतां वराह जवळच असलेल्या अेका जोंधळ्याचें शेतांत घुसला. शेत राखणीकरितां तात्पुरता अेक अुंच माळा बांधून त्यावर बसून शेतकरी मंडळी शेतराखणी करीत असतात. तेथेंहि अेक माळा बांधलेला होता. त्यावर अेक शेतकऱ्याची मुलगी बसून शेत राखीत बसली होती. कुमारराणा अरिसिंहाला पाहून ती खालीं अुतरली नि विनयपूर्वक हात जोडून म्हणाली, "आपण आतां कांहींहि कष्ट घेअूं नका. मी आतां त्या डुकराला तुमच्याकडे घेअून येतें." त्या कुमारीनें जोंधळ्याचें अेक ताट अुपटलें. त्यालाच अेका टोंकाला तासून तीक्ष्ण भाल्याचें रूप दिलें. जोंधळा ८।८ हात अुंच वाढलेला होता. तो जोंधळ्याचे ताटाचा बनवलेला भाला तिनें धनुष्याला लावून अशा वेगानें नि नेमानें मारला कीं तो भाला लागतांच तो वनवराह तात्काळ तेथेंच प्राण सोडून प्रेत होअून पडला. त्या कुमारीनें तो वराह ओढीत ओढीत राजकुमारांच्या पुढें आणून टाकला, आणि लागलींच आपले कामाला निघून गेली. त्या कुमारीचें वय १०।११ वर्षांचें होतें. अरिसिंह नि त्याचा मित्रवर्ग त्या कुमारीचें शौर्य, निर्भयता नि बल हीं पाहून अत्यंत विस्मित झाले. राजपूत कुमारींचें शौर्य, बल आदिक त्यांच्या परिचयाची असून सुद्धां त्या कुमारीमध्यें तीं असामान्यपणें असल्याचें त्यांच्या निदर्शनाला आल्यामुळें त्यांना फार आश्चर्य वाटलें. ते त्याच विषयाची चर्चा करीत करीत नदी किनाऱ्यावर जाअून तेथें त्यांनीं आपला तळ दिला. भोजनाची सिद्धता अेकीकडे होत होती. दुसऱ्या बाजूला कुमारवर्गीयांचे घोडे चरत होते. आणि ही मंडळी मनोरंजनार्थ अितस्ततः फिरत होती.

भोजनाची सिद्धता झाली. कुमारांचीं स्नानें आदिक आटोपून ते भोजनास बसले. अितक्यांत अेक मातीचा गोळा राजकुमाराच्या घोड्याला

लागला आणि तत्क्षणीं तो घोडा धाडकन जमिनीवर पडला. सर्वजण चकित होऊन पहातात तों तीच मुलगी शेतमाळ्यावर चढून जोंधळे खाणाऱ्या पक्ष्यांना उडविण्यासाठीं मातीचे गोळे धनुकलीनें सोडीत आहे असें दिसलें. याच मुलीच्या मातगोळ्यानें घोडा पडला हें सर्वांच्या लक्षांत आलें. आपला मातगोळा लागून घोडा पडल्याचें त्या कुमारीच्याहि लक्षांत आलें; नि ती लागलींच खालीं उतरून राजकुमाराकडे क्षमा मागण्याकरितां आली. त्या निष्पाप कुमारीची सभ्यता, शील, निर्भयता नि सुस्वभाव पाहून ते सर्वजण मुग्ध झाले. सामान्य शेतकऱ्याचे मुलींत असल्या प्रतीचें तेज कसें असणार? हाहि विचार त्यांचे मनांत येऊन गेला. "अपराध क्षमा करण्याची तर गोष्टच नाहीं—तुझा अपराधच नाहीं." असें त्या कुमारीला सांगून त्यांनीं तिला आश्वासन दिलें; नि ती आनंदित होऊन निघून गेली.

मृगयादि आटोपून राजकुमार आपल्या स्नेहीवर्गासह राजमंदिराकडे जावयाला निघाले. तेव्हां पुन्हा ती मुलगी वाटेंत त्यांना भेटली. त्यावेळीं ती मुलगी डोक्यावर भरलेलें दुधाचें भांडें घेऊन नि दोन हातांत म्हशीच्या दोन पारडांचीं दावीं धरून चाललेली होती. कुमार अरिसिंहाच्या मंडळीपैकीं एकानें तिचें दुधाचें भांडें पाडून त्या मुलीची थट्टा करावी म्हणून आपला घोडा तिच्या रोखानें चालविला. त्या राजपूत कुमाराचा हेतु त्या कुमारीच्या ध्यानांत आला. कुमारीनें लागलींच चपलतेनें आपलें पारडूं अशा प्रकारें घोड्याच्या पुढील दोन्हीं पायांच्या मध्यें अडकविलें कीं त्यामुळें वरील थट्टेखोर राजपूत कुमार घोड्यासह जमिनीवर पडला. इतकें करून ती मुलगी आपल्या वाटेनें निघून गेली. राजकुमार अरिसिंहनें ही कुमारी कोण? कोणाची? इत्यादि शोध केला तेव्हा ती मुलगी चव्हाण राजपूत कुलाच्या चंदानी नामक उपशाखेतील एका राजपूताची मुलगी आहे असें कळलें. राजपूताची मुलगी, मग काय? तिच्याशीं राजकुमाराचें लग्न व्हावयाला काय प्रत्यवाय आहे! असा विचार मनांत आणून राजकुमार दुसरे दिवशीं आपल्या मित्रांसह त्या

राजपूताला भेटण्यासाठीं अुत्सुक झाला. राजकुमाराचा अेक मित्र त्या राजपूताकडे गेला आणि त्याला त्यानें राजकुमाराचा हेतु अुलगडून सांगितला. तो राजपूत तत्काल राजकुमाराकडे जाण्यास निघाला, राजकुमारांनीं तो राजपूत येतांच सन्मानार्थ अुत्थापन देअून त्या वृद्ध राजपूताला बसावयाला आपल्या समोरच अेक आसन देवविलें. परंतु तो वृद्ध राजपूत त्या राजकुमारदत्त आसनावर न बसतां स्वतः राजकुमार ज्या आसनावर बसले होते त्याच आसनाचे अेका टोकाला त्याच आसनावर बसला. त्याचें हें थोडेंसें अेक प्रकारानें राजकुमाराची बरोबरी करणारे वर्तन पाहून राणाकुमार अरिसिंहाच्या मित्रांना हसूं आलें. पण राजकुमार अप्रसन्न न होतां मोठ्या आदरानें आपल्या विवाहाचा हेतु त्या वृद्धाला सांगते झाले. तेंव्हां या शांत वृत्तीचें त्या मित्रांना फार आश्चर्य वाटलें. तो वृद्ध कांहीं वेळ थांबून त्या विवाहाला त्यालें आपली अमान्यता दर्शविली. राजकुमाराचें मन थोडेंसें खट्टू नि अस्वस्थ झालें. पण विधिलिखित कसें टळूं शकणार ?

ही अमान्यता दिल्यावर भेटीचें कार्यच संपलें होतें. अर्थात् ती बैठक मोडली. आणि तो वृद्ध राजपूत त्या सर्वांचा निरोप घेऊन आपल्या घरीं परत आल्यावर त्यानें झालेलें सर्व वृत्त आपल्या पत्नीला सांगितलें. राजपूत पत्नी विचारी, सुजाण नि धोरणी होती. तिनें आपल्या पतीला विवाहाला अमान्यता दिल्याविषयीं दोष दिला. आणि 'आतांच्या आतां राजपूत राजकुमार अरिसिंहाकडे जाअून अमान्यता दिल्याच्या अपराधाची क्षमा मागा' असें तिनें सांगितलें पत्नीच्या या कानअुघाडणीनें राजपूत वृद्धाचे डोळे अुघडले नि त्याच पायीं कुमारराणा अरिसिंहाकडे जाअून झाल्या गोष्टीची त्यानें क्षमा मागितली, आणि विवाहाला संमतीहि दिली. थोड्याच दिवसांनीं महाराणापुत्र अरिसिंहाचा विवाह या वीरवृत्त राजपूत कन्येशीं झाला. याच वीरस्वभावी वीरपत्नीचा वीरपुत्र हमीर होय. हिंदु स्वातंत्र्यमुकुटाची स्वातंत्र्य-दीप्ति अभंग ठेवण्यासाठीं ज्या महाकुळानें आपल्या प्रत्येक पिढी पिढींतून

स्वातंत्र्यभक्त वीरवरांचीं देणगी देण्याचें महान् महत्कृत्य आजपर्यंत केलें त्या शिसोदीय कुलाचें, महाराणी पद्मिनीच्या वेळीं कोसळलेल्या सर्व नाशकारी आपत्तींत नष्ट झालेलें वैभव पुन: स्थापित करण्याचें यश मिळवणारा वीरवर हा हमीरच ठरला. या कुमार हमीरच्या—जन्मानंतर थोड्याच दिवसांत चितोडच्या सर्वनाशाचा प्रसंग येऊन हमीरपिता राणाकुमार अरिसिंह हुतात्मा होण्यासाठीं लक्ष्मणसिंहाच्या अनुमतीनें देवी भगवतीच्या आज्ञेनुसार सिंहासनाधीश होऊन लागलींच रणक्षेत्रांत उतरले आणि धर्म नि राष्ट्रशत्रु मुसलमान सेनेमध्यें शिरून शत्रुसंहार करीत करीत देवपदाचे अधिकारी झाले. कुमार हमीर पितृसुखाला नित्याचे अंतरले. त्यावेळीं ते आपल्या वीरमातेसमागमें आपले मामाचे घरीं होते. वयाच्या बारा वर्षांपावेतों आपण ज्या वीरकुमारीच्या—वीरस्वभावा वीरकुमारीच्या—बाललीला पाहिल्या तिनेंच आपल्या कुमाराला—भावी महाराणा हमीरला—लहानाचा मोठा केला. शील, विनय, चतुरता यांचेसह निर्भयता नि वीरता या गुणांनीं युक्त मातेचा पुत्र हमीरसारखा तेजोनिधि न निपजला तरच आश्चर्य. महाराणा अजयसिंहांना या चितोडवीर अरिसिंहाच्या वीरपुत्र हमीराचा शोध ज्यावेळीं लागला त्यावेळीं त्याचें वय १२ वर्षांचें होतें. महाराणाजींना शोध लागतांच त्यांनीं आपल्या पुतण्याला—भावी महाराणापदाधिकाऱ्याला—आपल्याजवळ बोलावून आणले आणि त्याला अेक शत्रुदमनाची कामगिरी दिली. हाच त्याच्या पराक्रमकालाचा आरंभ. हमीरमाता राजपूतकुमारीनें जवळ जवळ याच वयांत वृत्तांतांत वर्णिलेले शौर्याची बालक्रीडा प्रकट केली होती. त्याच मातेचा हा पुत्र. तेव्हां त्यानें या वयांत आपला वीरपराक्रम प्रकट करण्याला आरंभ केला हें स्वाभाविकच आहे.

हिंदुकन्यकांनों ! तुमच्यांतहि वीरबाला हमीरमातेसारख्या शील, विनय, पराक्रमादि गुणांची जोपासना लहानपणांपासून तुम्हीं होऊं दिलींत तर पुढच्या पुढच्या पिढ्यांत किती तरी हमीर आपल्या राष्ट्राला देण्याचे

सत्पुण्य तुम्हीं लाभवून घेऊं शकाल. आपल्या राष्ट्राचें गतवैभव मिळवून देणारे वीरवर हमीर आपल्या देशाला–राष्ट्राला–पाहिजे आहेत. आणि तें सामर्थ्य हमीरमातेसारख्या सुशील–वीरवृत्त हिंदुकन्यकांनों ! तुमच्यांतूनच प्रकट होणारें आहे. तें सामर्थ्य प्रकट व्हावें अेतदर्थ या वीररत्न मंजूषेमध्यें वर्णिलेल्या वीरयुवती नि वीरबाला यांच्या अंगीं असलेल्या गुणांचें अनुष्ठान तुम्हींहि केलें पाहिजे. त्यांची सग्दुणसंपत्ति जसजशी अधिकाधिक तुमच्याजवळ तुम्हीं संग्रहूं लागाल तसतसे राष्ट्राचे भाग्यनिर्माते आधिकाधिक संख्येंत या राष्ट्रांत निर्माण होअूं लागतील. परमेश्वर तुम्हांला हमीरमातेसारखी योग्यता देवो नि या संकटापन्न हिंदुराष्ट्राला राष्ट्रोद्धारी हमीरांचा तुटवडा न पडो !

# रणशूरा सुंदरी तारा

प्राचीन तक्षशिला नगरीला यावेळीं तोडातंक म्हणूं लागले होते. अनहलवाडा पट्टणमध्यें ज्या चालुक्य वंशीयांनीं राज्य केलें होतें त्यांचेच वंशांतील अेका शूरथान ( शौर्यत्राणचा अपभ्रंश ) नामक राजपूतांचें हातीं तोडातंकचें स्वामित्व होतें. अल्लाहुद्दीनच्या प्रचंड आक्रमणाचे धक्यानें या वंशाचें हातून पट्टण निघून गेलें; त्यावेळीं राजपूत वंशियांनीं दुसऱ्या स्थळीं जाअून रहावयाला आरंभ केला. आणि त्याच वेळीं शूरथाननें तोडातंक स्थानावर आपला अधिकार जमविला. परंतु येथेंहि त्या पुरुषाला फार दिवस तें स्थानाधिपत्य लाभूं शकलें नाहीं. लोल अफगाणनें त्या शूरथान रावला त्या स्थानांतून जाणें भाग पाडलें. शूरथान राव विवश होअून आरवली पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या बेदनौर गांवीं येअून राहूं लागले. त्यांना अत्यंत सुंदर कन्यारत्न प्राप्त झालें होतें. पिता नि कन्या दोघेंच जण तेथें रहात असत. संकटापन्न शूरथान या कन्येकडे पाहून समाधान मानीत मोठ्या कष्टानें आपले संकटमय दिवस कसेंतरी घालवीत

होते. कुमारी तारा त्याला आपल्या आयुष्याची आशा धरावयाला अेकमेव स्थान अुरलें होतें. तारेचे जन्मापासूनचे दिवस दुःखांत गेले होते. ती वास्तविक राजकुमारी आणि त्यांतहि सोळांकी (चालुक्य वंशीयांना पुढें मिळालेले दुसरें नांव) कुलासारख्या बलवान् व पवित्र कुलांत जन्मलेली, पण दुर्दैवानें पहिल्या वैभवाचें कांहींहि चिन्ह त्यांचें जवळ त्यावेळीं राहिलें नव्हतें.

दुःखी कष्टी पिता शूरथान मुलीला थोडेसें समजूं लागल्यापासून जेव्हां तेव्हां तिला आपल्या अंकावर घेअून बसत नि तिला आपल्या पूर्व पुरुषांच्या शौर्याचीं, पराक्रमाचीं, वैभवाचीं, महत्तेचीं आणि धन्यतेचीं कथानकें पूर्वस्मृतीनें अुद्दीपित झालेल्या आणि सांप्रतच्या वैभवहीन दुर्दिनांच्या दुःख-शोकानें पिळवटणाऱ्या अंतःकरणांतील तेजस्वी, हृदयस्पर्शी, नि जिवंत अशा भाषेंत सांगत असत. कोमल वयांतील ज्या कोमल मनांत प्राचीन गत गौरवाच्या वैभवशाली अैश्वर्याचीं, पुनःप्राप्तीच्या आकांक्षेच्या कुंचलीनें स्मृतिचित्रें खोदलीं जातील आणि ज्या निर्मल मनांत सांप्रतच्या हीन दीन स्थितीचें घृणास्पद स्वरूप रेखाटण्याचा प्रयत्न होअील तीं मनें कोमल वयांतून कर्तृत्वाच्या वाढत्या वयांत वर्तमानकालीन हीन स्थितीच्या छातीवर पाय देअून पूर्वैश्वर्याच्या प्राप्तीकरितां भगीरथप्रयत्नी बनल्यावांचून कशीं राहतील ? संकटापन्न शूरथान कदाचित् आपल्या प्राणमय प्रिय कन्येच्या मनाला समर्थ बनविण्याकरितां हीं कथानकें हेतुपुरस्सर कथीत असतील. कदाचित् सुख-दुःखाचे सहजोद्गार काढावयाला हार्दिक प्रेमाचें स्थान अेका कन्येवांचून कोणतेंच अुरलें नसल्यानें पूर्वस्मृतीचीं उत्तेजनें नि वर्तमान स्थितीची दुःखमयता मनांमध्यें जी डवचळत होती ती ते आपल्या मुलीपुढें सहज स्वभावानें अुद्गारत असतील. पण अमृत, जाणून प्यालें काय किंवा न जाणून प्यालें काय, परिणाम अेकच व्हावयाचा. अमृत अमरत्व दिल्यावाचून थोडेंच सोडणार ? आपण आपल्या मुलामुलींना कावळ्या–चिमण्याचीं वा कुत्र्यां-

माजरांची कथनें मोठ्या कौतुकानें सांगत असतों. आणि जणू त्याचा परिणाम म्हणूनच सध्यां हिंदुस्थानांत कुत्र्यामांजरांचे गुणांची अथवा कावळा चिमणी-सारख्या मुलांची कांहीं वाण दिसत नाहीं–जिकडे तिकडे त्यांचाच सुकाळ आहे ! वीर शूरथानच्या कन्येमध्यें अमरगुणांचें बीज जाणून वा न जाणून पेरलें जात होतें. आणि कन्या त्याच गुणांच्या गणांनीं मंडित झालेली पुढें दिसून आली. लहानपणीं प्रेमळ पित्यानें जिवंत भाषेंत सांगितलेल्या शौर्यादि वर्णनाच्या कथांचे ठसे त्या मुलीच्या मनांत नित्याचे ठसून राहिले.

कुमारी तारा जाणती होऊं लागली तसतशी पूर्व पुरुषांच्या वेळचे स्थितीशीं आपल्या वर्तमान कालीन स्थितीची मनामनामध्येंच तुलना करूं लागली. तिचें मन तिच्या वर्तमानकालीन स्थितीच्या योगानें अस्वस्थ होऊं लागलें. कोमल अवस्थेमध्येंच तिला चिंतेनें घेरलें. कधीं कधीं तर ती फार अधीर होत असें. आपल्या दुर्भाग्याला शेकडों वेळेला तिनें धिःकार द्यावा. तिला अेकहि दिवस समाधानी स्थिती वाटेनाशी झाली. मी जर पुरुष असते तर किती चांगलें झालें असतें असें तिला वाटे. हेतु हा कीं, पुरुष जन्म असता तर शत्रुकंदनाचा नि पुनर्गौरवप्राप्तीचा प्रयत्न निर्वेधपणें करतां आला असता. तिला स्त्रीवेष, स्त्रीवर्गीय वर्तणूक करण्याचा कंटाळा येअूं लागला. तिनें लहानपणापासून अश्वारोहण विद्या ( घोड्यावर बसण्याची विद्या ) आणि धनुर्विद्या अुत्तम प्रकारें अभ्यासली. पुढें पुढें तर त्या विद्यांत ती अितकी प्रवीण झाली कीं, घोडा भरधांव फेकीत धांवत्या घोड्यावरून ती बाणानें अचूक लक्ष्यवेध करूं लागली. शूरथाननें तोडातंक घेण्याचा अनेक वार प्रयत्न केला नि त्या त्या प्रत्येक प्रयत्नाचे वेळीं ही शूर वीरबाला प्रचंड काठेवाडी घोड्यावर बसून आपल्या पित्याबरोबर युद्धामध्यें शत्रुसंहार करीत असलेली दिसत असें. तिच्या अपूर्व रणकौशल्या-कडे पाहून मोटमोठ्या वीरांनीं आपले माथे नमविले. तिचा बाण व्यर्थ जावयाचाच नाहीं. तिनें शत्रुपक्षीय मुसलमान सेनेंतील सैनिक नेमके टिपून

मारावेत. तिच्या शौर्ययशाचें वृत्त सर्व राजपूतस्थानभर फैलावलें. ती जशी अपूर्व सौंदर्यवती होती तशीच वीर्यवती नि अमोल शीलवतीहि . होती. यामुळें पुष्कळ राजपुत्रांनीं तिच्याशीं विवाहाची आशा धरली.

वीर शूरथाननें अेक पण प्रसिद्ध केला होता. " जो कोणी राजपूत मुसलमानांपासून तोडातंक स्थानाचा अुद्धार करील त्याच्याशीं वीर्यवती कुमारी ताराचा विवाह करून दिला जाअील " हा ती प्रतिज्ञा वा पण होता. हा प्रतिज्ञा अितकी कठिण होती, तोडातंक मुसलमानांच्या हातून सोडवणें अितकें अशक्यवत् होतें कीं मोठ मोठे पराक्रमी म्हणविणारे राजपूतकुमारहि वीरा सुंदरी तारा प्राप्त होण्याच्या आकांक्षेकरितांहि त्या प्रतिज्ञेचा विडा अुठविण्याला धजूं शकले नाहींत.

अशक्य गोष्ट पाहिली कीं ती अशक्यवत् नि कठिणतम दिसते याचसाठीं ती गोष्ट साध्य करूं धजावण्याचा असामान्य वीराचा स्वभाव असतो. अुदेपुरचे महाराणा **रायमल यांचे चिरंजीवांपैकीं** पहिल्यानें कुमार–**राणा जयमल** यानें ती प्रतिज्ञा पुरी करण्याचें ठरवून तो वीर शूरथानकडे जाअून आपला हेतु त्याला कळविता झाला. वीर शूरथानला आनंद झाला नि त्यानें त्याच्या प्रतिज्ञा पुरी करण्याचे प्रयत्नाला प्रोत्साहन दिलें. कुमारराणा प्रतिज्ञा पुरी करण्याकरितां सिद्धता करूं लागला. पण मनाच्या अनावर अुतावळ्या स्वभावानें त्यानें शूरथानला अपमानाचें वाटणारें वर्तन केलें. शूरथान हा दुर्दिनग्रस्त राजपूत होता तरी त्याची तेजस्विता मंद झाली नव्हती. कुमार महाराणा रायमलचा पुत्र आहे हें माहित होतें तरीहि त्याला तो अपमान सहन न होअून कुमारराणा जयमलला **मर्यादोल्लंघनाचें** लागलींच त्यानें **देहान्त प्रायश्चित दिलें.** ही गोष्ट महाराण्याला कळलीं तेव्हां त्यानें तेजस्वी शूरथानवर राग न करतां अुलट त्याचे तेजस्वितेकरता त्याला बेदनोर गांव पारितोषक दिला. ज्या गांवीं तो भाग्यहत राजपूत राहत होता त्या गांवचा तो स्वामी झाला.

कुमार राणा जयमलचा दुसरा भाअू कुमार पृथ्वीराज हा पुढें आला. त्यानें प्रतिज्ञेचा विडा अुठाविला. राजकुमार पृथ्वीराज हा अतुल पराक्रमी योद्धा होता. युद्धाचें नांव निघालें कीं याचे बाहु फुरफुरूं लागावेत. युद्ध म्हटलें कीं हा अेका पायावर सिद्ध. याची सहजक्रीडा म्हणजे युद्धच. कुमार राणा पृथ्वीराजनें राज्यामध्यें अुभ्या राहिलेल्या प्रबल प्रतिद्वंद्वींना मोठ्या पराक्रमानें महाराण्यापुढें शरण यावयाला लावलें. त्याच्या वीरत्वाची ख्याति चारी बाजूला फैलावली होती. तो कुमार पृथ्वीराज पुढें येअून प्रतिज्ञा पुरी करण्याला सिद्ध झाला आहे हें पाहून सुंदरी ताराचे मनांत अत्यंत आनंद झाला. पृथ्वीराजकुमारानेंहि कुमारी ताराचे रूपगुणांविषयीं कीर्ति अैकली होती नि म्हणून तोहि या अशक्यवत् कार्याच्या प्रतिज्ञेसाठीं प्राणपणानें पुढें सरला. कुमार पृथ्वीराज कुमारी ताराची प्रत्यक्ष भेट व्हावी म्हणून बेदनोरला जाअून वीरवृत्त शूरथानला भेटला. शूरथाननेंहि आपल्या भावी जामाताचें चांगलें आदरातिथ्य केलें. पृथ्वीराज येतांच कुमारी तारा आपल्या अभीप्सित स्वामीचे दर्शनार्थ बाहेर आली. दोघांनीं अेकमेकांकडे न्याहाळून पाहिलें. परस्परांच्या गुणांची ओळख परस्परांना होतीच. प्रत्यक्ष दृष्टादृष्ट यावेळीं झाली. आणि दोघांच्याहि मनांत भावी काळाच्या आशाविचारांचीं मनोमय दृश्यें अुभीं राहिलीं. कुमार पृथ्वीराज शूरथानकडे वळून म्हणतो " आपण कांहींहि चिंता करूं नका. थोडक्याच वेळांत तोडातंकांतून मुसलमानांना हाकून देतों. अेक सप्ताहानंतर तोडातंकांत अेकहि मुसलमान तेथें औषधालाहि मिळणार नाहीं." जाते वेळीं कुमारी ताराची भेट घेअून जाण्यासाठीं पृथ्वीराज आंत गेले व म्हणाले " सुंदरी तारा ! तुझी प्राप्ति व्हावी या आशेनें मी या कठोर कार्याला हात घातला आहे. पहा ! आशेची निराशा तर होणार नाहीं ना ? " कुमारी तारानें नम्रपणे म्हटलें " हें पहा वीरवर ! हें माझें अंतःकरण आपलेंच आहे. अनेक कष्ट आणि विपत्ति सहन करीत आपल्याच आशेवर अतूट राहिलेलें आहे. आतां केवळ अेवढेंच सांगावयाचें कीं ज्या कठोर कार्याच्या अनुष्ठानाला हात घातला आहे त्याची सांगता—त्याचें अुद्यापन—अुत्तम

प्रकारें करण्याचा प्रयत्न करावा. दुराचारी यवनांचा संहार करून ' वीरवर राजपूत ' हें नांव सार्थ ठरवावें." वीरवर पृथ्वीराज आपल्या मनाशीं योग्य संधी कोणती साधावी याचा विचार करूं लागला. नि सिद्धतेच्या प्रयत्नाला त्यानें हात घातला.

त्याच सुमारास योगायोगानें मोहरमचा सण होता. नि ही संधी चांगली आहे, याच वेळेचा लाभ घेतला पाहिजे असें ठरवून पृथ्वीराज राजकुमारानें अगदीं निवडक ५०० स्वार घेऊन तोडातंकाकडे प्रयाण केलें. आपला प्राणेश्वर प्राणावरची होड घेऊन अेका भयंकर साहसाला सिद्ध झाला आहे—निघालासुद्धां—हें पहातांच कुमारी ताराच्यानें रहावेना. तिनें पतिसमागमें—विवाह जरी झाला नव्हता तरी मनानें मनाला केव्हांच अर्पण करून घेतलेलें होतें तेव्हां आतां पतिपत्नित्वाच्या नात्याचें दृढबंधन तत्वतः होऊन चुकलें मग आतां ' पतिमार्गानुसारी पतिव्रता '—मार्ग अनुसरावयाला काय चिंता आहे असें मनांत आणून—आपल्या पितृदेवतेजवळ—जाण्याची आज्ञा मागितली. शूरथानहि थोर मनाचा असून पृथ्वीराजाचा स्वभाव, शीलआदिक त्यानें ओळखलेलीं होतीं. त्यानें आनंदानें आपल्या कन्येला आपल्या भावी पतीसमागमें युद्धार्थ जाण्याची अनुज्ञा दिली. वीरनारी ताराहि योद्धयाच्या वीरवेषानें निघाली. आज रणचंडी पुरुषवेषानें मुसलमानसंहारार्थ रणांत ठाण मांडणार आहे! आतां यवनांचें रक्षण तेथें कोण करणार ?

राजकुमार वीर पृथ्वीराज नि कुमारी वीरा तारा आपल्या निवडक स्वारांसह जेव्हां तोडातंकजवळ पोंचले त्यावेळीं सर्व मुसलमान लोक तेथील किल्यांतून डोले बाहेर आणण्याचे गडबडींत होते. पृथ्वीराजसुद्धां आपल्या दळासह त्यांच्यांतच जाऊन मिळाला. ही नवी मंडळी मुसलमानांत जाऊन मिळाली त्यावेळीं त्या मुसलमानांचें लक्ष आपल्याच गडबडींत असल्यामुळें या नवागतांकडे तें मुळीच वेधलें गेलें नाहीं. आणि हें आपल्या राजपूत वीरांच्या पथ्यावरच पडलें. हळूहळूं डोला बादशहाच्या महालापर्यंत आला.

त्यावेळीं आपल्या वाड्याच्या सज्यांत डोल्याचे मिरवणुकींत जाण्यासाठीं वस्त्राभूषणानें तो सजत होता. त्या समाजांत अनोळखी नवीन स्वार पाहून त्याच्या मनांमध्यें नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या. आणि जसजसा तो डोल्यांच्या मिरवणुकीचा समाज जवळ येत चालला तसतशी त्या कल्पनांना संशयाचीं पुटें चढूं लागलीं. तो त्या अनोळखी स्वारांची माहिती काढण्याचे विचारांत होता तोंच वीरनारी तारानें आपला अचुक लक्ष्यवेधी तीर मारला. तो तीर त्याच्या अंगांत प्रवेश करतो न करतो तोंच वीर पृथ्वीराजांच्या हातांतून बादशहाच्या अंगावर येणारा शूल त्याचे प्राणहरण करून त्या बादशहाला प्रेतलोकाला पोचविता झाला. हा अत्यंत अनपेक्षित झालेला धांवा–आणि तोहि प्रत्यक्ष बादशहावर झालेला यशस्वी धांवा–पाहून मुसलमानांमध्यें अेकच हलकल्लोळ झाला. आपल्या मोहरमाच्या समारंभांत नटून थटून गंमत करावयाला म्हणून आलेले मिय्याजी प्राणभयानें चारीबाजूला प्राण घेअून पळूं लागले. पण पळणार कोठें ? पृथ्वीराज–तारा नि त्यांचे सैनिकगण यांनीं चारी बाजूला घोडदौड करून मुसलमानांचा सप्पा अुडविण्याचें कार्य आरंभलें. याप्रमाणें हाणामारी करीत नगराच्या तोरणद्वारापर्यंत ते पोचले. तों तेथे अेक प्रचंड मदमत्त हत्ती आपली सोंड हालवीत दार अडवून अुभा होता. हें पहातांच या रणपटु तारानें आपल्या जवळचा परशु काढून त्या परशूनें त्या हत्तीची सोंड अुतरली. हत्तीला दारुण पीडा झाल्यानें तो चीं चीं करीत मागें फिरला. आणि मार्ग मोकळा झाला. नगरामध्यें या अेकाअेकीं झालेल्या आक्रमणाची बातमी आधीं समजल्यामुळें नगरवासी मुसलमान लोक लढण्याला सिद्ध झालेले होते. ते सर्व अफगाणी मुसलमान जीवाभावाची माया सोडून पृथ्वीराजवर चालून आले. नगरमार्गांत चारीबाजूला या राजपूत-मुसलमानदलांत घनघोर असा तुमुल संग्राम चालूं झाला. कांहीं वेळ अशी धुमश्चक्री चालली. पण पृथ्वीराज आणि

तारा ही जोडी कांहीं सामान्यापैकी नव्हती. या रणपंडित पृथ्वीराजाच्या व रणपंडिता कुमारी ताराच्या अपरिमित शौर्यापुढें मुसलमान पठाणांचे टांके ढिले झाले आणि त्यांचा धीर सुटून मोर्चें सोडीत सैरावैरा प्राणभयानें ते पळूं लागले. पण पळून जाणार कोठें? पृथ्वीराज-तारा यांचे घोडे त्यांच्या अिच्छे-प्रमाणें वेगानें ते म्हणतील तेथें घेअून जात. घटकेंत येथें तर घटकेंत तेथें. आतां मागें तर लागलीच पुढें. ज्या बाजूला पळावें म्हणून म्हणतील त्या बाजूला हे दोघे दिसत आणि मुसलमानांचा फन्ना पाडीत. पृथ्वीराजाचे स्वार तर नगरभर पसरून जेथें मुसलमान भेटेल तेथून त्याला प्रेतलोकाला धाडीत. याप्रमाणें थोडयाच वेळांत प्रतिज्ञेप्रमाणें तोडातंक पृथ्वीराजानें निर्यवन केला. आणि पुढें तो आपल्या भावी श्वशुर शूरथानला जाअून आदरानें सर्व वृत्त कथन करता झाला. आपल्या भावी पत्नीचें—कुमारी ताराचें शौर्य, धैर्य, साहस अित्यादींचें वर्णन पृथ्वीराजाकडून आपल्या परमपूज्य पित्यापुढें होत असतां सलज्जतेनें नि नम्रतेनें तिनें त्या यशाचा भाग पृथ्वीराजाचाच आहे, मी केवळ त्यांना साह्य करावें या बुद्धीनें गेलें पण माझ्या साह्याची त्यांना अवश्यकताच नव्हती म्हटलें तरी चालेल असे अुद्गार तिनें आपले पित्याला अैकविले. शूर शूरथानला आपलें विगतस्थान परत मिळाल्याच्या सात्विक समाधानाचा आनंद झाला, आणि त्या आनंदाचें भरांत त्यानें राजकुमार पृथ्वीराज नि तारा यांना कुरवाळून पोटाशीं धरलें. "प्रतिज्ञा पुरी झाली. आतां तुमचा विवाह शुभमुहूर्तीं मी अेकदां पाहिला म्हणजे कृतकृत्य होअीन" असें तो अुद्गारला नि आनंदाश्रूंनीं पृथ्वीराजाला त्यानें निरोप दिला.

पुढें लवकरच या स्वयंवरीं मिळविलेल्या कुमारी ताराचा विवाह महाराणा कुमार पृथ्वीराजाशीं झाला. दोघेहि आनंदानें राहूं लागलीं. पृथ्वीराजाच्या आयुष्यांत अनेक रोमहर्षणकारी युद्धप्रसंग झाले आहेत. पण येथें केवळ आपल्याला चरित्रविषय रणशूरा तारासंबंधींच बघावयाचें

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

असल्यामुळें तो हृदयोत्तेजक वृत्तांत सोडून देणें भाग आहे. पृथ्वीराज-तारा आपलें गृहस्थाश्रमी आयुष्य राजपूतकुलाला शोभादायी होईल अशा प्रकारें घालवित होते. पण दुर्दैवाला हें पहावलें नाहीं. कुमार पृथ्वीराजाची बहीण शिरोहीचे राजा पाभुरायला दिली होती. त्या बहिणीचें पत्र पृथ्वीराजला आलें. राजा पाभुराय हा फार छलक, दुर्व्यसनी, कठोरवृत्त नि अुन्मत्त मनुष्य होता. तो आपल्या धर्मपत्नीचा फार छळ करी. त्या सतीनें आपल्या पतीला दुर्मार्गापासून वळवून सुमार्गाला लावण्यासाठीं नानाविध प्रयत्न केले. पण त्याचा अुपयोग न होतां त्या सतीच्या छळांत मात्र अवर्णनीय भर पडली. तेव्हां निरुपायानें तिनें समग्र वृत्त लिहून तें पत्र वीर पृथ्वीराजला पाठविलें.

राणाकुमार पृथ्वीराजनें तें पत्र समग्र वाचलें. आणि त्याला आपल्या मेव्हण्याचा अनावर क्रोध आला. तसाच तडक निघून पृथ्वीराजनें आपल्या बहिणीच्या छलकाला अुचित प्रायश्चित्त देण्यासाठीं सिरोहीचा मार्ग धरला. सिरोहीला ज्यावेळीं वीर पृथ्वीराज पोचला त्यावेळीं राज-वाड्याचें मुख्य महाद्वार बंद होतें. म्हणून जिन्यावरून चढून मध्यें आलेल्या भिंतीला आपल्या साहसीपणानें ओलांडीत आंत जेथें बहिणीचें शयनगृह होतें तेथें तो जाअून पोचला. कोमलदेही भगिनी कठोर भूमीवरच पडलेली आहे, निद्रा नाहीं, डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या आहेत, तरुण वय असूनहि तारुण्योचित सौंदर्य नष्ट झालेलें आहे, आणि ती अनाथ दीनासारखी परित्यक्त अवस्थेंत निस्सहायाप्रमाणें दिसत आहे. तशा स्थितींत आपल्यापुढें आपला भाअू वीर पृथ्वीराज अुभा असलेला पाहून त्या दुःखिनीचे दुःख अनावर झालें. तिला भडभडून आलें. आणि अितका वेळ चाललेल्या निःस्तब्ध आसवांना वाचा फुटली. तिचा तो दुःखावेग पाहून पृथ्वीराजहि देहभानावरून गेले. त्यांनीं बहिणीला सांत्वना देत क्रोधातिरेकानें अेकदम आपला खड्ग अुपसून मंचकावर निज-

लेल्या पाभुरायच्या—आपल्या मेव्हण्याच्या—गळ्यावर ठेवला. आतां पृथ्वीराजाचा खड्ग पाभुरायच्या कंठनालांत शिरणार—आपलें सौभाग्य हरपणार—पतिदेव आपल्यापासून हिरावले जाणार—या कल्पनेनें ती साध्वी अेकदम धावत येअून पृथ्वीराजाचा हात धरून म्हणते "भाअू! भिक्षा! सौभाग्याची भिक्षा घाल! मी तुला येथें माझें सौभाग्य हिरावून घेअून पतिहीना—विधवा—करण्यासाठीं बोलावलें नाहीं!!" पाभूरायहि अति नम्र भावाचा आविर्भाव आणून पृथ्वीराजापाशीं मरणभयानें प्राणभिक्षा मागूं लागला. तेव्हां पृथ्वीराज म्हणाले "जर माझ्या बहिणीचा जोडा अुचलून आपले डोक्यावर घेशील आणि तिच्या पायावर आपलें डोकें ठेवशील तरच तुला प्राणदान मिळेल. बोल! आहे मान्य?" पाभुराय हा थोर मनाचा वा मानी स्वभावाचा मुळींच नव्हता. तो हीन मनोवृत्तीचा नि दुष्ट होता. त्यानें चटदिशीं पृथ्वीराजाचें म्हणणें मान्य केलें, आणि आपली सुटका करून घेतली. पृथ्वीराजची बहिण ही अुदेपूर घराण्यांतील होती अेवढें सांगितलें म्हणजे थोर मनाची नि गुणवती महिला ती होती हें निराळें सांगावयाची आवश्यकताच नाहीं. अर्थात् तिनें पतीला अपमानकारी अटी पाळूं दिल्या नाहींत. अुलट तिनेंच त्याला वंदून सुमार्गगामी होण्यासाठीं प्रार्थना केली. पृथ्वीराजला वाटलें पाभुरायला पश्चात्ताप झाला असेल. म्हणून त्यानेंहि त्याला क्षमा करून बंधुभावानें तो त्याला भेटला नि तुला पूर्वीचे अपकारांची क्षमा आहे असें सांगितलें. पृथ्वीराज त्या नीचाला ओळखूं शकला नाहीं. कधीं तुळशींतही भांग निपजते अथवा तुळसीवनांत अेखादी मादक वनस्पती असते अशी भांगपत्री पाहूनसुद्धां शंका येत नाहीं. राजपूत स्वभाव म्हणजे अुदात्तता, थोरपणा, कृतज्ञता, शौर्य, प्रामाणिकपणा नि अवर्णनीय विश्वासपात्रता अित्यादि थोरगुणांचे आगर—हाच सततचा अनुभव. तेव्हां त्यांच्यातच मधून मधून निपजणारे अपवादी नीच-स्वभावी जीव कसे ओळखावयाचे? तेव्हां पृथ्वीराज त्याच्या वरकरणी मायावीपणाला फसले हें कांहीं नवल नाहीं. पण याच फसण्यानें पृथ्वीराजाचा

प्राणघात केला. पाभुरायनें पृथ्वीराजाला मोठ्या मायावी प्रेमाग्रहानें ४।६ दिवस आपल्या येथें राहवून घेतलें. पृथ्वीराजानेंहि मेव्हण्याचे म्हणण्याला मान देऊन ४।५ दिवस राहण्याचे ठरविलें. ४।५ दिवस आनंदांत गेले.

सहावें दिवशीं आपल्या बहिणीची नि मेव्हण्याची संमति घेऊन पृथ्वीराज परत जावयास निघाला. पाभुराय अेक विशेष प्रकारचे लाडू करावयाचे जाणत होता. तशाच प्रकारचे लाडू बनवून राणाकुमार पृथ्वीराजासही समागमें वाटेमध्यें फराळासाठीं त्यानें दिलें. परंतु त्या लाडवांत त्या दुष्टानें विष मिश्र करून ते लाडू दिले होते. हें त्या निष्पाप नि सरलमनस्क पृथ्वीराजास काय माहित? शूर, वीरवृत्त आणि पराक्रमी लोक बहुधा सरळ मनाचे असतात. दुर्बल, भित्रे, आणि स्वार्थैकवृत्त लोकांमध्यें बळ, कापट्य, विश्वासघात, आणि क्रूरता दिसून येतें. पृथ्वीराज लग्नानंतर महाराणाजीच्या आज्ञेनें कमळमेरला रहात असत. विवाहानंतरहि त्यांचें सततचें ठाणें कमळमेरलाच होतें. पृथ्वीराज आपले बहिणीचे घरून निघाले आणि कमलमेरच्या जवळ जवळ आले. व तेथें भूक लागल्यामुळें मेव्हण्यानें दिलेले लाडूंपैकीं कांहीं लाडू त्यांनीं खाल्ले. ते पोटांत जातांक्षणींच पृथ्वीराजाचें डोकें भ्रमूं लागलें. त्यांचीं सर्व गात्रें शिथिल पडूं लागलीं. मोठया कष्टानें केवळ असामान्य निश्चयाचे बळावर श्री भगवतीमंदिरापर्यंतच ते पोचूं शकले. भगवतीमंदिराच्या अंगणांत ते आले. पुढे त्यांच्यानें अेक पाऊलभरहि हालणें शक्य राहिलें नाहीं. पुढें जाऊं शकले नाहींत. अवश होऊन तेथेंच पडले. आणि आपल्या प्राणप्रिया अर्धांगिनी ताराकडे अेक मनुष्य निरोप देऊन पाठवून दिला. नगरांत निरोप पोचतांच पृथ्वीराजप्रिया तारा त्याच पावलीं वेगानें यावयास निघालीं. तारा आपल्या पतिदेवाकडे येऊन पोचण्यापूर्वीच पृथ्वीराजांचा जीव देहांत रहाणें त्या भयंकर विषाच्या प्रभावानें अशक्य करून टाकलें होतें.

तारादेवी तेथें येऊन पोचली तों आपले जीवनेश्वराचा देह प्रेत होऊन पडला आहे आणि आपल्या येण्यापूर्वींच पतिदेवाचा वीरात्मा निघून

गेला आहे हें तिला दिसलें. तिच्या शोकाची कल्पना करणेंहि कठिण. आपल्या प्राणप्रियांना रणांत मरण आल्यास राजपूत स्त्रियांना शोक होत नाहीं. पृथ्वीराजाचें मरण कशा प्रकारचें ? विषप्रयोगानें प्राण कासावीस होत आहेत, देहाला मृत्यूच्या वेदना अपरिमित वेदनाकष्ट भोगवीत आहेत, आपल्या अर्धांगीची शेवटची तरी भेट अेकदां मृत्यूनें घेअूं द्यावी म्हणून देहांतून त्या वीराचा वीरात्मा देहाला शक्य तोंवर चिकटून राहूं पहात आहे, आणि तरीहि विषाच्यां दुर्धरतेनें देहनिवास अशक्य करून टाकून पृथ्वीराजाला—आपल्या प्राणेश्वराला—अत्यंत दुःखानें नि आपल्या प्रिय तारेची दृष्टिभेटहि होअूं शकत नाहीं या असह्य निराशेच्या शोकानें देह सोडावा लागला आहे हें दृश्य—ही हृदयविदारी घटना—त्या कोमलहृदयी प्रेमस्वरूपा तारादेवींच्या मनोदृष्टीपुढें अुभी राहून त्यांच्या हृदयभूमिकेवर तिनें दुःखशोकमय धिंगाणा किती घातला असेल हें कल्पितांहि अशक्य. तत्सम सहृदयताच काय ती अत्यंताल्पांशानें कदाचित् कल्पूं शकेल.

शोकहता नि दुःखमग्न तारादेवीनें आपल्या पतीचा मृतदेह आपल्याशीं घट्ट धरून ठेवला नि कांहीं वेळ शोकमग्न ध्यानमयतेनें पतीच्या ध्यानांत ती भान विसरून गेली. तेथें अुपस्थित झालेले राजपूतगणहि त्या दृश्यामुळें गलित-धैर्य झाले. सर्वत्र दुःखाचे वारे वाहूं लागले. तत्रस्थ नरनारीगण शोकमग्न झाला. सामान्य मृत्यूप्रसंगींहि औदासीन्याचे वारे वाहूं लागतात. येथें तर महाराणाजीच्या पुत्राचा—प्रमुख राजपुत्राचा—मृत्यु. त्यांतहि पृथ्वीराजाचे अप्रतिम शौर्य, अतुल रणपाटव, अद्भुत वीरता, सरलस्वभावी मन, यामुळें सर्व राजपुतान्याला पृथ्वीराजाविषयीं दरारा, आदर नि प्रेम वाटत होतीं. आतां या सद्गुणी नि प्रख्यात वीरवर राजपूतरत्नाचा अशा करुणामयतेनें झालेला मृत्यु पाहून सर्वांना अत्यंत शोकानें विमनस्कता आली असेल तर त्यांत काय नवल ?

कांहीं वेळ तेथील सर्वजण स्तिमित नि स्तंभित होअून बसलेले होते. तोंच देवी तारानें चिता सिद्ध करण्यास आज्ञापिलें. तिचा शोकावेग पार ओसरला.

जणूं कांहीं ती आतां अिच्छित प्राप्तीच्या आशेनें आशान्वितच झालेली आहे असें दिसूं लागलें. ती रणशूरा तारा आतां मरणशूरा बनली. वीर पृथ्वीराजानें तोडातंक अुद्धार करण्याची प्रतिज्ञा केल्यापासून वीरा तारादेवीनें पृथ्वीराजाचे छायेप्रमाणें अनुगमन केलें. जेथें पृथ्वीराज तेथें तारा असावयाचीच. सुखांत–दुखांत, विलासांत–कष्टांत, बऱ्या–वाअिट दिवसांत, घरीं–दारीं पृथ्वीराज ताराची जोडी फुटली नाहीं. रणांतसुद्धां पृथ्वीराजाची रणानुसारी झाली. वीर पृथ्वीराज आपल्या बहिणीच्या हाकेसरशीं धावून गेला त्याचवेळीं काय ती पृथ्वीराजाची अर्धांगिनी त्याचेबरोबर नव्हती. तोच कायतो पहिला वियोग. पण दुर्दैवानें तो जसा पहिला तसाच या लोकांचा तो अंतिम वियोगही ठरला. महाराणा कुमार वीरवर पृथ्वीराज अेका कपटी विश्वासघात्याच्या दुष्टपणाला बळी पडला आणि त्याला अिहलोक सोडावा लागला. आपल्या प्रियतम पतीच्या दर्शनार्थ आणि पतिक्लेशांचे निवारणार्थ धांवून आलेल्या तारादेवीला पतीचें दर्शन झालें नाहीं. पतीच्या मृत्यूनंतर ती येअून पोचली. आणि पतीच्या निधनकाळीं त्यांच्या मरणक्षणापूर्वी तारा दिसावी या औत्सुक्यातिशयाच्या अिच्छेप्रमाणें त्यांना मी दिसूं शकलें नाहीं अशा अंतःकरणभेदी दुःखद विचारानें ती शोकविव्हळ झाली होती.

चिता सिद्ध झाली. ती पृथ्वीराजाची रणानुसारिणी तारादेवी आपल्या पतीच्या शवाला हृदयाशीं धरून चितेमध्यें शिरली. आणि वीरवर पृथ्वी-राजाच्या मृत्यूनंतर ही वीरा पतिव्रता तारा त्याची मरणानुसारिणी होत अग्नि मुखांत प्रवेश करून पतिभेट घेती झाली. दोघांचे अग्निरूप देह अिहलोकीं आणि दोघांचे वीरत्वतेजी दिव्यात्मे दिव्यलोकीं चमकूं लागले.

हे भगवन्! असल्या वीरात्म्यांची-दिव्यात्म्यांची या भारतभूला कधींहि अुणीव भासूं देअूं नकोस!

# श्रीचितोडवरील रणदुर्गा जवाहिरबाओी

चितोड दुर्ग हा कित्येक दशकें पर्येत हिंदुमुसलमानांच्या शातकीय युद्धाचा रणकेंद्र झाला होता. चितोड विजयासाठीं जितके वेळांच मुसलमानांचीं जितकीं आक्रमणें झालीं, चितोड–आक्रमणोच्छुक मुसलमानांचा विरोध करीत हिंदु वीरांनीं जितके वेळा चितोडरक्षणार्थ रणयज्ञ पेटविला, मुसलमानांचे असंख्य सैनिक या स्थळीं जितके मारले गेले, हिंदुवीरजाती राजपूतांनीं जितक्या हटातटानें नि प्रचंड तेजानें रणवीर्य व युद्धशौर्य दाखवून चितोड संरक्षणार्थ आपलें अगणित वीरदेह धारातीर्थी रक्तनदीला अर्पण केलें, तितकीं शत्रूंचीं आक्रमणें, तितके रणयज्ञ, तितक्या असंख्य शत्रुसैन्याचा संहार आणि तशा प्रकारच्या अगणित हुतात्म्यांचें आत्मबलिदान, चितोडव्यतिरिक्त हिंदुस्थानांत तर काय पण जगांतील सुद्धां दुसऱ्या कोणत्याहि स्थलीं नि स्थलासाठीं झाले नसतील. परंतु या महास्थलाविषयीं आणखीहि अेक महाभयंकर पण अतिदिव्य विशिष्टत्व आहे. तें म्हणजे चितोडचा जोहार! अेक वेळा नाहीं, दोन वेळा नाहीं, अनेक वेळा तो झाला आहे. सर्व स्त्रीवर्ग अग्निमुखांत देह अर्पीत आहे; तर सर्व पुरुषवर्ग रणाग्नींत देह समर्पीत आहे! जगामध्यें नि हिंदुस्थानामध्यें अनेक स्थलीं आक्रमणार्थ शत्रूची चढाअी झाली असेल, संरक्षणार्थ स्थानीय धनी प्राणपणानें लढले असतील, त्या त्या स्थानीं शत्रूंचीं हाडें मअूं करून शत्रूंचा अकल्पनीय संहार करीत त्यांना त्यांनीं परतविलेंहि असेल, आणि कधीं कधीं शत्रूकडून अनपेक्षितपणें संहार होत पराजयाच्या शोकाग्नींतही तीं स्थलें दग्ध झालीं असतील. स्वपर पक्षीय देहांच्या आहुतींनीं घडून आलेल्या रणयज्ञांनीं जीं जीं स्थलें पुनीत केलीं असतील अशा सर्व पवित्र स्थलांमध्यें ज्या स्थलांला ‘ शरण ’ शब्द स्वप्नांतहि शिवला नाहीं अशीं सद्भाग्यमंडित स्थलें सांपडणें अशक्यवत् आहे. पण हें श्री चितोडदुर्गाचें स्थल तसें आहे. या स्थलानें सर्व

प्रकारच्या आपत्तींना तोंड दिलें आहे. शत्रूंवर अतुलपराक्रमानें विजय संपादन करून विजेतेपणाचें भाग्य अुपभोगलें आहे. आणि तसेंच दिव्य हौतात्म्य दाखवीत, शत्रूंकडून होणाऱ्या पराजयालासुद्धां आपल्या वीरस्वभावी तेजस्वितेच्या योगें तुच्छ गणीत ‘शरण’ शब्दाला जाळून वीरत्वाच्या अग्निमय देहानें तेथील वीरमात्र स्वर्गवासार्थ निघून गेले आहेत. या चितोडानें ‘शरण’ शब्दाला स्पर्शसुद्धां केला नाहीं. ‘शरण’ शब्दाचा कालिमा आपल्या नांवाला लागूं न देण्याचें महद्भाग्य अेक्या चितोडावाचून अन्य क्षेत्राला लाभलेलें सांपडणें हें दुर्लभ आहे. अशा या भाग्यवान् चितोडावर आपल्याला आज रणदुर्गा जवाहिरबाअीचें दर्शन घ्यावयाचें आहे.

वीररत्न जवाहिरबाअीच्या वेळीं आलेल्या चितोडदुर्गावरील संकटापूर्वी या हिंदुराज्यावर नुकतेंच अेक मोठें संकट येअून गेलें होतें. त्या संकटांतून वीरश्रेष्ठ महाराणा **संग्रामसिंहांनीं** या हिंदुराज्याला शत्रूपासून वाचविण्यासाठीं जो भयंकर संग्राम केला होता त्या युद्धांत चितोडराज्यांतील बहुतेक वीरगण कामाला आला होता. आणि चितोडनगरीला संभवनीय संकटाचे वेळीं तिचें रक्षण करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्याला पुरेसे वीरसैनिक अुरले नव्हते. अशा वेळीं माळवा हातीं घालून बसणारा मुसलमान बादशहा **बहादुरशहा** चितोडवर चढाअी करून आला. याच्या जवळ अेक युरोपियन कुशल गोलंदाजहि होता. त्यामुळें तर या मुसलमान आक्रमणाशीं लढणें म्हणजे लांबून होणाऱ्या अग्निवर्षावाशीं लढण्यासारखें होतें. राजपूतांजवळ ती सामग्री नव्हती. त्यामुळें तर हा लढा अत्यंत विषम प्रकारचा होता. मुसलमान आक्रमक दुरूनच नाश करणाऱ्या प्राणघाती अस्त्रांसह सज्ज असलेला आणि राजपूतांजवळ समोरासमोर येअून अेकमेकांशीं भिडत युद्ध करण्याचेंच कौशल्य. राजपूतवीरगण जवळ भिडून आपल्या तरवारीचें तिखट पाणी शत्रूला चाखविण्याचें शौर्य गाजविण्यापूर्वीच मुसलमानांच्या अग्निगोलकांनीं नाश पावण्याची ही वेळ आलेली अशा विषमावस्थेंत त्यावेळीं चितोड सांपडला होता.

अशा या सर्वस्वीं विषम संकटीं चितोड काय करूं शकतो ? मुसलमानांना तोंड देणें म्हणजे निश्चित नाशाच्या भयंकर जबडयांत अुडी घेणें होतें. पण चितोड हा राजपूत सिंहवीरांची गुहा होती ! मरतां मरतां सुद्धां शत्रूच्या खांद्यावर आपला प्राणघेअू पंजा रोवून शत्रुहृदय हादरवून सोडणाऱ्या गर्जना करीतच सिंह आपल्या शत्रूला भिडणार ! त्याला 'शरणा'ची ग्रामसिंही भाषा कशी बोलतां येअील ? चितोडवर जी राजपूत वीरसेना होती तिची बहादुरशहाच्या सैन्यसंख्येशीं तुलना केल्यास ती मुठभरच भरणारी होती. संख्येने अत्यंत कमी, अग्न्यस्त्राच्या अुणीवेनें अस्त्रहीन असे ते चितोडचे राजपूत वीर या वेळीं काय ठरविते झाले ? याचें राजपूत अितिहासवाचकाला कोडें पडण्याचें कारणच नाहीं. शत्रु समोर आल्यावर राजपूताला केवळ अेक युद्धाचीच भाषा ठाअूक. शत्रु संख्येनें अधिक आहे वा भयंकर अस्त्राशस्त्रानें सज्ज असल्यामुळें अजिंक्य आहे अित्यादि विचारसुद्धां त्याला युद्धपराङ्मुखतेची भाषा मनांतही आणाविण्याला समर्थ होअूं शकत नाहींत. तेव्हां याहिवेळीं—अशा या विषम लढ्याच्या वेळीं नि आपले अल्पसंख्य वीरच आपलेजवळ असतांहि—चितोडचें वीरगणमंडळ युद्धार्थ सिद्ध झालें.

या वेळीं कैलासवासी महाराणा **संग्रामसिंहाचे पुत्र महाराणा विक्रमसिंह हे राज्यावर होते.** यांच्यांत राज्यकारभार पहाण्याचे कौशल्य नव्हतें नि अितरहीं वैगुण्यें शिरलीं होतीं. महाराणा विक्रमसिंह बुंदी राज्यांतील **लैचा** नामक स्थानीं होते. तेथें जाअून पहिल्यानें बहादुरशहानें त्यांचेवर आक्रमण केलें. महाराणांनीं वैतनिक सैनिकांची भरती करून पूर्वसैनिकांना दूर केलें होतें. महाराण्यांत अितर वैगुण्यें जरी पुष्कळ होतीं तरी त्यांच्यांत भीरुपणाचा लवलेशहि नव्हता. शिसोदिया वंशाचें अप्रतिम वीरवृत्तेचें तेज त्यांच्यांत सळसळत होतें. बहादुरशहा सन्मुख अुभा ठाकतांच महाराण्यानें त्याचेवर चढाअी चढविली. दोनही सैन्यांत हातघाअी सुरू झाली. मुसलमानांच्या अंगीं असलेल्या नैसर्गिक धर्मांधतेचा आवेश होतांच.

महाराण्याच्या पक्षाकडे वीरगण राजपूतांचे स्थलीं साधारणवर्गीय केवल वेतनार्थ नोकरी करणारेच लोक सैन्यांत असल्यामुळें मरणमारणाची घाअी चालू होतांच मुसलमानांच्या त्या धर्मांध आक्रमणाला तें भाडोत्री सैन्य रोखूं शकलें नाहीं. आणि अशा अडचणीचे वेळीं महाराणाजींचा धाकटा बंधु राणाकुमार अुदयसिंहजी यांना घेअून राजपूतगणांनीं चितोडचा आश्रय घेतला.

राजपूत राजवर्ग आपापसांत सतत भांडत झगडत असत. परंतु जेव्हां बहादुरशहानें चितोडवर धाव मारली त्यावेळीं मेवाडचें शत्रुत्व करणाऱ्या राजपूत लोकांनींसुद्धां वैर विसरून भारतवर्षाच्या हिंदुछत्रधरांच्या केंद्रस्थानीं असणाऱ्या चितोडगडाच्या रक्षणार्थ ते सर्व धावून आले. **देवलनगरचे मेवाडचे प्रतिस्पर्धी राणावंशीय वाघजी,** अति तेजस्वी नि पराक्रमी **५०० स्वार** आपले बरोबर घेअून **आलेले बुंदीचे राजकुमार,** देवल नि अन्योन्य स्थानचे अितर वीरगण मेवाडच्या केंद्रस्थानचें—हिंदुमानक्षेत्र श्रीचितोड दुर्गाचें—संरक्षण करण्यासाठीं युद्धांमध्यें येअून अुभे ठाकले.

महाराणा विक्रमसिंहाचा पराभव करून बहादुरशहा चितोडजवळ आपल्या सेनेसह येअून ठेपला. आणि चितोडवरील संख्यनें मूठभर पण सिंहहृदयी राजपूतवीरगण युद्धार्थ सिद्ध झाले. भगवान् अेकलिंगजीची शपथ घेअून "शत्रूला मारूं आणि असे मारीत मारीत मरण येअीपर्यंत लढत राहूं" अशी रण भडकविणारी प्रतिज्ञा त्या सर्व वीरगणांनीं केली. गडावरील रणभेरी आपल्या प्रचंड ध्वनीनें आकाश नादवीत रणगर्जना करूं लागल्या. या रणभेरींच्या प्रचंड ध्वनीचा पडसाद मुसलमान सैन्यांत प्रतिध्वनित झाला. पण तो प्रतिध्वनि कशाचा होता ? बहादुरशहानें राजपूत-वीरांच्या रणभेरीच्या युद्धगर्जनेला आपल्या तोफा डागून तोफांच्या मेघगर्जनेनें प्रत्युत्तर दिलें. तो नाद भयंकर होता. तोफांच्या महाध्वनीनें चारि दिशा स्तंभित झाल्या. सामान्यांचे तर कानच बधिर झाले असते. तोफांच्या ध्वनीनें चारि दिशा धुंद झाल्या

आणि तोफांचे गोळे राजपूतांचा ध्वंस करूं लागले. पण राजपूतांना त्यामुळें दुप्पट अवसान चढून तेही प्रचंड तारस्वरानें सिंहनाद करीत तोफांच्या गोलंदाजावर लक्ष्य धरून बाण मारूं लागले. राजपूतांच्या लक्ष्यवेधी वीरांच्या बाणांपैकीं अेखाद दुसराच बाण कदाचित् व्यर्थ गेला असेल. गोलंदाज मारले गेले. परंतु त्यांचे स्थळीं दुसरे गोलंदाज आले व पुन्हां तोफा सुटल्या. पूर्वीच्या तोफांच्या धुरानें धुंद झालेल्या दिशा या वेळीं धुरानें अधिक भरून गेल्या. सूर्यप्रकाशहि नष्ट झाल्यासारखा झाला. केवढा अंधकार ! कांहीं दिसेनासें झालें. धुराची गति विशेषतः वर असते. त्यामुळें गडाखालीं असलेल्या मुसलमानांपेक्षां या धुराच्या अंधकारानें गडावरील राजपूतांना अधिक प्रमाणांत कोंडून टाकलें. राजपूतांनीं गोलंदाज नेमके मारावेत नि दुसऱ्या गोलंदाजानीं पुन्हां तोफा डागून राजपूतांचा संहार करावा असें बराच वेळ चाललें. या हाणामारींत राजपूतांचीच हानि अधिक होअूं लागली.

अिकडे तोफखान्यावरील युरोपीयन अधिकाऱ्यानें दुसरा अेक डाव आरंभला होता. त्यानें चितोडगडाच्या **बीका** नांवाच्या अेका भागाचे खालीं मोठा सुरुंग खोदला आणि त्यांत दारू भरून गडाच्या कोटाला खिंडार पाडण्यासाठीं तो सुरुंग अुडवून दिला. ज्या स्थळीं हा सुरुंग खोदला जात होता त्याच स्थानावर बुंदीचा पराक्रमी राजकुमार अर्जुनराव हा आपल्या ५०० स्वारांनिशीं युद्धाला तोंड देअून लढत होता. सुरुंग अुडाला तेव्हां खालची ४३ हात जमीनही अुडाली. आणि वरील भाग कोसळला. त्याच सुरुंगाच्या प्राणघेत्या स्फोटांत **वीरकुमार अर्जुन** आपल्या ५०० स्वारांनिशीं हुतात्मा झाला. चितोडदुर्गाचा कोट बऱ्याच स्थळीं तुटला. आणि कोटाच्या त्या खिंडारांतून दुर्गप्रवेशार्थ मुसलमानी सेनेचा लोट नदीच्या पुराप्रमाणें आंत घुसावयासाठीं धावला.

चितोडपुरी अद्याप वीरशून्या झाली नव्हती. आंतमध्यें राजपूत जिवंत असेपर्यंत मुसलमानाचा प्रवेश ही गोष्ट अशक्यच. मुसलमानी सेना आंत

घुसावयासाठीं धावते आहे तोंच खिंडाराच्या तोंडीं **वीरवर दुर्गाराव** आणि दोन **चंदावत वीर** कांहीं सेनेसह येऊन खिंडार प्रवेशाला रोखूं लागले. मुसलमानांच्या सेनेनें मुसंडयावर मुसंडया मारल्या पण त्यांचें कांहीं चाललें नाहीं. प्रत्येक वेळीं मुसलमानी सेनेचा विध्वंस होत त्यांना मागें हटावें लागे. राजपूत वीरही अेक अेक करून गळतच होता. प्रचंड मुसलमानसेनेच्या अेकामागून अेक होणाऱ्या मुसंड्यांपुढें हे थोडेसे राजपूत किती वेळ टिकाव धरणार ? त्यांचीं दैवी वीरतेनें रणावलेलीं मनें मुसलमानी दुर्गप्रवेशाला रोखण्यासाठीं लढवित असलेल्या त्यांच्या भौतिक देहांना किती वेळ अुभे ठेवूं शकणार ?

सर्व राजपूत वीर रणशायी झाले. शत्रूला रणांत दुर्गप्रवेशाचें यश मिळूं नये म्हणून भीमभयंकर आवेशानें लढणारे त्यांचे वीरात्मे लढावयासाठीं म्हणून असलेले देह नष्ट झाल्यामुळें अुपायहरण होअून दुष्टनिर्दालनाच्या प्रार्थनेकरतां भगवंताकडे धाव घेते झाले. खिंडारें मोकळीं झालीं. आतां आपला मार्ग विघ्नरहित झाला समजून मुसलमान सेनेचा लोंढा मोठ्या अुत्साहभरानें प्रवेशासिद्ध होत खिंडाराकडे धावला. रणमत्त मुसलमान लोक विजयभरानें भरी भरून जयगर्जना करीत खिंडाराच्या तोंडाशीं आले. तों काय ? तेथें जें दृश्य दिसलें तें पाहून मंत्रमुग्ध सर्पाप्रमाणें ते अेकाअेकीं स्तंभित झाले. पुढें पाअूल टाकण्याचें धैर्य त्यांना होईना. असें तें दृश्य काय होतें बरें ?

केश विखरलेली, अंगांत पोलादी कवच घातलेली, शस्त्रसिद्ध असलेली आणि थोड्याशा राजपूतांना बरोबर घेअून अुभी असलेली अेक रणचंडी मूर्ति त्यांच्या दृष्टीपुढें त्यांना दिसली. मुसलमान महावेगानें खिंडारांत पाय ठेवणार तोंच ही रणदुर्गा पुढें सरसावली आणि झुंडींच्या तोंडावर असलेले नि खिंडारांत पाय घालूं पहाणारे मुसलमानांचे देह जमिनीवर लोळले. हें अितक्या झटक्यांत झालें कीं, येणाऱ्यांना तें होत असलेलें न दिसतां त्या रणदुर्गेनें पहिल्या झपाट्यांत अघाडीवरील लोकांना लोळविल्यावर

त्यांना तें कृत्य अुमजलें. ही रणदुर्गा म्हणजे **राठोडकुलांत अुपन्न झालेली शिसोदीय महाराणी जवाहिरबाअी होय.** रणदुर्गा जवाहिरबाअी रणयशाचें कंकण हातांत बांधून युद्धहोमार्थ येथें येअून ठाण मांडून राहिली. या वीरेचें वयहि फार नव्हतें. ही रणबाला आपल्या अतुल वीरत्वानें प्रचंड वेगानें अुफळलेला मुसलमान सेनासमुद्र बराच वेळ थोपवून धरूं शकली. खिंडाराच्या तोंडाशीं येणाऱ्या मुसलमानांना यमसदनीं पाठविण्याचा तिनें सपाटा चालविला. तिचा तो भीमभयंकर वेष, तिचें तें युद्धचापल्य, शस्त्रकौशल्य, मुसलमानांचा संहार करीत तळपणारी तेजस्वी मूर्ति आपल्या सेनेंत हत्तीवर बसलेला बहादूरशहा पहात होता. तो त्या वीराबालेच्या अद्भुत रणावेशाचें भीमभयंकर स्वरूप पाहून आश्चर्यचकित झाला. यवनसेनेंत वीरत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या लढवय्यांना सुद्धां वीरा जवाहिरबाअीचें वीरतेज पाहून आपल्या स्वतःच्या क्षुल्लकतेची लाज वाटली. बराच वेळ हें विषम युद्ध चाललें होतें. भोवतालचें राजपूत वीरगण अेकअेक करीत मुसलमान सेनेच्या लाटेनें गिळून टाकले. मानवी प्रयत्नाची परिसीमा झाली. आतां कांहींहि अुपाय अुरला नाहीं. गडाच्या संरक्षणार्थ अेकहि हात जवळ राहिला नाहीं. यवनसेना दुर्गप्रवेश करणार हें निश्चित. पण मग मेवाडची महाराणी जिवंत असतांना चितोड दुर्गांत मुसलमान प्रवेश होत असलेलें दृश्य सहन करूं शकेल? अशक्य! सर्वथैव अशक्य!! तेव्हां जिवंत असतां अपयशाचें मरण पाहण्यापेक्षां अपयश देणाऱ्या शत्रूंच्या जिवंतपणाला शक्य तितकें धुळीला मिळवीत यशस्वितेच्या मरणाचें महाद्वार अुघडावें असें वाटून रणदुर्गा जवाहिरबाअीनें आपला घोडा मुसलमानांवर घातला.

अेकटी राजपूत वीरबाला अेकाकीपणें मुसलमानांसारख्या धर्मांधतेनें अुन्मत्तदृष्टि झालेल्या शत्रूवर केवळ आपल्या अप्रतिम शौर्यशक्तीच्या बळावर चढून जात आहे. चारी बाजूला यवनवर्ग शस्त्रहस्त असलेला विजयोन्मादानें

मत्त होऊन शौर्यसागर राजपूत जातीच्या वीरावेशी हौतात्म्यमूर्ति जवाहिर बाअीवर तुटून पडत आहे. आपण अेकाकी असतां चारी बाजूनें शत्रु घेमार करीत मारावयाला धावून येत आहे. अशा स्थितींत 'मी मी' म्हणणाऱ्या वीरांच्या अंगालासुद्धां घाम सुटावा, हृदयांत धडकी भरावी, सर्वांग थरथर कापावें असा तो आलेला प्रसंग. अशा महाभयंकर निर्वाणीच्या प्रसंगांत वीररमणी राजपूतबाला सांपडली आहे.—पण हा प्रसंग आला नाहीं—आणवून घेतला. महाराणीनें मनांत आणलें असतें तर हा प्रसंग त्यांच्यावर मुळींच ओढवला नसता, पण हा प्रसंग त्यांच्यावर निरुपायानें ओढवला नाहीं, तर या चितोडदुर्गावरील अपयशाच्या काळिम्याचा कुप्रसंग साधल्यास टाळण्याचा प्रयत्न करावा म्हणून राजपूत मात्रतर लढतोच; पण तो अपयशाचा प्रसंग येअून ठेपण्याची निश्चिति अुत्पन्न झाल्यावर जिवंतपणीं अपयशाचें काळें तोंड आपल्याला दिसूं नये म्हणून अपयशाचे आगमनापूर्वी अिहलोकांतून आपलें निर्गमन व्हावें—अिहलोकांतून निघून जावें नि तेंहि शत्रूंचा संहार करण्याचें महापुण्य आचरीत असतां घडावें म्हणून तर अशा अति भयंकर रणकुंडांत रणदुर्गा जवाहिरबाअीनें अुडी घेतली होती.

आपल्या वीरत्वाची, शौर्याची, कौशल्याची, शस्त्रसंचालनाची व पराक्रमाची पराकाष्ठा करून त्यांनीं मरण्यापूर्वी शेकडो मुसलमानांना देहान्त प्रायश्चित दिलें. याप्रमाणें युद्धलीला करीत अनेक घावांनीं शरीर घायाळ होत असतांहि वीरा जवाहिरबाअी शत्रूंकडून शिरच्छेद होअीपावेतों प्राण-पणानें लढत होत्या. शेवटीं रक्तशून्य होत आलेल्या देहाच्या शिथिलतेमुळें त्यांच्या शस्त्रचापल्याला आपलें तेज दाखविणें हळूहळू कठिण जाअूं लागलें; आणि त्यामुळें शत्रूंचा वार होणें शक्य होअून ही लोकविलक्षण शौर्यशाली वीरा जवाहिरबाअी रणरक्तगंगेला आपला देह अर्पण करून हुतात्मरूपानें दिव्यलोकीं जाअून पोचली.

हिंदूभगीनींनों ! याच तेजस्वी रक्ताच्या तेजस्वितेचें तेजबीज प्रत्येक हिंदु स्त्रीपुरुषांत आहे. त्या तेजाला जागवाल तर तुमच्यांतील प्रत्येक जण रणदुर्गा जवाहिरबाअीच्या वीरतेजाचे जातीची वीरवर्गीय होअूं शकेल. आणि अशाच शक्यतेनें तुमची श्रेष्ठता नि भारतभूमीची महत्ता प्रकट होअील.

# राष्ट्रस्वामिभक्तिनी स्वार्थत्यागमूर्ति देवी पन्नादाअी

भारतीय हिंदुजातींतील राजपूतवर्गाच्या अितिहासांत कविकल्पनेला सुचणार नाहींत अथवा कादंबरी लेखकाला दिसूं शकणार नाहींत अशा अघटित घटनांचीं दृश्यें अुत्पन्न करण्याचें विलक्षण सामर्थ्य आहे. राजपूत महिलावर्ग जेव्हां अकल्पनीय अशा महान संकटांत सांपडतो, आणि ज्या वेळीं या संकटांतून सुटणें स्वसामर्थ्यबळावर अथवा तत्सदृश दुसऱ्या अेखाद्या अुपायावर अवलंबून असणें अशक्य होअून बसतें त्या वेळीं त्या संकटाचा परिहार करूं शकणाऱ्या अशा अेखाद्या असामान्य वीराकडे वा समर्थ पुरुषाकडे बंधुभावनेची राखी पाठवून त्या संकट कळवीत असतात. 'धर्मभ्राता' नांवानें संबोधून ही राखी पाठविण्याची रीति आहे. या राखीमध्यें अशी कांहीं विलक्षण शक्ति येअी कीं ती राखी प्राप्त होणें म्हणजे अेक अत्यंत दुर्मिळ सन्मानप्राप्ति झाली आहे अशी मोठमोठया राजामहाराजा लोकांची भावना होत असे. अशी राखी अितर वेळीं पाठविली जात नाहीं. अत्यंत विषम संकट काळीं अथवा महनीय प्रयोजनाचेच वेळीं अशाप्रकारें राखी पाठविली जात असे. राखी पाठविणाऱ्या राजपूतललनांचें कधीं दर्शनहि झालेलें नसें वा कधीं तर पुन्हां पुढेंहि दर्शन होणेंसुद्धां अशक्य होअन बसत असे आणि तरीहि राखी-प्राप्त धर्मभ्राता झालेले पुरुष आपल्या प्राणांचेहि बली देअून धर्मभगिनीच्या अिच्छित कार्याची सिद्धि करून देण्यास प्रवृत्त होत असत. धर्मभ्रातृत्वाची

राखी पाठविली गेली असतां धर्मबंधु झालेल्या वीरानें–राजपूत पुरुषानें–ती कामगिरी डावलून धर्मभ्रातृत्वाचें कर्तव्य पूर्ण केलें नाहीं असें कधींच झालें नाहीं. अितकेंच काय पण या राखी बंधनाच्या दैवी प्रभावांत कधींकधीं मुसलमान बादशहाहि सांपडले आहेत. या संबंधींची आश्चर्यकारी गोष्ट अशी की अवरंगजेब बादशहासारख्या हिंदुविद्वेषी आणि हिंदु धर्मजाति नि राष्ट्राच्या विध्वंसनाचा विडा अुचलणाऱ्या धर्मांध मनुष्यासारखा शून्यहृदय मनुष्यहि या प्रभावांतून वाचूं शकला नाहीं. अुदयपुरच्या राणामाताजींनें अशाच अेका आपत्तीचे प्रसंगीं धर्मभ्रातृत्वाची राखी अवरंगजेबाला पाठविली होती. आणि या हिंदुवैरी अवरंगजेबाचे वज्रकठोर धर्मांध हृदय या धर्मभगिनीच्या नात्यापुढें विनम्र झालें होतें. राणामाताजींना आलेल्या पत्रीं ‘धर्मकी बहीण’ संबोधनानें पाठविलेली भ्रातृभावपूर्ण पत्रें आहेत त्यांतील लालित्य आणि पवित्रता भावना आश्चर्यकारक आहेत.

श्रीचितोडदुर्गावरील बहादुरशहाच्या आक्रमणाचे वेळच्या महाभयंकर संकटाचे प्रसंगीं, हौतात्म्यस्फूर्ति महाराणी पद्मिनीदेवी प्रमाणेंच हजारो राजपूत स्त्रियांसह अंतिम युद्धाचे वेळीं कराव्या लागणाऱ्या जोहारव्रतानुष्ठानाचे वेळीं त्या समयाला बंगालकडे युद्धांत गुंतलेल्या हुमायुन बादशहाला चितोडदुर्गाची महाराणी कर्णावती हिनें ‘धर्मभ्राता’ नात्यानें संकटमुक्तीसाठीं अशीच राखी पाठविली होती. ती राखी पोचतांच हुमायुन बादशहाला अभिमान चढून त्यानें बंगालची लढाअी अेकदम थांबविली आणि “धर्मभगिनीचें संकट दूर करीन तेव्हांच राहीन” अशी प्रतिज्ञा करून तो अेकदम चितोडदुर्गावर संकट कोसळविणाऱ्या बादशहाकडे वळला. संकट टळणें शक्य असत्यावेळीं हुमायुन दुर्दैवानें पोचूं शकला नाहीं. राखी फार अुशिरा पाठविली होती. आणि हुमायूनहि बंगालसारख्या दूरप्रांतीं असल्यामुळें यावयाला अुशीर लागणें अपरिहार्य होतें.

रणवीरा जवाहिर बाअिच्या धारातीर्थीच्या धन्य मृत्यूनंतर शेवटची निराशेची वेळ येअून ठेपली. महाराणी कर्णावतीनें १३००० बाला,

ललना, वृद्धा राजपूत स्त्रियांसह जोहारव्रताच्या महाभयंकर अग्निकुंडांत स्वतः सह आहुति दिल्यानंतर सर्व अशेष राजपूतगणांनीं शेवटचा निकराचा चढाव मुसलमानावर केला आणि सर्वजण शत्रुमारणाच्या व्रताचें अनुष्ठान करीत त्या महापुण्यबळानें हौतात्म्याच्या दिव्य लोकीं निघून गेले. चितोड अुजाड झाला. घरोघरीं प्रेतें, रक्तप्रवाह, मरणारांचे कण्ह अशा स्मशानभू बनलेल्या स्थानीं बहादुरशहा प्रवेश करता झाला. परंतु बहादुरशहाला या जयाचा आनंद अुपभोगावयाला मिळूं शकला नाहीं. दिव्यलोकगामिनी महाराणी कर्णावतीनें 'धर्मभ्राता' केलेला हुमायुन बादशहा आपल्या धर्मभगिनीचा सूड घेण्याच्या अिच्छेनें धावत आहे हें बहादूरशहाला कळलें आणि हुमायुनचे भयानें तो तेथें येअून पोचण्यापूर्वीं बहादुरशहा त्याच पायीं चितोड-वरून निघून गेला.

महाराणी कर्णावतीकडून आलेली धर्मभ्रातृत्वाची राखी मिळाल्यानें हुमायुननें आपल्याला कृतार्थ मानून "महाराणी भगिनीनें जें कांहीं सांगितलें आहे तें कार्य शक्य होअील त्या त्या सर्व प्रकारें प्रयत्न करून संपन्न करीन. अितकेंच नव्हें तर शिसोदियाचे महाराण्यांशीं, हटातटाचें युद्ध करून मिळविलेला रणथंबोर किल्ला घेण्याची जरी त्यांची—माझ्या धर्मभगिनी महाराणींची—अिच्छा दिसली तर तोसुद्धां मी त्यांना प्रत्युपकारार्थ देअीन" असे अुद्गार काढले होते. तो त्वरेनें मेवाडकडे चालून आला. तो जवळ येअून ठेपण्यापूर्वींच बहादुरशहानें यःपलाय केलें होतें. त्या बहादुरला साह्य करणाऱ्या मांडू नगरच्या मुसलमान राजालासुद्धां तेथून त्यानें हाकून लावलें; आणि चितोडचा अुद्धार करून तो महाराणा विक्रमाजितचे हातीं दिला. आपल्या धर्मभगिनीच्या देखत या गोष्टी आपणाला करतां आल्या नाहींत याचें हुमायुनला फार वाअीट वाटलें.

राजाला विष्णूचा अंश समजून राजपूत लोक राजाज्ञा अत्यंत पवित्र भावनेनें शिरसावंद्य मानतात. राजाज्ञेचें अुल्लंघन केलें असतां परलोकीचे

कल्याणाला आपण अंतरतो अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. परंतु यालासुद्धां सीमा आहे. राजा दुराचारी झाला अथवा त्याचे मुळें प्रजेचें महान् अनिष्ट होत असलें तर अशा राजाला देवासमान मानलें जात नाहीं. सर्व प्रजागण सामान्य मनुष्य समजून त्याला सिंहासनावरून काढून लावतात; आणि पुन्हां दुसऱ्या योग्य पुरुषाची त्या राजपदावर नियुक्ति करतात. राजपूतांच्या अितिहासांत अशीं अनेक अुदाहरणें मिळतात. परंतु राजपूत राजा प्रजेवर अत्याचार करील वा प्रजेचें महान् अनिष्ट त्याचे हातून होण्याचा प्रसंग आणील असे प्रसंग राजपूतांत फार कमी. प्रजारक्षणकारी नि प्रजाकल्याणदक्ष राजा हा राजपूत राजपरंपरेचा नियम. आणि याचे अुलट प्रकार म्हणजे त्या नियमाचा अपवाद, असेंच चाललेलें असे. राजाचें प्रजेशीं असलेलें प्रेमबंधन अितकें दृढतायुक्त असे कीं राजाचे मनात प्रजेच्या पीडेचा विचार कधीं येअूंच नये. प्रेमबंधन तोडून अत्याचार करील असा हृदयहीन राजा होणें हें समाजनीति, धार्मिक निष्ठा, अिहपरलोकीय स्थितिसंबंधीं कर्मसिद्धांतानुसार घटल्या गेलेल्या अभंग भावना, सद्‌गुणानुष्ठानाचें मिळणारें शिक्षण आणि दृष्टीपुढील पूर्वपरंपरागत घडत आलेलीं दिव्य ज्वलन्त अुदाहरणें यामुळें कदाचित्‌च कोणा व्यक्तीच्या विक्षिप्तचित्ततेला या भोवतालच्या प्रचंड बांधाला फोडून जाण्याचें बळ प्राप्त होअी.

महाराणा संग्रामसिंहाचे चिरंजीव विक्रमाजित सिंहासनाधिष्ठित झाले हें आपण पाहिलेंच आहे. विक्रमाजितला अनेक दुःखकष्टभोग भोगावे लागून मोठ्या संकटानंतर हें सिंहासन त्याला प्राप्त झालें होतें. अत्यंत सद्‌गुणशाली मनालासुद्धां कधीं कधीं दुर्वासना स्पर्श करून जातात, प्रचंड धैर्यानें युक्त असलेल्या महावीरांचें मन क्वचित प्रसंगीं वा क्षणीं दौर्बल्यग्रस्त होतें, असामान्य बुद्धिमत्तेच्या पुरुषालाहि कधीं कधीं क्षणैक मूर्खता दंश करूं धावते, त्याचप्रमाणें वंशांचे नि जातीचे अितिहासांतही होत असावें. असें कां होतें या प्रश्नाचे अुत्तरासाठीं विवेचना करण्याचें हें स्थान नाहीं, पण असें

होतें अेवढेंच येथें दाखवावयाचें आहे. अनेक शतकेंपर्यंत दिव्य गुण, अद्वितीय पराक्रम, ज्वलन्त हिंदुराष्ट्रप्रेम नि असामान्य स्वातंत्र्यभक्ति आदिक महनीय गुणांत जगाच्या अितिहासामध्यें–हिंदुस्थानच्या अितिहासांत–जे कांहीं दैवी वंश होअून गेले त्या सर्व वंशांतील दिव्यवंशमुकुटमणि शिसोदिया वंश हें अत्यंत श्रेष्ठ वंशरत्न आहे. त्या वंशांत अलौकिक अशा या ना त्या श्रेष्ठ गुणांनीं शोभणारे राजपुरुष निर्माण होणें त्या वंशाचा नैसर्गिक स्वभावच बनून गेला आहे. याविरुद्ध घडून येणें हें केवळ अपवादाचें अस्तित्वप्रमाण अितकेंच. वर अलौकिक व्यक्ति, श्रेष्ठ वंश वा महान् जातीच्या आयुष्यांत त्याच्या त्याच्या महत्तेला कधीं कधीं डागाळले जाण्याचे क्षण येअून जातात असें जें म्हटलें आहे तसेंच या धन्यवंश झालेल्या शिसोदिया कुलांत घडून आलें. महाराणा विक्रमाजित अगदीं अयोग्य पुरुष ठरला. स्वभावानें कठोर, लहरी, सारासारविचारहीन, नि गर्विष्ट होअून तो अत्याचारी बनला. प्रजेला फार पीडा होअूं लागली. मोठमोठ्या सरदारांचा तो भर राजसभेंत अपमान करूं लागला. शेवटीं अेकदां तर ज्या करमचंदानें त्याचे पित्याला–भूतपूर्व महाराणाजींना–विपत्तीच्या वेळीं धीर देअून संभाळले होतें त्या अुपकारकर्त्या वृद्ध सरदारावर भरसभेंत त्या मूर्ख नि अुन्मत्त विक्रमाजितानें हात टाकला. त्याच्या दुर्वर्तनाचा –अपराधांचा–पेला पूर्ण भरला. हा भयंकर अन्याय आणि महान् अपमान झालेला पाहून मोठमोठे सामंतगण नि सरदार लोक अुठले. त्यांतील श्री कर्णसिंह नामक सामंतानें अुच्चस्वरानें म्हटलें कीं "बंधुवर्ग! अितके दिवस ज्याचा गंध आपणांला मिळत होता त्याचें फळ आज आपण चाखूं" करमचंदाने–त्या अपमानित सामंतानें अुत्तर दिलें, "अुद्यांच या फलाचा आस्वाद चाखावयाला मिळेल." लागलींच सर्वजण अुठून गेले. राजसभा निर्मनुष्य झाली.

विश्वासघाताच्या विषप्रयोगाला बळी पडलेले महाराणा कुमार पृथ्वीराज यांना अुपपत्नीपासून वनवीर म्हणून अेक मुलगा झालेला

होता. त्याला राज्यावर बसवून सिंहासनाधिष्ठित असलेल्या परंतु अुन्मत्त बनून राज्यपदाला अयोग्य सिद्ध झालेल्या विक्रमाजिताला पदच्युत करावा असें सर्व सरदार सामंत गणांनीं ठरवून ते सर्वजण त्या वनवीराकडे गेले. राजाला राजपदापासून च्युत करून हक्क नसलेल्या राजसिंहासनावर आपण बसावें ही गोष्ट त्याला पहिल्यानें मानवली नाहीं. तसें करण्याला संमति देणें म्हणजे कुकर्म करण्याला सिद्ध होणें आहे असें त्याचें म्हणणें पडलें. पण या गोष्टीला संमति न दिली नि सरदारांच्या म्हणण्याप्रमाणें न वागलें तर मेवाडची फार दुःस्थिती होअील हें त्याला परोपरीनें समजावून सांगितलें तेव्हां तो त्यांच्या म्हणण्याला होकार देण्यास सिद्ध झाला. या सामंतादि मंडळींच्या संकेताप्रमाणें महाराणा विक्रमाजिताला सिंहासनच्युत करून बंदींत टाकला आणि वनवीर—कै. महाराणाकुमार पृथ्वीराजाचा दासीपुत्र वनवीर—महाराणा पदावर स्थापित झाला.

अनेक दुर्निवार मदांमध्यें राज्यमद हा फारच अुन्मादकारी आहे. ज्या वनवीराला महाराणापदाचे श्रेष्ठस्थानाला पाय लावणें कुकर्म वाटत होतें तोच वनवीर राज्याधिष्ठित होतांच विपरीतमनस्क बनला. त्याची मति पालटली. राज्यसामर्थ्यप्राप्ती ही सर्व सुखापेक्षां महनीय नि अभिलषणीय अशी सुखदायी भोग्यवस्तु आहे असें वाटून या सुखाला आपण कधींहि वंचित होण्याचा प्रसंग आपणांवर येअूं नये अशी त्याला अनिवार अिच्छा झाली. भगवान् अेकलिंगजीच्या दर्शनाला गेला तेव्हां "हे भगवन् आपल्याच कृपेनें हें मेवाडचें सिंहासन मला प्राप्त झालें आहे. हे मजजवळून कधींहि हिरावून घेअूं नका," अशी त्यानें करुणा भाकीत भगवंताची प्रार्थना केली. सरदारांनीं जरी त्याला आपत्प्रसंग जाणून राज्याधिकार दिला होता तरी त्यांनीं त्याला नित्याचा स्थायी राजा मानला नव्हता. महाराणाकुलांतील राज्यपदाधिकारी वयांत येतांच तो महाराणा व्हावयाचाच. ही गोष्ट वनवीरहि जाणत होता. वनवीराच्या या राज्यलोभी वृत्तीनें आपल्या राज्यभोगाचें आड

येणारे वा येअू शकणारे सर्व जण नष्ट करण्याची बुद्धि त्याला सुचली. आणि त्या अुद्योगाला तो लागला.

महाराणा सिंहवीर संग्रामसिंहाचा महाराणाकुमार अुदयसिंह त्यावेळीं ६ वर्षांचा शिशुबाळ होता. सरदारांनीं बालकुमार अुदयसिंहाच्या सज्ञानतेच्या काळापर्यंतच वनवीराला राज्यपदाधिकारी केला होता. तो शिसोदीय वंशाचा कोमल तंतु खुडून काढावा आणि बंदींत असलेल्या विक्रमाजितलाहि वाटेंतला कांटा समजून अुपटून टाकावा अशी कुबुद्धि वनवीराला होअून तें दुःसाहस करण्याला तो प्रवृत्त झाला. राज्यासनप्राप्तीपूर्वीं पापभीरु असलेल्या वनवीराला राज्यप्राप्ति होतांच त्याचें पापमूर्तींत रूपांतर झालें. राज्यासनावर येतांच तत्काल त्यानें त्याच्या संतत राज्यभोगाचे वाटेंत असलेले हे दोन अडथळे दूर करण्याची प्रतिज्ञा केली. ज्या दुष्ट रात्रीं हे दोन बेत त्याला पार पाडावयाचे त्या रात्रीच्या माध्यान्हीची तो क्रूरकर्मा वाट पहात बसला. महाराणाकुमार अुदयसिंह रात्रीचें भोजन आदिक संपवून आपल्या शयनागारीं गेले. आणि आपल्या बालशय्येवर पहुडले. कुमाराची दायी (संस्कृतमध्यें धात्री म्हणतात) पन्ना कुमाराजवळ बसून त्याला थोपटीत निजवीत होती. कांहीं थोडा वेळ जातो न जातो तोंच राणीमंदिरांत घोर कोलाहलध्वनि होअूं लागला. राजस्त्रियांचा आर्तनाद आणि आक्रोशध्वनि अैकून विस्मित नि स्तिमित झालेली पन्नादाअी काय आहे हें अुठून पहावें या हेतूनें अुठणार तोंच 'बारी' (राजकुमाराचें अुष्टें काढणें, कपडे धुणें अित्यादि कार्य करणाऱ्या नियुक्त सेवकाला 'बारी' असें राजपुतान्यांत म्हणतात.) आला आणि म्हणाला "फार वाअीट झालें. सत्यानाश व्हावयाची वेळ आली आहे. वनवीरानें राणा विक्रमाजितची क्रूरपणें हत्या केली—विक्रमाजित मारले गेले." हें अैकतांच पन्नादायीचें हृदय थर्र्र् झालें. तिनें या दुष्टपणाचें पर्यवसान कशांत होणार हें तत्काळ जाणलें आणि ती अेक महान दिव्य करावयाला तत्क्षणींच सिद्ध झाली.

देश–जाति–धर्मसेवा अथवा थोडक्यांत म्हणावयाचें तर राष्ट्रसेवा हाच ज्याचा जीवनोद्देश, राष्ट्रार्थ मरण–राष्ट्रार्थच जीवन, श्रेष्ठ अुद्देशासाठीं तनमनधन वाहीत राष्ट्राच्या अुत्कर्षार्थ–वर्धनार्थ–राष्ट्रमानासाठीं–कीर्तीसाठीं–वैभवासाठीं महत्कार्यानुष्ठानांत रत झालेल्या अशा सत्कार्यात्म्याला भोंवतालीं सर्व आप्त–अिष्ट–मित्र–सेवकगण नि परिजन जर विमलप्रेमी, निष्ठावान्, नि विश्वासैकव्रती असतील तरच तो महत्कार्यसेवक ती महत्कार्यसेवा यथार्थपणें नि अुत्कृष्टपणें करूं शकेल. अन्यथा त्याचें हातून होअूं शकणारें कार्यांत अनंत विघ्नें अुत्पन्न झाल्यावाचून राहाणार नाहींत. महापुरुष निर्माण होअून त्यांनीं राष्ट्रोद्धारार्थ वाहून घेण्याच्या घटना जशा राष्ट्राच्या भाग्यानेंच होत असतात त्याचप्रमाणें राष्ट्रोद्धारक राष्ट्रभक्तांच्या भोंवतालची मंडळीहि राष्ट्रभक्तानुसारी, त्याला सहाय्यक होणारी नि त्याचेवर अहेतुक आणि निस्वार्थी प्रेम करणारी लाभणें हेंहि राष्ट्राच्या भाग्याचेंच लक्षण आहे. शिसोदिया कुल परंपरागततेनें या हिंदुराष्ट्राच्या अुद्धारार्थ, संरक्षणार्थ, नि गौरवार्थ जीवनधारण करीत आलेलें आहे. आणि त्या धन्य कुलांतील, सर्व स्त्रीपुरुषबालवर्गानें–त्या श्रेष्ठतम वंशानें हिंदुराष्ट्राचें वैभव, मान नि कीर्ति ही अक्षुण्ण राहावींत म्हणून जीवनधारणा केली आणि तितक्याच किंबहुना अधिक औत्सुक्यानें मरणाला तोंड दिलें आहे. पण हिंदुराष्ट्राच्या सेवेला त्या कुलानें कधींहि पाठ दाखविली नाहीं. या त्यांच्या महत्तमतेंत त्यांचे आप्त, अिष्ट, मित्र, परिचारक, नि सेवकगणांचाहि तितकाच महनीय भाग आहे. जर ही मंडळी त्यांच्या महदात्मतेला परिपोषक, सहाय्यक नि अुत्तेजक नसती तर त्या बिचाऱ्या अेकट्या वंशानें काय केलें असतें ? जसें त्यांचें कुल अलौकिक गुणांचें स्थान होतें, तशाच गुणांच्या प्रभेनें युक्त त्यांचे सर्व परिजनहि कमी अधिक मानानें होते म्हणूनच त्या श्रेष्ठ कुलाचे हातून श्रेष्ठतम कार्यसंपन्नता घडून येणें शक्य झालें.

हिऱ्यांचे खाणींत निघणारे हिरेच असतात. पण त्यांतून निघणारे अेखादे खड्याचें तेज विशेषत्वानें झळकणारें असलें म्हणजे तो विशेष

स्तुतिपात्र होतो. त्याचप्रमाणें शिसोदीय वंशाच्या गुणशाली परिजनमालिकेंतील पन्नादाअी हें अनुपमतेनें गुणवान असें रत्न प्रकट झालें. या साध्वीच्या स्वार्थत्यागाचा, राष्ट्रस्वामिभक्तीचा महिमा अलौकिक आहे. वनवीरानें राणा विक्रमाजितला मारून राजहत्या कां केली असावी हें त्या धात्रीरत्नाच्या चटकन ध्यानांत आलें. तिला निश्चित वाटलें कीं राज्यलोभाच्या दुष्ट हेतूनें राजवंश नष्ट करावयाचा अुपक्रम या वनवीरानें आरंभला खचित; आणि त्याच हेतूच्या सिध्यर्थ तो दुष्ट या राजकुमाराचाहि घात करावयाला चुकणार नाहीं. काय करावें ?

पण काय करावें नि काय न करावें या प्रश्नाचा मानसिक खल करावयालासुद्धां वेळ कोठें आहे ? वनवीर वाट चालत आहे आणि प्रत्येक क्षणाला या राजकुमाराचें, आपल्या परमपूज्य नि भक्तिकेंद्र असलेल्या हिंदुराष्ट्रस्वामीच्या वंशवेलीच्या अंकुराचें, या लहानग्या कुमार अुदयसिंहाचें मरण जवळ जवळ येत आहे. ही राजकुमारहत्या टाळावयाची असेल तर—!

लागलींच तिचा निश्चय ठरला आणि ती नियोजित अुपायाच्या अवलंबनाला लागली. तिनें त्या बाऱ्याला फळें घालण्याचा हारा (मोठी विस्तीर्ण पाटी) आणावयाला सांगून तो हारा आणतांच खालीं बराचसा पाला पसरून त्यावर राजकुमाराचें आंथरुण पसरलें आणि त्या निद्रित राजकुमाराला त्याची झोप न मोडतां त्या हाऱ्यांत अलगत निजविला. त्याला चांगलें गुरगुटून पांघरूण घातलें. आणि पुन्हां त्यावर वनवृक्षाचा पाला पसरून "तो हारा आत्ताच्या आतां घेअून चितोडदुर्गाच्या बाहेर अमुक अमुक स्थलीं ने नि तेथें माझी वाट पहात अुभा रहा" असें त्या बाऱ्याला आज्ञापिलें. बारी तो हारा घेअून वनवीर वा त्याचे सागेलागे यांची दृष्टि चुकवीत सुरक्षितपणें दुर्गाच्या बाहेर जाअून संकेतस्थलीं त्या पन्नादाअीची वाट पहात बसला. याप्रमाणें राजकुमाराला सुरक्षित केलें पण वनवीर येअून राजकुमार निसटला—त्याला पळविलें आहे—असें जर त्यानें ओळखलें तर राजकुमाराला

त्याच्या तावडींतून सुटणें शक्य होणार नाहीं. यासाठीं राजकुमार नाहीं असें त्याला न भासतां राजकुमाराला आपण मारलें या फसवत्या विश्वासावर त्यानें स्वस्थ होणें हेंच यावेळीं राणावंशवेल सुरक्षित ठेवण्यासाठीं अवश्यक आहे हें जाणून महान् साहसाला पन्नादाअी प्रवृत्त झाली.

मातेचें हृदय किती कोमल, किती प्रेमळ, किती स्वार्थनिरपेक्ष ममतेनें डवरलेलें असतें हें ज्या कांहीं भाग्यवान् मुलांना मातृप्रेमाच्या अमृताची गोडी चाखावयाला मिळून आठवत असेल तींच यथार्थपणें मातृ-हृदय जाणूं शकतील. पुत्र म्हणजे आअीच्या परमकोमल हृदयाच्या आंत-ड्यांतून निघालेला जीवविशेष प्रेमतंतु, प्राणाहूनहि प्रिय असा असतो. आणि विशेषतः जोंवर पुत्र शिशुपणाच्या, अजाणतेपणाच्या लहानग्या अवस्थेंत असतो तोंवर तें मूल म्हणजे आअीचा जीव की प्राण. त्याच्या डोळ्याला पाणी येतांच प्रेमळ मातांच्या आंतड्यांना पीळ पडूं लागतो. पण अशा आपल्या ५।६ वर्षांच्या कोमल प्रेमस्थान असलेल्या लहानग्या मुलाला त्या पन्नादाअी-च्या स्वार्थहीन नि राष्ट्रस्वामिभक्त धन्यात्म्यानें आणून त्या राजकुमाराच्या स्थानीं निजविला. कशा करतां? राजकुमारपदाचा मान त्याला मिळावा नि त्यानें वैभव भोगावें म्हणून? शिव शिव! ती पापी वासना वनवीरासारख्या कंसहृदयी दुष्टात्म्यालाच व्हावयाची. येथें आपल्या मुलानें राजकुमारभ्रांतींत असलेल्या वनवीराच्या हत्यारी तरवारीला बळी जाऊन खरा राजकुमार, आपल्या राष्ट्राचा भावी राजा सुरक्षित व्हावा यासाठीं त्याची योजना त्या देवीनें राजकुमाराच्या शय्येवर केली होती! आपल्या मुलाला राजकुमार-शय्येवर निजवून आपण पाठविलेला बारी सुरक्षितपणें गेल्याचें पहावयाला ती स्वार्थत्यागमूर्ति पन्ना दूर गेली होती. बारी गेला हें पाहून ती परतून आपल्या मुलाजवळ येत आहे तोंच हत्याधुंद वनवीर विक्रमाजितला मारून राजरक्तानें रक्ताळलेल्या नागव्या तरवारीला परजीत दुसरी राजहत्या करण्यासाठीं म्हणून राजकुमाराच्या शयनागारांत येऊन पोचला. वनवीराच्या मारत्या तरवारींत

आणि आपल्या पोटच्या गोळ्याच्या कापल्या जाणाऱ्या कंठनालांत कांहीं पावलांचेंच काय तें अंतर! वनवीर–राजहत्या करून रक्ताळलेला नरपिशाच्च वनवीर–कुमार अुदयासिंहाला शोधूं लागला. भयानें त्या मातेच्या जिवानें ठाव सोडला. आतां आपला म्हातारपणाचा आशातंतु तुटणार! आपणाला प्राणाहूनहि प्रिय असल्या आपल्या बालकाला हा राक्षस क्रूरपणानें ठार करणार! माझा बालक मला अंतरणार! आणि या त्याच्या–त्या निरपराधी बालकाच्या–हत्येला मी–त्याची सख्खी आअी–कारणीभूत होणार! या विचारानें तिचें डोकें भणाणून गेलें. हत्याधुंद वनवीर 'राजकुमार कोठें आहे' म्हणून विचारीत असतां मारल्या जाअूं पहाणाऱ्या मुलाची आअी काय अुत्तर देणार? तोंडांतून कांहींच शद्ब निघत नाहीं. पण मनाची ही असामान्य चलबिचल झालेली लक्षांत आल्यास वनवीराला संशय येअून सर्वच व्यूह ढासळणार याचेंहि भय! म्हणून तोंड जरी बोलावयाला सिद्ध झालें नाहीं तरी दिव्य स्वार्थत्यागाचें सत्कार्य करणाऱ्या पन्नादाअीच्या हातांनीं तेंहि कटुतम नि निष्ठुर कर्तव्य पार पाडण्याचें ठरवून त्या दुष्टाचे प्रश्नाला अुत्तर म्हणून त्या शय्येवरील झोपी गेलेल्या मुलांकडे अंगुलिनिर्देश केला. निष्ठुर वनवीरानें पन्नादाअीच्या कोमल अर्भकाच्या हृदयांत शस्त्र खुपसलें. अेक हृदयभेदी मरणक्लेशाची किंकाळी मंदिरांत अुठली आणि जिरली. वनवीर फसवत्या विश्वासाच्या यशोन्मादांत निघून गेला. दिव्य स्वार्थत्यागी पन्नादेवी कार्याच्या पुढील भागाला सादर झाली. आपल्या म्हातारपणींच्या अेकमेव आधारतंतूच्या सुखाला अंतरली होती तरीहि आपल्या मुलाचा अंतिम संस्कार विना आक्रोश चुपचापपणें अुरकून असह्य नि हृदयदाही शोकाच्या हुंदक्याला अेकदांहि प्रकट होअूं न देतां तत्काल दुर्गाच्या बाहेर संकेतस्थानीं जाअून त्या बाऱ्याला ती राष्ट्रस्वामिभक्तिनी भेटती झाली येथपर्यंत सर्व ठीक झालें. पण झालें हें कांहींच नाहीं. पुढचें कार्य याहून कठिण आहे. या राजवंशीयाला–अुदयसिंहाला–गुप्तपणाच्या सुरक्षितपणाचें स्थळ शोधून तेथें नेअुन ठेवावयाची ही पूर्वीच्याहूनही बिकट कामगिरी तिला पार पाडावयाची होती.

अिकडे राजस्त्रीमंदिरांत या दुसऱ्या दुष्कृत्यामुळें तर फारच आक्रांत झाला. बापारावल वंशाचा शेवटचा आधारतंतूहि हत्यारी शस्त्राला बळी पडला हें पाहून सर्व राजस्त्रिया अपार शोकांत निमग्न झाल्या. त्यांना वाटलें या दुराचारी वनवीराच्या दुष्ट महत्वाकांक्षेनें महाराणा संग्रामसिंहाच्या कुमार अूदयसिंहालाहि नाहींसा केला. त्यांना या पन्नादाअीनें केलेल्या महत्कृत्याचा सुगावाहि लागला नव्हता, नि त्यांतच कुमार अुदयसिंहाची सुरक्षितता होती. आपल्या राष्ट्रस्वामिभक्तिनी पन्नादेवीनें आपल्या पोटच्या मुलाच्या रक्ताचें मोल देअून राणा संग्रामसिंहाच्या वंशाला निश्चित विनाशापासून वांचविलें हें त्या बिचाऱ्या राणीवर्गाला काय ठाअूक ? जोंपर्यंत हिंदु जातीचें अस्तित्व टिकेल, तोंवर या श्रीचितोडगडीच्या महनीय शिसोदीय वंशाचें नांव गायिलें जाअील आणि त्या धन्य वंशाच्या कीर्तिकथेच्या जोडीनें या असामान्य स्वार्थत्यागी राष्ट्रस्वामिभक्तिनी देवी पन्नाचें पवित्र नांव चमकत राहील.

अखिलस्वार्थत्यागिनी पन्नाबाअी चितोडदुर्गाच्या बाहेर जाअून बाऱ्याचा शोध करूं लागली. रात्रीच्या अंधेऱ्या अरण्यांत जवळची वस्तूहि स्पष्ट दिसावयाची मारामार. पण बाऱ्याला कोठें थांबावयाचें हें पन्नाबाअीनें सांगून ठेवलेलें असल्यामुळें त्या माहित असलेले स्थळीं चाचपडतच कां होअीना पण जाअून पोचावयाला त्यांना फार अडचण पडली नाहीं. त्या रानांत अेक नदी वाहत होती, त्या नदीच्या किनाऱ्यावर राजकुमार अुदयसिंहाला घेअून पन्नाबाअीची वाट पहात बसलेला बारी पन्नादाअी येण्याचा मागोसा लागून आनंदित झाला. कुमार अुदयसिंहाला दुर्गातून आणतेवेळीं सुदैवानें तो जागा झाला नाहीं. नाहींतर अेवढा रचलेला व्यूह पार ढासळला गेला असता. श्रीमती पन्नाबाअी तेथें आल्या आणि अुदयसिंहाला घेअून बाऱ्यासह **वीर वाघजीचे पुत्र सिंहराय** याचेकडे गेल्या, नि त्यांना सर्व वृत्त सांगून 'अुदयसिंह बाळराजाला आपल्याजवळ

संरक्षून ठेवा,' अशी विनंति त्या ममतामातेनें केली. वीर वाघजी म्हणजे श्रीचितोडच्या संरक्षणयुद्धाचे वेळीं जे हुतात्मे झाले तेच होत. आणि अशा या स्वराज्यनिष्ठ नि स्वामीभक्त वीराचा पुत्र या संकटापन्न बालकुमाराला सांभाळावयाला निश्चित मागें घेणार नाहीं, असें जें या राष्ट्रभाक्तिनीला वाटलें तेंहि कांहीं अनाठायीं नव्हतें. पण तिचा तर्क चुकला. सिंहरायच्या मनांत स्वराज्यनिष्ठा होती, बालकुमाराचें संरक्षण व्हावें हीहि त्याची अिच्छा होती पण यासाठीं तो आपणांवर संकट ओढवून घ्यावयास सिद्ध नव्हता. सिंहरायचें हृदय सिंहाचें नव्हतें. वनवीराच्या भयानें त्यानें ती कामगिरी अंगावर घेतली नाहीं. दुःखित चित्तानें तो म्हणाला "राजकुमाराचें संरक्षण व्हावें अशी माझी फार अिच्छा आहे पण हें जर वनवीराला कळलें तर तो माझ्या सर्व वंशासह माझा नाश करील. त्याला तोंड देण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं." वनवीरासारख्याचा रोष आपणांवर ओढवून घेअून भयंकर संकटाची तरवार डोक्यावर सदासर्वदा लटकत ठेवणारी महान दायित्वाची ही महनीय कामागिरी पार पाडण्याची दिव्य प्रतिज्ञा करणारी सबलहृदयी अबला पन्नादेवी आपल्या राजकुमाराला घेअून **डोंगरपूरचें रावळ यशकर्ण** ह्याच्याकडे आश्रयभिक्षा मागण्याकरितां गेली. परंतु तेथेंहि तिला निराशाच हातीं पडली.

असली कठिण कामगिरी घेअून मार्गांतून जात असतां पन्नादेवीला राजकुमाराच्या सुरक्षितीसाठीं संरक्षकांची अडचण भासूं लागली. न जाणो, कदाचित् सुगावा लागून वनवीराचे हस्तक कुमाराचें हरण करण्याला वा त्याचा संहार करावयाला आले तर काय होअील? या संभवनीय भयाचें कल्पनेनें कुमाररक्षिणी पन्नादेवीचें लक्ष **भील लोकांचे** साह्यभिक्षेकडे वळलें. मेवाडच्या शिसोदीय कुळाच्या स्वराष्ट्रगौरवार्थ कराव्या लागलेल्या अनंत संकटपूर्ण अनेकशः प्रयत्नांत मेवाडनिवासी भीलवर्गीयांनीं फार अमोल साह्य केलेलें आहे. त्या भीलांचेंच साह्य याहि वेळीं पन्नादाअीनें मिळविलें

आणि त्यांच्या साह्यानें नि संरक्षणाखाली दुर्गम डोंगरी प्रदेश आणि ईडरच्या सीमेंतील कठिण कठिण नि गुप्त अशा मार्गांनीं आपल्या राजपुत्राला घेऊन कमलमेर नांवाच्या एका दुर्गावर (किल्यावर) ती जाऊन पोचली. येथें पन्नादाईनें आपल्या समयसूचकतेनें आपलें कार्य साध्य केलें. तेथें आशाशाह नामक एक जैनपंथीय राजपूत राज्य करीत असे. त्या ठिकाणीं जाऊन "तुमची भेट मला पाहिजे आहे." अशी विनंती तिनें त्या स्थानच्या अधिपतीला कळविली. कमलमेराधिपति आशाशाहाला ही कशासाठी भेट मागत आहे हें कांहींच कळलें नाहीं, तेव्हां काय काम आहे हें एकदां ऐकून तर घ्यावें या बुद्धीनें त्या धात्रीची विनंति मान्य करून अधिपति आशाशाहानें आपले विश्रामभवनांत त्यांना बोलावलें. तेथें आशाशाहाची माताहि होती. राजकुमाररक्षक पन्नादाईनें त्या राजशिशूला आशाशाहाच्या मांडीवर बसवून त्या म्हणतात "आपल्या राजाचे प्राण वाचवा." हें ऐकतांच आशाशाह भयभीत नि म्हणून अप्रसन्न होऊन त्या राजकुमाराला मांडीवरून खालीं उतरवित आहे तोंच—

आशाशाहाची माता आदर्श राजपूत महिला होती. मुलाचें हें कायरपण पाहून तिला वाईट वाटलें नि क्रोधहि आला. ती आपल्या मुलाच्या भीरु कृत्याची निर्भत्सना करीत म्हणते "राष्ट्रस्वामिहितबुद्धि ठेवणारे पुरुष आपल्या अिष्टाच्या साधनकार्यापासून कोणतेंहि संकट येण्याच्या भयामुळें विचलित होत नाहींत. महाराणा समरसिंहाचा पुत्र तुझा स्वराज्यस्वामी आहे, आणि आजच्या प्राणसंकटाचे वेळीं तुझा आश्रय मागत आहे. यावेळीं त्याला आश्रय देण्यानें भगवंताच्या कृपेला तूं पात्र होशील, आणि तुझा गौरव वाढेल." स्वतःच्या पोटचा मुलगा संकटाच्या भयानें कर्तव्यच्युत होत आहे हें पाहून त्याला "संकटाला तोंड देत कर्तव्याला सादर रहा–कर्तव्यच्युत होऊं नकोस" असा आदेश देणाऱ्या सुमाता ज्या राष्ट्राला लाभतात त्या राष्ट्राला संकटग्रस्तता

राक्षसी ग्रासूं धजत नाहीं. तें राष्ट्र संकटांच्या चक्रव्यूहांत सांपडलें तरीहि संकटाच्या छाताडावर पाय देत संकटपार होण्याचें सुयश मिळविण्याला समर्थ होतें. धन्य त्या माता कीं ज्या आपल्या संततीला सिंहहृदयी बनवून संकटाचा नाशकारी जबडा पसरलेला असला तरीहि कर्तव्यपालनालाच त्यांना प्रोत्साहित करतात. असाच सुधन्य मातृवर्ग राष्ट्राच्या अमरत्वाची दैवी हमी आहे. राष्ट्र संकटांत सांपडलेलें असतां निश्चित समजावें कीं राष्ट्रांत धन्यमातृवर्गाचा दुष्काळ पडलेला आहे. ज्या राष्ट्राला संकटमुक्त होण्याची तळमळ लागली असेल त्यानें "असा धन्यमातृवर्ग आम्हांला लाभूं दे" अशी भगवंताजवळ करुणा भाकावी.

आशाशाहानें आपल्या वीरमातेचा आदेश शिरोधार्य केला. राजकुमाराचे संरक्षणाची पूर्ण हमी भरली आणि देवी पन्नाधात्रीला "तूं निश्चित हो" असें अभय दिलें. झालें, पन्नादाईचें आजच्यापुरतें कर्तव्य संपलें. कमलमेरला तिला वा त्या बाऱ्याला ओळखणारे कोणीच नव्हतें. तरीहि कदाचित् नवागतांविषयीं लोक जिज्ञासा प्रकट करतील, शोध लावण्याचा प्रयत्न करतील, आणि जर कदाचित् कोणाला कांहीं संशय आला तर येथपर्यंत निभावलेला व्यूह थोडक्यासाठीं ढासळून पडण्याची वेळ कदाचित् येईल म्हणून निर्भयस्थानीं राजकुमार पोचला आतां निश्चित व्हावयाला चिंता नाहीं असें पाहून ती त्या बाऱ्यासह तत्काल परतली. आशाशाहानें कुमार आपला पुतण्या आहे असें प्रसिद्ध केलें. आणि हा राजकुमार अज्ञातवासांत येथें वाढूं लागला. कांहीं काळ असाच लोटला. कुमार अुदयसिंहाची धिटाई नि चतुरता प्रकट होअूं लागली. अेकदां झालोरचे शोनगेड सरदार आशाशाहाचे घरीं पाहुणे म्हणून आले होते. त्यांचा फार आदरसत्कार झाला आणि ते तेथें असेपर्यंत कुमाराला त्यांची व्यवस्था ठेवण्याला सांगितलें होतें. कुमाराच्या चतुरपणानें नि कौशल्यानें झालेर सरदार प्रसन्न

झाले. आणि त्यांचे मनांत कांहीं शंकाहि आली. हा कुमार आशाशाहाचा पुतण्या निश्चित नसावा असें त्याला वाटलें. हळू हळू तें वृत्त फैलावलें. वीरश्रेष्ठ संग्रामसिंहाचा प्राणसंकटीं सांपडलेला बालकुमार तेथें आहे हें वृत्त कळून आलें. मेवाडचे सरदार सामंतवर्ग आणि दुसऱ्याहि स्थलींचे राजेलोक आनं- दानें नि आदरानें येअून परलोकवासी महाराणा संग्रामसिंहाच्या बालकुमाराला अभिवादन देअूं लागले. चंडाचे वंशज शालुंब्रापति साहीदास, कैलवाडाधीश जागो, गोरनाथसांगा आदिक चंदावत वंशीय सामन्तगण; चौहाणवंशीय मंडळीं, परमारगण, सचीरपति पृथ्वीराज, जैनावतलूनकरण हे सर्व राजवर्गीय लोक अत्यंत आनंदित होअून कमलमेरला आले.

कुमार अुदयसिंहाच्या अज्ञातवासाचे दिवस संपले. सर्वांना कुमार अुदयसिंह हा महाराणा संग्रामसिंहाचा पुत्र म्हणून वाटलें. पण वनवीरानें कुमार–राजाची हत्त्या केल्याचेंहि निश्चित वृत्त सर्वांनीं अैकलेलें; तेव्हां हें कोडें–हें गूढ–सर्वांनाच पडलें. तेव्हां तेथें अुदयसिंहाची संरक्षक देवता देवी पन्नादाअी पुन्हा प्रकट झाली. आणि तिनें अेकंदर सर्व अित्थंभूत वृत्तांत सर्वांना सांगितला. त्या राजभक्तिनी पन्नादाअीच्या मुलाच्या हत्त्येचें वृत्त तिच्या तोंडून अैकतांच सर्वांचीं मस्तकें न कळतांच त्या असीम स्वार्थत्यागी पन्नादेवीपुढें विनम्र झालीं. सर्वांना तो रोमहर्षण वृत्तांत अैकून त्या साध्वीची धन्यता वाटली आणि मोठ्या कृतज्ञभावानें सर्वांनीं तिला शतशः धन्यवाद दिले.

त्याच दिवशीं कमलमेरला राजसभा भरली. कमलमेराधीश आशा- शाहानें राजकुमाराचा यथार्थ वृत्तांत सांगून मेवाडचे वृद्ध चव्हाण सामन्ताचे हातीं कुमाराला सोंपविला. त्या वृद्ध सामंताला कुमाराच्या सर्व गूढ गोष्टींची यथार्थ माहिती होती. त्यामुळें त्याला त्याच्या खऱ्या राजपुत्रतेविषयींची मुळींच शंका राहिली नाहीं. दुसऱ्या कोणाला कदाचित् कांहीं संशय येण्याचा संभव राहूं नये म्हणून राजकुमाराबरोबर अेकाच पात्रांत त्यानें अन्नग्रहण केलें. हें पाहतांच सर्वांना पूर्ण विश्वास पटला. वीरवर संग्राम-

सिंहाच्या हरवल्या वंशधराची प्राप्ति झाल्यानें सर्वजण अत्यंत आनंदित झाले. शोनगडचे सरदार अखिलरावनें आपल्या मुलीचा कुमाराशीं विवाह लावला. विवाहदिन निश्चित झाला. मोठ्या समारोहानें विवाहाची सिद्धता होऊं लागली. ही वार्ता वनवीरला कळली. त्याचें हृदय कंपायमान झालें. आपलें सिंहासन आपले हातून चाललें असें त्याला वाटूं लागलें. पण आतां तो काय करूं शकणार ? मेवाडचे सर्व सामंत सरदार लोकांनीं अुदयसिंहाचें राजत्व मान्य केल्यावर वनवीर काय करतो ? विवाह मोठ्या समारंभानें पार पडला आणि त्याच दिवशीं राजकुमार अुदयसिंहाला राज्यतिलक लावला जाअून तो '**मेवाडाधिपति महाराणा अुदयसिंह**' म्हणून सर्वांकडून स्वीकृत झाला.

वनवीर घाबरला, तरीहि राज्यपद हातीं असलेलें तो गुण्यागोविंदानें थोडेंच सोडणार ! आपल्याला वशीभूत म्हणून असलेल्या त्याच्या अेक्या मंत्र्याला सैन्य जमविण्याची त्यानें आज्ञा दिली. तो मंत्री खरा राजभक्त होता. त्यानें सैन्य जमविण्याचे बहाण्यानें १००० अत्यंत शूर सैनिक दुर्गांत आणले. त्या राजपूतांनीं दुर्गांत प्रवेश करतांच वनवीराच्या पहारे-कऱ्यांना ठार करीत मुख्य भवनावर जाअून महाराणा अुदयसिंहाची विजय-वैजयंती–विजयध्वज–रोवला. सर्व नगरांतून अुदयचा विजय दुमदुमूं लागला. परंतु वनवीरावर कोणीहि अत्याचार केला नाहीं. आपली धनसंपत्ति आणि परिवार घेअून सुरक्षितपणें तो तेथून दूर प्रदेशांत निघून गेला; आणि तेथें त्यानें अेक राज्य स्थापन केलें. तें कुल पुढें महाराष्ट्रीय हिंदुपदपाद-शाहीच्या वेळीं बरेंच प्रसिद्धीस आलें होतें.

श्रीचितोडदुर्गांत महाराणा अुदयसिंहाचा अुदय झाला. सर्वजण आनंदित झाले. आपल्या स्वार्थत्यागमूर्ति पन्नाधात्रीला तर कृतकृत्यतेचा अितका अपरिमित आनंद झाला कीं महाराणा अुदयसिंहाच्या राजवाड्यांत प्रवेश होतेवेळीं आपल्या पोटच्या गोळ्याला दुष्टाच्या हत्यारी शस्त्राला

बळी देऊन ज्या राजपुत्राचें पुत्रवत् रक्षण नि पालन केलें त्याला मातृस्नेहानें प्रेमाशीर्वाद देण्याला ती पुढें आली. महाराणा अुदयसिंहाचें हृदय भरून आलें. त्यानें अत्यंत कृतज्ञताभावानें या ममतामातेचें–स्वार्थ त्यागिनी देवी पन्नादाअीचें–हार्दिक आशीर्वाद घेण्यासाठीं तिला विनम्र वंदना दिली. आपल्या राजकुमार अुदयचा हा पुनरुदय–भाग्यशाली पुनरुदय–पाहून तिला अत्यंत धन्यता वाटली. आपल्या यथाशक्य प्रयत्नांच्या रोप्याला भगवंतानें असें दिव्य यश दिलें या भावनेंत ती तल्लीन झाली. हिंदुराष्ट्राला हिंदुवीरत्वमूर्ति सिंहप्रभावी प्रतापसिंह याच अुदयामुळें लाभले. महाराणा प्रतापसिंह हे यांचेच पुत्र.

हे भगवन्! कर्तव्यनिष्ठ, निष्ठावान्, राष्ट्रभक्तिभूषित, वीरवृत्त नि शीलसंपन्न असा मातृपदीय स्त्रीवर्ग या हिंदुराष्ट्राला सतत लाभू दे. म्हणजे संकटें या राष्ट्राच्या वाऱ्यालाहि राहूं धजणार नाहींत.

# अेक निनामी सिंहबाला

महाराणा अुदयसिंहावर अगदीं लहानपणीं प्राणसंकट आल्यामुळें त्यांना अज्ञातवासांत लहानपणापासून बराच काळ कंठावा लागला. ज्या आशाशाहाचे घरीं ते लहानाचे मोठे झाले तेथेंहि राजपुत्राला योग्य असें शिक्षण त्यांना मिळूं शकलें नाहीं. सदासर्वदा गोपनस्फोटाच्या भीतीनें अुदयसिंहाला संरक्षित स्थितींतच राहावें लागलें. मोकळेपणें हिंडणें फिरणें, वीरोचित कलाविद्या शिकून बालवीरस्थितींतील वीरक्रीडा करणें, अरण्यांतून हिंस्र पशूंची मृगयाक्रीडा करीत संकटांशीं तोंडओळख करून घेणें, आपल्या महनीय कुलेतिहासाशीं परिचित होअून तदनुसारी धाडसी देशभक्तीचीं कृत्यें करण्याचा अुपक्रम करणें, राजकारणाचे नि देशस्थितीचें ज्ञान मिळविणें अित्यादि गोष्टी अज्ञातावस्थेंत होअूं न शकल्यानें महाराणा पदाला योग्य

अशा गुणांचे अंकुर फुटून त्यांचें परिपोषण व्हावयाला पाहिजे होतें तें होअूं शकलें नाहीं. अुलट जो तो संकटापन्न बालक म्हणून प्रेमानें नि लाडानें वागवावयाचा, महाराणापुत्र म्हणून सन्मान द्यावयाचा, अिच्छानुसार शक्य तोंवर हट्ट पुरविला जावयाचा यामुळें अुदयसिंहाचे अंगीं राजपुरुषोचित गुणांचा विकास न होतां छांदिष्टपणा आणि त्याबरोबरच विलासप्रियता नि सुखलोलुपता याच दोषांचा त्यांच्यांत अुद्भव झाला होता. राज्यावर आल्या-नंतर राज्यपद म्हणजे विलासोपभोगप्राप्तीचें अेक अुत्कृष्ट साधनच होय अशीच जणूं कांहीं त्यांची समज झाली आहे असें त्यांचे वर्तनावरून दिसत होतें. दिव्य वंशांतील जन्म ज्याप्रमाणें मनांमध्यें दिव्य गुणबीजांचें आरोपण करूं शकतो त्याचप्रमाणें भोंवतालची परिस्थिति नि लहानपणीं मिळालेले शिक्षणही त्या गुणबीजांचा महान वृक्ष बनविण्यास वा त्या गुणांचा नायनाट करण्यास कारणीभूत होअूं शकतात हें या नि अशाच अनेक अैति-हासिक अुदाहरणांवरून दिसून येतें.

बाह्यतः संबंध असल्याचें स्पष्ट न दिसतांहि दोन निरनिराळ्या घटनांचे दोन निरनिराळे प्रकार त्यावेळीं हिंदुस्थानचे भाग्याचा निर्णय ठरवित होते असेंच दिसतें. अुदयसिंहाच्याच जन्माच्या वेळीं अकबराचा जन्म झाला. दोघांचींहि वयें जवळ जवळ सारखींच. दोघेहि पराक्रमी कुलांतील पुरुष; परंतु दुर्दैवानें–राष्ट्राच्या दुर्भाग्यानेंच जणूं काय–अुदयसिंहाला लहान-पणापासून गुणमारक परिस्थितींत राहण्याचा कसा अपरिहार्य प्रसंग येअून पडला होता हें आपण देवी पन्नादाअीच्या चरित्रीं पाहिलेंच आहे. याच्या अुलट अकबराला लहानपणापासून संकटांशीं झगडण्याचे प्रसंग लाभून त्याच्यांतील गुणबीजांचा अुत्कर्ष होत गेला. दैववशात् अुदयसिंहाचा अज्ञात-वास अकबराला लाभला असतां आणि अकबराच्या बाळपणांतील संघर्षप्रसंग अुदयसिंहाला आक्रमावे लागले असते तर हिंदुस्थानचेंच नव्हे तर कदाचित् जागतिक भवितव्यांतसुद्धां फार मोठी अुलटापालट झाली असती. या दोन

पुरुषांचे जन्म आणि बालघटना हिंदुस्थानच्या भाग्योत्कर्षाला अत्यंत घातुक ठरल्या. हिंदुप्रतापसूर्य महाराणा प्रतापसिंह कधीं कधीं अुद्वेगानें म्हणत असत कीं "**महाराणा संग्रामसिंहानंतरच्या विक्रमादित्य नि अुदयसिंहाचें वेळीं नि स्थळीं जर हमीर, संग्रामसिंह, बाप्पारावळ सारखे पुरुष झाले असते तर हिंदुस्थानचा भाग्योत्कर्ष निर्भय ठरला असता.**"

परंतु या सर्व असतेंपणाच्या गोष्टी. अुदयसिंह महाराणापदीं अधिष्ठित झाले, नि सर्वांचे डोळे या राज्यपदाधिष्ठित नव्या अधिपतींच्या राजवटीकडे लागले. पण सर्वांच्या आशा निर्मूल ठरल्या. तुलनेनें या कर्तृत्वहीन महाराणांच्याच वेळीं अकबरासारखा घोर महत्वाकांक्षी मुसलमान बादशहा मोगल कुलांत प्रकट झाला. हिंदुस्वातंत्र्याच्या, हिंदुराष्ट्राच्या सर्व भयंकर शत्रूंमध्यें जर कोणाला अग्रस्थान द्यावयाचें ठरवलें तर तें या हिंदुत्व-ग्रासी अकबराला दिलें पाहिजे. यानें हिंदुत्वाचा, हिंदुराष्ट्राचा जितका घात केला तितका दुसरा कोणताहि मुसलमान सत्ताधीश करूं शकला नाहीं. हिंदुराष्ट्र-ग्रासी प्रत्येक मुसलमान बादशहाचे लक्ष हिंदुस्वातंत्र्यप्रतीक चितोडावर जावयाचेंच हें जणूं काय ठरून गेल्यासारखेंच होतें. अकबरानें चितोडावर दोन आक्रमणें केलीं. त्या पैकीं पहिल्या आक्रमणाचें दृश्य या स्थलीं बघावयाचें आहे

अकबरानें मोठ्या सैन्यानिशीं श्रीचितोडवर चढाई केली. मुसलमानांनीं चितोडावर आक्रमण केलें आहे आणि चितोड कधीं युद्धाला विन्मुख झाला आहे असें कधींहि झालें नाहीं. अनेक वेळेला मुसलमानांच्या आक्रमणानें चितोडदुर्गाची नि चितोडवीरांची राखरांगोळी अुडविली आहे. पण त्याच राखेंतून सहस्रशः राजपूत योद्धे अुतन्न होअून पुन्हां चितोडचा हिंदुस्वातंत्र्यध्वज अपराजितपणें या वीर्यशाली दुर्गावर फडकला जात असे. प्रत्येक वेळीं चितोड मुसलमानांकडून अुध्वस्त केला जाअी आणि तरीहि राजपूत वीरांच्या दर्पानें नि शौर्यतेजानें मुसलमान आक-

मकहि हतप्रभ होऊन परतून जात. ते चितोडवर मुसलमानी ध्वजाची अुभारणी करूं शकले नाहींत. अकबराच्या या आक्रमणाच्याहि वेळीं चितोड अभिमुख मरणमारणाला सिद्ध झाला. चितोडचे सर्व वीरगण युद्धार्थ पुढें सरसावले' महाराणा अुदयसिंहहि सेना घेअून रणांत अुतरले. परंतु सेनाधीश महाराणा सुयोग्य सेनापति ठरूं शकले नाहींत. संग्रामांत गेले तरी हृदयांत साहस नाहीं, दृढता नाहीं, प्रतिज्ञासामर्थ्य नाहीं; शौर्याची ओळख नाहीं, संकटाशी तोंड देण्याची धमक नाहीं, सैन्यचालना काय वस्तु आहे हें माहित नाहीं, अशा सर्वस्वी अयोग्य नि अडाणी सेनासंचालकाचे सैन्याला जयाची आशा काय असणार? मोठमोठाले समर्थ सैनिक केवळ सैन्यसंचालनाच्या कौशल्याचे बळावर थोडयाशा संख्येच्या नि कमी प्रकारची सिद्धता असलेल्या सिद्धतेच्या सैन्याकरवीहि मोठमोठाले जय मिळवूं शकतात असें अितिहासांत अनेक योध्यांचे चरित्रांत दिसून आलेलें आहे. अुलट भरपूर सैन्य, अुत्कृष्ट युद्धसामुग्री, अनुकूल रणस्थळ हीं सर्व लाभलीं असूनही केवळ असमर्थ नि अकुशल सेनानीच्या हस्तें अनेक देशांनीं अनेक युद्धें हारविलीं तींहि अितिहासाला माहित आहेत. तोच अनुभव याहि स्थळीं आला.

महाराण्यासारख्या अयोग्य नि अडाणी सैन्यसंचालकाचे हाताखालीं अत्यंत शूर, पराक्रमी आणि मरणालाहि भय अुत्पन्न करणारे समर्थ राजपूत सैन्य असलेले, नि अुलट बाजूला भाडोत्री असलेल्या पण धर्ममतांधतेनें अवसान चढल्यामुळेंच कांहींसें शौर्य गाजवूं शकणाऱ्या मुसलमान सैन्याला अकबरासारखा कुशल नि घोर महत्वाकांक्षी सैन्यसंचालक मिळालेला; अशीं हीं दोन सैन्यें नि असे हे दोन विभिन्न प्रकारचे सैन्यसंचालक येथें युद्धांत परस्परांशीं टक्कर घेत होते. राजपूत सैन्यानें पहिल्या धडकीला मुसलमानी सैन्याचा खूप फडशा पाडला. राजपूतांचीहि कांहीं हानि झाली. आपल्या सैन्याचा राजपूतांच्या अनिवार शौर्यानें फडशा पडत आहे हें पाहून अकबराच्या सैन्यसंचालनाच्या कर्तृत्वानें आपला प्रभाव

दाखवावयाला आरंभ केला. राजपुतांच्या सैन्यभागांतील विरल भाग बघावयाचा नि त्यावर आपल्या सैन्याच्या निवडक तुकड्यांचा आवेगानें हल्ला चढवावयाचा, राजपूत माऱ्यापुढें दबल्यासारखें दाखवीत त्यांची असावधानता होतांच त्यांचेवर अेकदम सैन्याची अुसळी फेकावयाची, राजपूत सैन्यांच्या मधील फटीचा लाभ घेअून त्यांत आपले घोडेस्वार घालून त्यांची फळी फोडावयाची या नि या सारख्याच अनेक अुपायांनीं अकबरानें आपला मोडता डाव सावरला. पण अिकडे राजपूतांकडले सैन्यसंचालक काय करीत होते? त्यांना कांहींच सुचत नव्हतें. मनांतील अुत्साह ओसरूं लागला, सैन्याला प्रोत्साहन मिळूं शकत नव्हतें; रणस्थळीं कोणत्या स्थानीं काय वैगुण्य आहे नि तें कसें दूर करावयाचें हें पहाणारा कोणी नाहीं, अशा अनवस्थेंत जें व्हावयाचें तेंच झालें. अकबराचा हुकता डाव सावरला, त्यानें सावरलेल्या सैन्यानिशीं अभंग राजपूत सैन्याची फळी फोडली, विस्कळित राजपूत टोळ्यावर भयंकर धाडी घातल्या आणि अजिंक्यवत् असलेल्या राजपूत सैन्याच्या प्रथम धडकीचें यश हिरावून घेअून आपल्याकडील पराजयाचा चेंडू कुशलतेनें अकबरानें राजपुतांकडे झोकला. राजपूतांकडील फळी फुटून सर्व राजपूत सैन्य अस्ताव्यस्त झालें. सैन्याची शिस्त बिघडली, कोणी कोणाला पुसेनासा झाला, आणि अशा गोंधळाच्या अवस्थेंत अकबरानें साहस करून अेकाअेकीं अुदयासिंहाच्या अंगावर चाल करून जाअून महाराण्याला बंदी केला.

संपलें. युद्धाचा डाव समाप्त झाला. अकबराचा विजय झाला. राजपूत हरले. नि स्वामिविहीन ती निर्नायका राजपूत सेना दीनासारखी अुधळून गेली. सर्व सामंत सरदार हतधैर्य झाले. आणि राजपूतांनीं समरांतून पाय काढला. चितोडच्या आजपर्यंतच्या अितिहासांत कधींहि न झालेली अशी मानहानि नि यशोभंग या वेळीं झाला. अनेक वेळां चितोडवर अनेक घोर प्रसंग आले पण चितोडचा हिंदु छत्रपति महाराणा कधींहि शत्रूचा बंदि

झाला नाहीं. कोणत्याहि नि कशाहि पराक्रमी मुसलमान बादशहाला महाराणापदाधिष्ठित राजछत्रधारी कोणताहि महाराणा बंदी करतां आला नाहीं. ती अभूतपूर्व घोर अपयशाची नि राजपुतगौरवाला कलंक लावणारी दुर्दैवाची गोष्ट यावेळीं घडून आली. अकबराचा तामसी आनंद मुसलमानी सैन्याच्या विजयोन्मादी जयजयकारांत निनादित झाला. आणि राजपूतांच्या अंतःकरणांत प्रत्येक आरोळीगणिक घोर अपमानाचें विषारी शल्य बोचूं लागलें. महाराणा शत्रूचा बंदी झाल्याचें असीम दुःखदायी वृत्त राणीमहालांत येतांच चोहोकडे हाहाःकार माजला. एवढा भयंकर अपमानाचा असह्य चटका प्रत्येक अंतःकरणाचा दाह करीत असतांहि सूडाची आरोळी एकाहि अंतःकरणांतून उसळली नाहीं. यावेळीं राजपूतांच्या शौर्यखाणी व वीरत्वकेंद्र असलेल्या या चितोडांत पुरुषवर्ग आणि स्त्रीसमूह सारखाच किंकर्तव्यमूढ होऊन नुसत्या शोकोद्वेगाच्या दुःखांत होरपळला जाऊं लागला. हें राजपूत वीर्याच्या प्रेतस्वरूपाचें निर्जीव स्मशानदृश्य पाहून एका राजपूत अंतःकरणांत राजपूत शौर्यबलाच्या अग्नीनें पेट घेतला.

महाराणा उदयसिंहाच्या एका उपपत्नीला हें चितोडभर पसरलेलें निर्वीर्यतेचें दृश्य सहन झालें नाहीं. प्रत्यक्ष महाराणा उदयसिंह—श्रीचितोडदुर्गाधिपति—शत्रूच्या हातीं बंदी होऊन पडतो आणि वीरत्वाची खाणी म्हणविणाऱ्या चितोडच्या वीर राजपूतांपैकीं एकहि अंतःकरण संतापानें, अभिमानानें, कीर्ति—यशाच्या हानीच्या कल्पनेनें पेट घेत सूडाच्या ज्वाळा शत्रूंवर फेकावयाला धावूं बघत नाहीं हें क्लीबतेचें दृश्य त्या सिंहबालेच्या कोमल हृदयाला असह्य वेदना देतें झालें. आणि त्या अंतःकरण पिळवटणीमधून महान क्रोधाची विद्युत चमकून उठली. आज काय चितोड नगरी एकाएकीं वीरत्वहीन बनली? या तेजोराशी चितोडचे तेज एकाएकीं आज नष्ट झालें काय? आज चितोडमध्यें निवास करणारे असंख्य स्त्री-पुरुष काय केवल निर्जीव मासपिंडच आहेत? काय क्षत्रिय बालांनीं

केवळ मासपिंडांनाच यावेळीं जन्म दिला आहे काय? क्षत्रियांचें अप्रतिम साहस, असामान्य वीरता, प्रखर तेजस्विता, आणि प्रज्वलित स्वाभिमान काय सर्वच विलुप्त झालीं आहेत? असें जर नसतें तर मग प्रत्यक्ष महाराणा शत्रूंच्या बंदींत पडलेला असतां येथें–या तेजोराशि चितोडांत–आज स्मशानशांतता नि पराभवाची दीनता हीं कशी दिसली असती? ते कांहीं नाहीं. कोणी येवो वा न येवो, प्रयत्न करून सर्वांना नेण्याचा अुपक्रम करून पाहीन नाहींतर अेकटी आपल्या अंगांतील क्षत्रिय तेजाच्या बळावर आणि प्रखर खड्गाचे साह्यानें त्या दुष्ट नराधम आक्रमकाचा–अकबराचा–प्राणांत सूड घेअीन अथवा त्या प्रयत्नांत स्वतःचा देह तरी बळी देअीन, अशा चंडप्रतिज्ञेनें ती सिंहबाला प्रेरित होअून प्रतिशोधयुद्धार्थ–सूडघेत्या निकरासाठीं–सिद्ध झाली.

अंगावर कणखर कवच धारण केलें, धनुष्यबाण हातीं घेतला, तरवार आदिक शस्त्रांनीं सुसज्ज झाली, आणि अेक्या लढाअू घोड्यावर आरूढ होअून चितोडदुर्गाच्या रणस्तंभाकडे तिनें धाव टोकली. राजपूत वीरांना अुत्तेजित करीत, युद्धार्थ आवाहन देत, ती सिंहबाला जात असतां नेत्याचे अभावीं निस्तेजसे झाल्यासारखे राजपूत वीरगण तिच्या मागून शेकड्यांनीं–नव्हे हजारांनीं–गोळा झाले. क्रोधाच्या आगीनें पेटत्या अंतःकरणाच्या या सिंहबालेनें सूडाच्या मंत्रानें राजपूत वीरगण भारून त्याला समरांगणावर नेलें. विजयाच्या मदानें धुंद नि अस्ताव्यस्त असलेल्या मुसलमान सैन्यावर सिंहबालेच्या विजेचें वादळ अेकाअेकीं जाअून आदळलें. पहिल्या धडकीला मुसलमानांचे पाय अुखडले. आपल्या भाल्यानें मुसलमानांचे प्राण घेत आपल्या अमोघ बाणानें निवडक निवडक मुसलमान सरदार वा वीरगण विद्ध करीत ही रणचंडी विजेसारखी रणांत संचार करूं लागली. अशा या आत्माभिमानानें प्रेरित, शौर्यतेजानें तळपत्या सूडाच्या दारुण आवेशानें लढणाऱ्या आणि कौशल्यानें सैन्यसंचालनकर्त्या वीररमणीच्या नेतृत्वाखाली

कांहीं वेळ विलुप्तसें झालेलें राजपूतांचें असीम वीरत्वतेज पुन्हां प्रज्वलित होऊन मुसलमान सैन्याला जाळूं लागलें. मुसलमान सेनेनें पळावयाला आरंभ केला. या पळत्या सैन्याचा निःपात उडवीत नि पाठलाग करीत ही सिंहबाला तशीच त्यांना रेटीत चालली. अकबराच्या शिबिरापर्यंत ही दौड पोचली. अकबरालाहि सूडघेत्या वीररमणीच्या असह्य तेजोबलाशीं टक्कर देण्याच्या प्रयत्नांत यश येतच नव्हतें. मुसलमान सैन्यावर राजपूत सैन्य अतिवेगानें नि असीम आवेशानें चढाव करून येत आहे हें त्या धूर्त नि गरुडदृष्टी अकबराचे ध्यानीं येऊन आधींच त्यानें युद्धसिद्धतेच्या आज्ञा सोडून तो चपलतेनें युद्धार्थ सिद्ध झाला होता. पण अकबराच्या चापल्याला-सुद्धां पुरता वेळ न देणाऱ्या या चपलेनें—विजेनें—मुसलमानांवर आक्रमण चालूंहि केलें होतें. आघाडीच्या मुसलमानांना अितका बेदम मार बसला होता कीं ते कांहीं केल्या आपला पळ थांबविण्याला सिद्ध होअीनात. अितकेंच नाहीं तर त्या पळत्या मुसलमानांना अुसंत घ्यावयालाहि वेळ न देतां त्यांना पिटीत, मारीत, पळवीत ही वीरा राजपूतरमणी तशीच भयंकर मारा करीत पाठलाग करीत चालल्यामुळें मागील सैन्यहि तिच्या त्या असह्य वेगापुढें पाय धरूं शकलें नाहीं. सर्व सैन्याचे टाके ढिले झाले. अकबर किंकर्तव्यमूढ बनला. महाराणा अुदयसिंहाला सोडून देऊन स्वतः अकबरानेंहि आपल्या सैन्याचेंच अनुकरण करीत पळ काढण्याची सिद्धता केली.

अकबर सैन्यसंचालनांत अत्यंत चतुर असल्यामुळें त्यानें प्रसंग ओळखून सैन्याला शक्य तितकें सुरक्षितपणें घेऊन निसटून जाण्याचें ठरवून लागलींच त्याप्रमाणें योजना केली. आणि अकबर स्वतःची सुरक्षिति निश्चित राहील अशा बेतानें नि योजनेनें सर्व सैन्यासह पळूं लागला. राजपूतांजवळ स्वारसैन्य नव्हतें. आणि या सर्व आपत्तीचें मूळ जो अकबर तो स्वारसैन्यासह वेगानें निसटूं पहात आहे असें पाहून या आपल्या चितोडमानरक्षिणी वीराश्रेष्ठा सिंहबालेला फार वाअीट वाटलें. अकबर

हातचा चालला याचा तिला फार खेद झाला. परंतु निरुपाय जाणून त्या पळत्या अकबराकडे निरुपायाची क्रोधदृष्टि फेकीत ही विजयिनी राणारमणी बंधमुक्त झालेल्या आपल्या रमणाला—महाराणा अुदयसिंहाला—सैनिक पद्धतीनें आपली प्रेमवंदना देती झाली.

सर्व राजपूत सैन्य या अभूतपूर्व विजयानें हर्षोत्फुल्ल झालें. त्या सिंहबालेला आपण आज श्रीचितोडदुर्गमानरक्षणार्थ आणि महाराणा-बंधमुक्तिप्रीत्यर्थ स्वीकारलेल्या रणदीक्षेला भगवंतांनीं अपूर्व यश दिलें या आनंदविचारांनीं स्वतः कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. सर्व चितोड या विजयानें परमेश्वराचे आभार मानता झाला. श्रीचितोडच्यासाठीं, आणि चितोडदुर्गी झालेल्या सर्व-महायुद्धांत हें युद्ध सर्वतोपरी अद्वितीय झालें. पूर्वीं केव्हांहि न घडलेली, स्वप्नांतहि कल्पिली न जाणारी नि अत्यंत अपमानकारी अशी गोष्ट यावेळीं घडली आणि ती म्हणजे हिंदुत्वराजमुकुटधारी महाराणा हिंदुराष्ट्रशत्रु मुसलमानांचा बंदी झाला. पूर्वीं वा नंतर अशी दुर्दैवी घटना कधींहि झाली नव्हती. पण त्याचप्रमाणें दुसरीहि अेक अपूर्व घटना याचवेळीं याच युद्धांत घडून आली. ही पहिली घटना जितकी दुर्भाग्याची ठरेल तितकीच आनंदाची नि अभिमानोत्पादक दुसरी गोष्ट ठरली. आजपर्यंत चितोडवर शत्रूंचीं आक्रमणें झालीं. आणि त्या प्रत्येक आक्रमणांत चितोडचा अत्यंत भयंकर संहार होअून चितोड अुध्वस्त झाला होता. शत्रूलाहि हात चोळीत विजयाचा लाभ न होतां मागें मागें फिरावें लागत असे. पण यावेळीं ज्या मुसलमान बादशहाला यापूर्वी वा यानंतर पराजयाचा वाराहि लागला नाहीं; ज्यानें आपल्या शौर्यबलावर नि चातुर्य कौशल्यावर सर्व राजपूतांना आपल्यापुढें गोगलगाय बनवून टाकलें होतें; ज्याचें साम्राज्य जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर पसरत आलें होतें; ज्याचें वर्णन—त्याचे यशाला—दर्पाला—वैभवाला—पराक्रमाला आणि सत्तेला भुलून पारतंत्र्याची चीड नसलेल्या अेका पंडितानें ‘दिल्लीश्वरोवा जगदीश्वरोवा’

अशा प्रकारें केलेलें होतें अशा अद्वितीय यशस्वी बादशहाला—अकबराला-या चितोडपुढून आपला जीव वाचविण्यासाठीं नाक मुठींत धरून पळ काढावा लागला. अकबरावर असल्याप्रकारचें यश मिळविणें हीं कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ही अभूतपूर्व नि अत्यंत अभिमानाची अशी गोष्ट यावेळीं या चितोड-वीरांना साध्य झाली. आणि हें सर्व यश त्या महाराणा अुपपत्नीचें—त्या निनामी सिंहबाला राजपूत महिलेचें—अतुलपराक्रमी वीररमणीचेंच आहे.

परंतु या चितोडमानसंरक्षिणी सिंहबालेचा अंत फार शोककारक झाला-महाराणा अुदयसिंहजींना त्या दिवसापासून या राजपूतरमणीविषयीं कृतज्ञताबुद्धि-पूर्वक प्रेम वाटूं लागलें. अेकदां राजसभेंत असतां सर्व सामंत सरदारांच्या अुपस्थितींत "माझी सुटका नि चितोडमानरक्षण केवळ या सिंहबालेमुळेंच झालीं" अशी स्तुति सहजपणें महाराणांचे तोंडून निघाली. त्यांत सरदारसामंतादिकांना हिणविण्याचा मुळींच अुद्देश नव्हता. पण मानवी मनाच्या खबदडींत बसून राहिलेली सुप्त मत्सरबुद्धि केव्हां जागी होअील आणि तिच्या प्रभावानें जाणता मनुष्यसुद्धां महान हानिकर, अनंत दोषपूर्ण गोष्टी करावयाच्या पापांत कसा ओढला जाअील याचा कोणी नेम सांगावा! सरदारसामंतांना या स्तुतिपर अुद्गारांचें अत्यंत वाअीट वाटलें. त्यांचे मनांत त्या सिंहबालेच्या यशाविषयीं महान् मत्सर अुत्पन्न झाला. आणि ते सर्व जण तिच्या विनाशाला प्रवृत्त झाले !

अेक सामान्य स्त्री, तीहि राणी नव्हे—तर महाराण्याची केवळ अुपपत्नी—आह्मलाहि असाध्य झालेल्या यशाची ती वाटेकरीण झाल्या-विषयीची स्तुति आमच्या तोंडावर होणें ह्मणजे आमचा असहनीय अपमान आहे. या अपमानाचें मूळ अुखडून फेकलेंच पाहिजे ही ती मत्सरी मनाची विचारप्रणाली. आपल्या अपमानाचें खरें मूळ तो घोरकर्मा अकबर आहे. त्याच्या पराक्रमापुढें आपण निस्तेज झालो. जर अपमानाचें अुट्टें काढावयाचें म्हणून त्या खऱ्या शत्रूचा दर्प नष्ट करून त्याला होता कीं

नव्हतासा करून टाकण्याचा पुरुषार्थी ध्रुवनिश्चय करण्याचा अुपक्रम या राजपूत सरदारसामंतांनीं केला असता तर त्यांच्या अपमानाचा कलंक समूळ धुतला गेला असतां अितकेंच नव्हें तर या भारतमातेच्या पारतंत्र्याचा पसरूं लागलेला पाश आरंभालाच तोडून टाकून राष्ट्राचें स्वातंत्र्य चिरस्थायी करण्याच्या महद्यशाचे ते भागी झाले असते. पण मत्सरी मनाला हे असले अुच्चाकांक्षेचे महद्विचार कसे सुचावयाचे. कोणताहि मत्सरी मनुष्य मत्सराच्या तडाक्यांत असल्यावेळीं मनानें तर तो अुच्चाकांक्षेकडे बघावयाचा नाहींच पण त्याची मानसुद्धां विठल घोड्यासारखी भूमीकडे लोंबलेली असावयाची, कपाळावरील कातडीला आपल्यामागें किती घाण विचार चालूं आहेत याची लाज वाटूनच कीं काय संकोचितपणानें सतराशें आठ्या पडावयाच्या आणि मन हीनवृत्तींच्या जडपणानें भारावून खालीं खालीं खेचलें जावयाचें अशी स्थिति त्यावेळीं होतें. राजसभेंतहि तोच प्रकार झाला. सर्वांच्या माना खालीं वाकल्या. मनें नीच मत्सराच्या हीन सूडबुद्धीनें घेरलीं गेलीं आणि ते राजसभेंतून अेक अेक करून निघून गेले.

ज्या वीर रमणीनें या वीरपुरुष म्हणविणाऱ्या सरदारसामंतांच्या हातून निसटून गेलेलें यश परत मिळविलें, चितोडदुर्गाधिपति महाराण्याला शत्रूंच्या बंदीतून सोडवला, ज्या अकबराचा पूर्वी वा नंतर कोणीहि पराभव करूं शकला नाहीं अशा अजिंक्यवत् असलेल्या अकबराला ज्या सिंहबालेनें आपला जीव घेअून पळावयाला लावलें आणि चितोडच्या कीर्तिगौरवाच्या कोंदणांत अेका अभिमाननीय थोर कृत्याचें यशोरत्न आणून बसविलें त्या राजविमोचक, चितोडमानरक्षक, अकबरविजेत्या या धन्य वीर रमणीला मत्सरग्रस्ततेनें हीनवृत्त झालेल्या सरदारसामंतांच्या नीच क्रोधाच्या सूडाला बळी पडून प्राणाला मुकावें लागले. ती वीरा तर आपल्या यशोधनाच्या ळावर हौतात्म्यपदीं पोचलीं असेलच परंतु अेकप्रकारें हीन मत्सरग्रस्तता

मोठमोठ्यांचें हातूनसुद्धां देशविघातक नि राष्ट्रहानिकर अशा दुष्कृति कशा घडवून आणीत हें दाखवून देशबंधुभगिनींना अेक प्रकारें सावधानतेचा जिवंत धडा तिचे अुदाहरणानें निर्माण करून ठेवलेला आहे.

भगवन्! ज्याप्रमाणें महनीय गुणांची आमच्या हिंदुराष्ट्रांतील स्त्री-पुरुषांना जोड करून दे हें वरदान मागावयाचें त्याचप्रमाणें किंवा अेक दृष्टीनें त्या आधीं तुझ्याजवळ अत्यंत कारुणिक प्रार्थना कीं हीनमत्सरादिक धर्म-देश-जाति वा राष्ट्रहानिकर अशा अेकहि दुर्गुणाचा वाससुद्धां आम्हां हिंदुराष्ट्रिकांना लागूं देअूं नकोस! कारण आतांपर्यंत या हिंदुराष्ट्राची अधिकांत अधिक भयंकर हानि कशामुळें झाली असेल तर ती व्यक्तिगत सूड-मत्सरबुद्धि-नि हीन स्वार्थांधता ह्यांच्यामुळें. हीं राष्ट्रशक्तीच्या नि राष्ट्रकर्तव्याच्या आड येअून अनेक वेळा राष्ट्राला महान् भयंकर आपत्तींत टाकावयाला कारणीभूत झालेलीं आहेत!!

---

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग..............क्रमांक............

# चितोडवरील अंतिम वीरा दृष्य

## वीराश्रेष्ठा पत्तामाता–आणि तिचा वीरा सखीवर्ग

चितोडहून अपयश घेऊन जीवभयानें पळालेला अकबर घरीं जाऊन स्वस्थ बसला नाहीं. या अपमानाचें उट्टें काढावें नि अपयशाचा काळिमा पार धुवून टाकावा म्हणून सिद्धता करूं लागला. चितोडसंबंधीं नि शिसोदीय कुलाविषयीं त्याचें मनांत बाणलेलें वैर आमरणांत नाहीसें झालें नाहीं. जन्मपर्यंत आपल्या साम्राज्यसत्तेच्या बळावर त्या कुलाशीं तो अत्यंत तीव्र द्वेषपूर्वक संघर्ष करीत राहिला. येथें केवळ त्याच्या चितोडवरील राक्षसी सूडापुरतेंच बघावयाचें आहे. मनुष्यें केव्हां केव्हां आणि कांहीं जाति आपल्या जातीयसंस्कारवशतेनें अशीं घोर नि अनन्वित कृत्यें नित्य करीत असतात नि तशा गोष्टींना सतत प्रवृत्त होतात कीं त्यांना उपमा द्यावयाला पाशवी राक्षसी इत्यादि विशेषणें देणें म्हणजे या बिचाऱ्या पशूंचा नि राक्षस दुष्ट असले तरी त्यांच्यांतहि असलेल्या कांहीं गुणसमुच्चयाचा घोर अपमान केल्यासारखें होईल, इतक्या अधमाधमतेच्या प्रकारचीं तीं कृत्यें असतात. ज्याप्रमाणें रामरावणाचें युद्ध कसें–तर त्याला उपमा द्यावयाला दुसरें तसलें युद्ध झालेंच नाहीं अशी स्थिति असल्यामुळें ‘रामरावणासारखेंच’ असें म्हणावें लागतें तसेंच दुष्टतेची परिसीमा गाठणाऱ्या या दुष्टांची स्थिति असते. यांना उपमा द्यावयाची म्हणजे यांचीच उपमा देणें यथार्थ वर्णन ठरेल.

हिंदुस्थानांत मुसलमानी आक्रमणाचे वेळेपासून मुसलमानी अत्याचारांना खूपच ऊत आला. या चितोडदुर्गाधिपांनीं असा कोणता अपकार या मुसलमान आक्रमकांवर केला होता कीं ज्याला ज्याला आपल्यांत सामर्थ्य आहे असें वाटलें त्या त्या मुसलमान सत्ताधाऱ्यांनीं या चितोडवर आपला विध्वंसक घाला घालीत रहावें ! आणि जर अखिल भारतीय क्षत्रिय

जातीचा भीमठोसा अुगारला नि लगावला गेला असता तर हिंदुस्थानांत घुसलेले लुटारू तर नामशेष होतेच पण भावी घरखाअूंची भुतावळसुद्धां हिंदुस्थानावर डोळा अुचलून बघूं शकली नसती. चितोडनें तसें करण्याचा यत्किंचित्‌सुद्धां प्रयत्न केला नाहीं. केवळ येणाऱ्या आक्रमकांना प्राण-पणानें तोंड देण्याचा परिपाठ ठेवून त्यांनीं हिंदुस्वातंत्र्याच्या अक्षय्य वटाचा मुख्य बुंधा तेवढा सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. अशाच अेका प्रयत्नानें या अकबराला चांगलाच मार खात पळून जावें लागलें होतें. पण अकब-राचा पराजय झाला, त्याचा अपमान झाला, अपयशाचा कलंक त्याला लागला त्याला चितोडनें काय करावें ? झक मारायला दुसऱ्याच्या घरावर डाका मारावा कां आणि डोक्यांत काठी पडली तर त्या विरुद्ध बोंबलावें कां ?

पण अपहाऱ्यांनीं सर्वत्र भरलेल्या या जगांत अशी स्थिती दिसते खरी. चितोडनें कांहींहि कारण दिलें नसतां केवळ परस्वापहारबुद्धीनें अकबर चितोडवर चालून गेला. चितोडनें आपल्या स्वसंरक्षणार्थ त्याला तोंड दिलें, आणि मुसलमान सैनिकांची पहिल्या धडकींत रेवडी अुडावी असें शौर्यहि गाजविलें. पण सैन्यचालनेच्या कौशल्याची अुणीव पडून राजपूत सैन्य अपयशी झालें असतां चितोडच्या हृदयावर मर्मभेदी घाव करण्यासारखें, महाराण्याला बंदी करण्याचें धाडस अकबरानें केलें; आणि त्या चितोडयशध्वंसक अपराधार्थ अेक्या अबलेनें सैन्यसंचालनचातुर्यानें नि वीरत्वप्रभावानें अकबराला भुअी चाटावयाला लावून आपल्या महा-राण्याला सोडवून नेलें, यांत अकबराला संताप कां यावा ? चोरचे चोर नि वर शिरजोर असाच प्रकार यांतहि आहे. पण जेथें न्याय, नीति, धर्म अित्यादि सर्व गोष्टी अेका बलवत्तेवर अवलंबून आहेत अशा या विषम जगांत जो बली त्याच्याचकडून संरक्षित होण्याची न्याय, नीति, धर्म आदिक अपेक्षा करीत असणार ! धर्म्य, न्याय्य पक्षाला स्वसंरक्षणाचें

सामर्थ्य नसेल तर धर्मादिक तो पक्ष न्याय आहे, धर्म्य आहे म्हणूनच केवळ त्याचें संरक्षण करावयाला पुढें येअूं शकत नाहींत. बल नसेल तर, सामर्थ्य नसेल तर, बलोपासना–सामर्थ्यानुष्ठान न केल्याचे पापासाठीं अन्यायी, अधर्मी, अत्याचारी नराधमांच्या अपहारी दुष्टतेला बळी पडण्याचें प्रायश्चित भोगल्यावांचून न्याय्य व धर्म्य पक्षालासुद्धां दुसरें गत्यंतरच अुरत नाहीं.

सर्व हिंदुराष्ट्रांतील 'शठे शाठ्यं' नीतीच्या नि अखिल हिंदुसामर्थ्यानुष्ठानाच्या अभावासाठीं चितोडला फार घोर नि भयंकर प्रायश्चित भोगण्याची वेळ आली. अकबरानें प्रचंड सिद्धतेसह चितोडवर भयंकर सूडबुद्धीनें घोर आक्रमण केलें. ही चितोडची अंतिम वेळ ठरली. चितोडच्या मान राखणाऱ्या वीरारमणींच्या हत्येनें सामंत सरदारांविषयीं अुदयसिंह महाराणाजींचें मन कलुषित झालेलें, सामंत सरदारांतहि आपसांत वैमनस्यें अुत्पन्न झालेलीं आणि सर्वत्र अेकप्रकारें विशृंखलता–बेबंदशाही–माजलेली. अकबर चितोडच्या आक्रमणाची सिद्धता करीत होताच. त्यांत या राज्याची विस्कळितपणाची बातमी मिळतांच या वस्तुस्थितीचा लाभ घ्यावयाचा असें त्यानें ठरविलें. अकबराचें वय त्यावेळीं २५ वर्षांचें होतें. शरीरांत विपुल बळ, हृदयांत अदम्य अुत्साह, जवळ जवळ सर्व भारतवर्ष त्याच्यापुढें शिर झुकवूं पहात असलेला, अनेक गड–कोट दुर्ग त्यानें घेतलेले, त्याच्या पराक्रमापुढें फिके पडून कित्येक राजपूत राजेलोक अकबराज्ञा पालन करण्याला तत्पर होत असलेले, अशा स्थितींत केवळ मेवाड, अकबराचें वर्चस्व न मानतां स्वातंत्र्यविभूषित हिंदुध्वज लहरावीत अुच्च मस्तकानें स्वातंत्र्याचे डौलांत अुभा असलेला मेवाड, त्याला कसा सहन होणार ? मेवाडला अशा प्रकारें स्वातंत्र्याचें तोरण सगर्व अुभें ठेअूं दिलें नि अितर स्वातंत्र्यभक्त हिंदुस्थान राष्ट्रिकगण त्याच ध्वजाभोवतीं गोळा होअून भारतवर्षांतील मुसलमानी साम्राज्यसत्तेला जर धक्का द्यावयाला अुभे राहिले तर मग मात्र आपली धडगत नाहीं, तेव्हां आपल्या साम्राज्यसत्तेपुढें न वाकणारा कोणताहि हिंदुस्वातंत्र्यध्वज

हिंदुस्थानांत राहूं द्यावयाचाच नाहीं असा अकबरी निश्चय ठरला; आणि मेवाडवर अकबर मोठ्या सैन्यासह चालून आला.

अकबराचें आगमन चितोडपर्यंत झालें आहे वा होत आहे हें पहातांच आपला महाराणा सुरक्षित नि संकटक्षेत्राच्या बाहेर रहावा म्हणून कांहीं महाराणाभक्त निष्ठावान सरदार–सामंतांनीं महाराणाजींना चितोड सोडून दूर जाण्याचा परामर्ष दिला आणि त्याप्रमाणें आपल्या हितकर्त्या मंडळींचे सूचनेनुसार महाराणाजी चितोडबाहेर दूर सुरक्षित स्थळीं निघून गेले. महाराणाजींना चितोडावरून दूर पाठविलें तरी राजपूतांना चितोडाची सुरक्षितीहि तितकीच महत्वाची वाटत होती. कारण तें पवित्रस्थान हिंदुस्वातंत्र्यवैभवाचें मानकेंद्र आहे. तें हिंदुस्वातंत्र्यक्षेत्र देहांत प्राण असेपर्यंत–हिंदुस्वातंत्र्यपूजक राजपूत असुरक्षित कसें पडूं देतील ? चितोडवर अकबराचें भयंकर आक्रमण होत आहे हें अैकतांच ठिकठिकाणांहून अनेक राजपूतगण–राजपूत सामंत नि सरदारगण–चितोडदुर्गक्षेत्र रक्षावयासाठीं धावत आले. प्रत्येक वेळीं चितोडगड संरक्षणाप्रीत्यर्थ होणाऱ्या रणक्षेत्रांत राजपूतगण नष्ट होऊन भस्मीभूत झाले. परंतु चितोड मानदेवतेच्या जणूं संजीवनी मंत्रानें त्या भस्मांतूनच पुनःपुन्हां हजारो योद्धे–लढते राजपूतगण –निर्माण होत गेले. राजपूत सामंत नि सरदार लोक आपापल्या सैन्यांसह जे तेथें आले होते त्यांतील **वीरवर सहीदास चंदावत** आपल्या चंदावत वंशीय अतुल पराक्रमी योध्यांसह चितोडच्या तोरणद्वारीं–सूर्यद्वारावर–जाऊन हटातटानें द्वारसंरक्षणार्थ अुभा राहिला. दिल्लीच्या अंतिम क्षत्रियरत्न महाराज पृथ्वीराजच्या वंशांतील दोन पराक्रमी सामंत राजे बैदला नि कटोरिया नामक स्थानांहून आलेले होते. त्याचप्रमाणें बिजौलींचे परमार, मादीचे झालापति, अित्यादि महाराण्यांचे अनेक सामंतराजे आले होते. मेवाडराज्याबाहेरच्या राज्यांपैकीं देवलपति, वाघजीचे वंशधर झालोरपति, शोनगडचे राव, अीश्वरदास राठोड, कर्मचंद्र कच्छवाह, ग्वाल्हेरचे तुवरराज

हे आलेल्यांपैकीं विशेष प्रसिद्ध वीर होते. या सर्व वीरवरांनीं यावेळीं चितोडरक्षणार्थ जो घोर संग्राम करून आपलें अद्वितीय वीरत्व प्रकट केलें तें अितिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जावें अशा अुत्कृष्ट योग्यतेचें होतें.

अेकमेकांवर तुटून पडण्यासाठीं अुताविळ झालेलीं दोन सैन्यें अेकमेकांसमोर येतांच रणावेश युद्धाला आरंभ करतो हें कांहीं सांगावयालाच पाहिजे असें नाहीं. हिंदुमुसलमानांचें तुमुल युद्ध चालू झालें. आपल्या अजिंक्य अकबराच्या सामर्थ्यावर रणावलेलें आणि हिंदुस्वातंत्र्याचा चितोडसारखा महान पवित्र गड सर करावयाचा या बुद्धीनें अुन्मत्त झालेलें मुसलमान सैन्य अेखाद्या महान नदीच्या दुथडी भरून चाललेल्या पात्रासारख्या प्रचंड वेगानें चितोडच्या सूर्यद्वारावर लोटूं लागलें. या मुसलमान सैनिकांच्या ‘अल्लाहो अकबर’ आणि ‘दीन दीन’ (धर्म—धर्म) या कलहोत्तेजी शद्बांच्या प्रचंड घोषानें आकाश दुमदुमूं लागलें तेव्हां राजपूतांकडूनहि त्यांच्या या घोषाला रणोत्साही गर्जनांच्या प्रतिघोषाची आरोळी जाअून भिडली. सूर्यद्वारावरील वीरवर सहीदास चंदावत आपल्या सेनेला, आलेल्या मुसलमान चढावाशीं तोंड देण्याला, प्रोत्साहित करीत स्वतः धनुष्यबाणांच्या साह्यानें मुसलमान सैनिकांचा फडशा पाडूं लागला. सहीदासांच्या योध्यांपैकीं अेक अेक करीत राजपूत सैन्य गळूं लागले तरीहि सहीदासाचा अट्टाहास रतीभरसुद्धां कमी झाला नाहीं; किंवा त्याचें अेक पाअूलहि मागें पडलें नाहीं वा त्याच्या मुठींतून धनुष्य गळलें नाहीं. जोंपर्यंत शरीरांत प्राण नि रक्तसंचार होता तोंपर्यंत सहीदासाचा अुत्साह यत्किंचित्सुद्धां कमी झाला नाहीं— मुसलमान मारणाचें कार्यांत खंड पडला नाहीं. त्याचे अमोघ बाण सुटावयाचे आणि त्या बाणांनीं सहीदासाची आज्ञा शिरसावंद्य मानीत मुसलमानांच्या प्राणांची होळी करावयाची असा अव्याहत क्रम चालला होता. जवळचे बहुतेक सर्व सैनिक पडले, तथापि सहीदासाला जणूं

त्याचें भानच नाहीं. मुसलमानांचा आपल्या बाणांनीं संहार करावयाचा अेवढी अेकच गोष्ट त्याच्या मनापुढें–डोळ्यापुढें–होती नि ती गोष्ट तो सारखी अखंडपणें चालवीत होता. त्याचें हें अप्रतिम धैर्य नि रण-कौशल्य पाहून राजपूत गणांचाहि अुत्साह द्विगुणित वाढून सर्वत्र राजपूतांचा भयंकर अुठाव झाला.

चितोडच्या या अंतिम मरणाच्या दुःखशोकाच्या अंधेऱ्या अध्यायांत–त्या अंधकारमय चितोडभवितव्याच्या या संग्रामाच्या काळोखांत–ज्या दोन वीरांनीं आपले अद्वितीय युद्धकौशल्य नि पराक्रम गाजवून कांहीं वेळ अभि-मानोत्पादक अशा वीरत्वाचा दिव्य प्रकाश पाडला ते दोन वीर म्हणजे जयमल व **प्रताप** हे होत. **प्रतापलाच** लाडके नांव पत्ता वा पत्ते असें होतें. **जयमल बिजनोरचा राजा** असून मारवाडच्या सामंतातील विख्यात असलेला **राठोड कुलोत्पन्न** होता. **प्रताप वा पत्ता हे कैलवाडाचे अधि-पति** होते. यांचा जन्म चंदावत कुलाच्या अेक्या शाखेंत झाला होता. या दोन वीरांचें शौर्य अितकें असीम नि दिव्य प्रकारचें होतें कीं वीर्यखाणी राजपूत लोकसुद्धां यांच्या पवित्र नांवांचा जप करतात. प्रतिदिवशीं प्रातःकाळीं अुठून ज्या महापुरुषांच्या नामांचा प्रातःस्मरणांत समावेश केलेला आहे त्यांत या महावीरांचे नामांचाहि समावेश आहे. राजपूत स्त्रिया संध्याकाळीं संध्यावाती (संध्याकाळचे दिवे लावण्याचें कार्य) करतेवेळीं आपल्या मुलामुलींचें मंगल-कामनेसाठीं या दोन वीरांचें नांव घेत मंगल होण्याचे आशीर्वाद देतात. राजपूत स्त्रिया दळतेवेळीं या दोन वीरांचीं वीरगीतें गातात. जोंपर्यंत राजपूत जातींत वीरपुरुषाचा आदर आहे वा राहील, जोंपर्यंत वीरत्वाचा लवलेश कां होअीना पण राजपूतांच्या मनोभूमिकेंत जिवंत राहिलेला असेल, पूर्वेतिहासाच्या स्मरणाची अेक लकेर जरी राहिलेली दिसेल तरी तोंपर्यंत या दोन वीरांच्या नांवाची पुण्यस्मृति राजपूतांतून नष्ट करण्याचें सामर्थ्य कोणांतही नाहीं. जयमल नि पत्ता यांनीं कोणाचे अुभारीनें भरी भरून चितोडच्या जळत्या नि जाळत्या

रणकुंडांत अुड्या घेतल्या नाहींत. चितोडच्या हिंदुस्वातंत्र्यप्रतीक हिंदु मान-केंद्राच्या संरक्षणार्थ रणाच्या क्षेत्रांत अुतरून रण गाजवावयाचें नि शत्रूंच्या शिरांचे ढीग पाडीत शत्रूला शक्यतर पुन्हां श्रीचितोडदुर्गाकडे बघण्याचेंहि साहस होअूं नये असें घोर प्रायश्चित्त द्यावयाचें अथवा तें शक्य न झालें तर शत्रुसेना मंथीत हुतात्मतेचा दिव्य मुकुट धारण करून सूर्यमंडळें भेदन करीत देवपदीं विराजमान व्हावयाचें अशा स्वयंस्फूर्तीनें दिव्य रणनिश्चय करून हे दोघे नरपुंगव चितोडसंरक्षण कार्यार्थ धाव घेत आले होते. या वीरांच्या अतुल शौर्यसंपन्नतेनें नि प्रखरतम वीरतेनें अकबरहि आश्चर्यमुग्ध झाला होता. या दोघा वीरांची अलौकिक वीरता आणि अद्वितीय रणनिपुणता यांचें अखंड स्मरण रहावें म्हणून अकबरनें यांचा वृत्तांत स्वतः लिहिलेला आहे. या भयंकर संग्रामांत केवळ राजपूत पुरुषांनींच पराक्रम केला असें नाहीं, तर पडद्यामागें रहाणाऱ्या पुष्कळ राजपूत वीर स्त्रियांनींहि सुकोमल आयुःक्रमांवर पाणी सोडून रणाच्या खडतर व्रताचें रणकंकण बांधीत रणयज्ञार्थ समररंगणांत आपल्या अलौकिक वीरतेचें दिव्य तेज प्रकट केलेलें आहे.

ज्यावेळीं सूर्यद्वारावर शालुंब्रापति चंदावत वीर सहीदास अत्यंत अद्‌भुत पराक्रम करीत आपला देह धारातीर्थी ठेवता झाला त्याचक्षणीं अुरलेल्या चंदावत वीरांचें आधिपत्य घेअून वीर युवक पत्ते (प्रताप) त्या स्थानीं सूर्यद्वार अडविण्यासाठीं पुढें झाला. श्री चितोडगडावरील मागील युद्धाचे वेळीं पत्तेचा पिता याच रणक्षेत्रांत शत्रूला मारीत मारीत वीरलोकाला गेला होता. त्यावेळीं पत्तेचें वय फार लहान होतें. नि त्यामुळें पत्तेच्या वीरावरा मातेला सहगमन करतां आलें नाहीं. कैलवापतीचा अेवढाच वंशधर आहे. जर याचें लालनपालन केलें नाहीं तर या लहान अर्भक बालाचें संगोपन न होतां तो वाया जाअील. आणि कैलवापतीच्या वंशवेलीचा विस्तार माझ्या दुर्लक्ष्यामुळें नष्ट झाल्याचा दोष मजवर येअील या शंकेनें

पत्तामातेनें या अेकुलत्या अेक्या वंशधराचे लालनपालनार्थ सती होण्याचें व्रत बाजूला ठेवलें. अशा या अेकुलत्या पुत्राच्या संरक्षणार्थ ज्या माअुलीनें अत्यंत अिच्छा असतांहि आपलें मन आवरून सती जाण्याचें व्रत अंगिकारलें नाहीं, ती वीरपत्नी वीरमाता होती. अितकेंच नव्हे तर वीरा स्त्री होती. वीरकुमर पत्ता चितोडसंरक्षणार्थ युद्धोत्सुक होअून चितोडकडे धाव घेण्यास अिच्छुक होतांच आपल्या वीरपुत्राला वीरयोग्य कार्यार्थ जाण्याला प्रोत्साहन देऊनच ती थांबली नाहीं तर पुत्राबरोबर आपणहि राजमंदिरांतील सर्व स्त्रीवर्गासह रणकार्याला हातभार लावण्यासाठीं जाण्याला सिद्ध झाली.

सहीदास तोरणद्वारावर पडल्याबरोबर तरुणवीर **पत्ता** हा तेथील सेनाधिप होअून ठाण मांडून युद्धार्थ सिद्ध झाला. या कुमाराचें वय त्यावेळीं **केवळ १६ वर्षांचें होतें. आतांच्या तरुणांच्या आकांक्षा, हेतु, विचार नि वर्तनक्रम यांचा विचार करतां ज्या जातीनें पत्तादिक वीरयुवक या हिंदुराष्ट्राला दिले त्याच राष्ट्रांतल्या त्याच जातीचे हे आधुनिक तरुण आहेत कां असा हृदयभेदी प्रश्न मनोदृष्टीपुढें मोठें प्रश्नचिन्ह अुभें करतो.** पण हा दोष आजच्या तरुणांचा नाहीं. ज्या जातीमध्यें तरुणांनीं असामान्य नि दैवी गुणसमुच्चयांनीं या भारताचा गौरव हजारों वर्षें जगाला दिपवीत असा प्रकाशमान रीतीनें प्रज्वलित ठेवला त्याच जातींतील आजच्या तरुणांच्याहि अंगीं तेंच तेज नि गुण निश्चितपणें वास करीत आहेत. पूर्वीच्या तरुणांच्या मनांत त्या गुणांचें तेज पेटविणाऱ्या त्यांच्या माता या वीरमाता–सुमाता–होत्या. आज त्या मातृपदाचें तें श्रेष्ठ स्थान झाकोळल्यासारखें झालें आहे. आजच्या संततीला तेजस्वितेनें प्रदीप्त करणाऱ्या मातृशिक्षणाची जोड जर पुन्हां मिळेल तर आजवरच्या दबत्या परिस्थितींतून अधिक तीव्रतर वेगानें तरुणमनस्तेजें अुसळून जगाला दिपविल्यावांचून रहाणार नाहींत.

वीरवरा पत्तामातेला आपलें जगावत कुल निरंतरचें नष्ट होईल याची यावेळीं यत्किंचित् सुद्धां काळजी वाटली नाहीं. सूर्यद्वाराचें संरक्षण करण्याकरितां आपला प्रिय पुत्र पत्ता रणावलेला होऊन रण माजविण्यासाठीं धावून जात आहे हें पाहून त्या वीरमातेला अभिमान वाटला. आपला कुसवा धन्य झाल्याची धन्यता तिला अनुभवूं मिळाली. पण येवढयानें तिचें सामाधान कोठलें व्हावयाला. ती वीरा स्त्री होती. तिलाहि रणावेश चढला. आपल्या हिंदुराष्ट्रावरील मुसलनानी आक्रमणाचें विषम संकट अुपस्थित झालेलें पाहून तिच्या मनांतील हिंदुराष्ट्रभक्ति पूर्णकलांनीं अुदय पावली. तिचा स्त्रीसुलभ मार्दवभाव तर कोठल्या कोठें पळाला आणि तिच्यांतील राजपुती शौर्यानें तत्काळ पेट घेतला. प्रचंड जबडा अुघडून या शत्रूला चावून खाअूं कीं नुसता गिळूं असें तिला होअून गेलें. तिनेंहि युद्धार्थ सिद्ध व्हावयाचें ठरविलें. त्या रणयज्ञांत शत्रूंच्या आहुति देण्यासाठीं आणि अवश्य तर स्वतःच्या देहाचीहि आहुति देअून राष्ट्र-देवतेचें अिष्ट साधन करण्यासाठीं तिनें आपल्या वीर पुत्राला—पत्ताला—केशरी वस्त्रें परिधान करावयाला दिलीं. राजपूत केशरीं वस्त्रें परिधान अगदीं मरणाशींच जाऊन भिडावयाच्यावेळीं करीत असतो. पत्ता-मातेनें आपल्याहि देहावर लोखंडी कवच चढविलें. ती शस्त्रास्त्रानें सज्ज झाली. त्यावेळीं तिला आणखी अेक चिंता वाटली. पत्ताचें लग्न झालेलें होतें. त्या वीर पुत्राच्या अत्यंत कोमलवयस्का वीर वधूला मागें ठेवून जावें तर रणांत आपलें नि आपले मुलाचें मरण निश्चित दिसत आहे अशावेळीं तिचें संरक्षण कोण करील आणि ती कोमल बाला कदाचित् शत्रूंच्या हातीं सांपडली तर ?—पण कां ? असें काय म्हणून ? तीहि वीर कन्या नि वीरवधू आहेच कीं नाहीं ? कोमल वय असलें म्हणून काय झालें ? लहान वयांतलें शरीर कोमल असेल पण वीर जातीयाच्या मनांतील शौर्याचें तेज कांहीं कोमल नसतें. तें तेज कोमल वयाच्या लहान देहांतूनहि चमकूं शकेल तितक्या प्रखरतेनें चमकल्या-

वाचून कसें राहील ? तिनेंहि युद्धदीक्षा घ्यावी हेंच योग्य असें पत्ता-मातेनें ठरविलें. ती वीरबालाहि मनांतून तेंच अिच्छित होती. तिनें म्हणण्यापूर्वी तिच्या सासूनेंच म्हटलें हें पाहून तिलाहि पतिसह रणयज्ञांत शत्रूंचीं शिरें राष्ट्रदेवतेला अर्पण करण्याची संधि मिळत आहे या कल्पनेनें अतीव आनंद झाला. पत्तामातेनें त्या कोमलकुमारीच्या अंगावरील अलंकार काढून टाकून रणांतले अलंकार चढविले कोमलकुमारीनेंहि लोहकवच चढविलें; आणि पत्तामातेनें दिलेला अेक सुतीक्ष्ण शूल हातांत घेअून तीहि सिद्ध झाली. **या प्रमाणें पत्तामाता आणि केवळ १०–११ वर्षांच्या वयाची ती कोमल वयाची कोमलकुमारी पत्तापत्नी वीरावेषानें सुसज्ज होअून रणाकडे धांवल्या.** त्या दोघींचें तें प्रखर वीरातेज नि युद्धावेश पाहून पत्तामातेच्या सर्व सखीवर्गालाहि त्यांचेंच अनुकरण करावेसें वाटून त्याहि समरसिद्ध झाल्या. आणि ही वीरा स्त्रियांची ही वीरा चमू वीराश्रेष्ठा पत्तामातेच्या अधिपत्याखाली रणांत घुसली.

अेकीकडे रणवाद्यें बाजत आहेत आणि त्याच तालावर ही रणावलेली वीरासेना रणगान गात मुसलमानी सेनेवर तुटून पडत आहे; वाचक मना ! अेक क्षणभर मनोदृष्टीपुढें हें चित्र आण. हिंदुस्वातंत्र्य-भक्तिनी राजपूतवीरा आपल्या कोमल देहाचें ममत्व सोडून, सुखोप-भोगांच्या कल्पनांचा होम करीत राष्ट्रस्वातंत्र्यभक्तियुक्त विदेहमनस्कतेनें या विषम रणांत मुसलमानांसारख्या मदांध शत्रुसेनेवर स्वयंप्रेरणेनें शस्त्रास्त्र धारण करून मरणमारणार्थ तुटून पडत आहेत, हें चित्र अेकेबाजूला मांड आणि दुसऱ्या बाजूला केवळ जागतिक आयुष्यभोगार्थ स्वैरवर्तनाचे स्वातंत्र्याच्या कल्पनेवर लुब्ध बनून आपले आयुष्य स्वच्छंदी बनविणारा पाश्चात्य स्त्रीवर्ग नि त्यांचें अनुकरण करूं धावणारा भारतीय स्त्रीवर्तनारंभ यांचें चित्र दुसरीकडे अुभें कर. आणि या दोन चित्रांमधील धन्य, स्तुतियोग्य, दिव्य, नि दैवी आणि अनुकरणीय स्त्रीवर्ग कोणता हें आपल्या

मनाशीं अगदीं निस्पृहबुद्धीनें पण प्रामाणिकपणें ठरव. नि नंतर अशा प्रकारें या दोन दृश्यांमधून जें दृश्य त्याज्य वाटेल त्याचा त्याग करण्याची नि अिष्ट आणि स्वीकार करण्यासाठीं अनुकरणीय वाटेल अशा प्रकारच्या जिवंत दृश्यांत दिसून येणाऱ्या दैवी नि दिव्य गुणसमुच्चयाची निर्मिति या हिंदुराष्ट्रांत पुन्हां निर्माण करावयाची प्रतिज्ञा कर.

रुद्रचंडी स्वरूपा पत्तामातेच्या नेतृत्वाखालीं हें चंडी सैन्य मुसलमानांवर भयंकर त्वेषानें अुसळून धावत आहे या दृश्यानें वीरतेच्या अद्वितीय दृश्यांचाच सतत खेळ खेळणाऱ्या राजपूतांनासुद्धां क्षणभर स्तिमित नि रोमांचित केल्यावाचून सोडलें नाहीं. सर्व राजपूत वीरगणांच्या अंगावर आश्चर्यातिशयाचे रोमांच अुभे राहिले आहेत आणि विस्फारित नेत्रानें देहभान नसल्यासारख्या स्तंभित स्थितींत या वीर नारींच्या शत्रूवरील प्रबल आक्रमणाची दौड बघत नुसते स्तब्ध अुभे आहेत. असे कांहीं क्षण गेले. राजपूत वीरसैन्य अत्यंत अनपेक्षित घटनेच्या पहिल्या आश्चर्यमुग्धतेच्या स्थितींतून बाहेर येतांच त्यांच्यांतील वीरावेश भडकून अुठला. ज्या स्त्रियांनीं कधीं अंतःपुरांच्या बाहेरचा प्रदेश फारसा ओलांडला नसेल त्या अबला सबला बनून शत्रूचा फन्ना पाडूं धावल्या आहेत या दृश्यानें त्यांच्यातील वीरतेजाला डवचून भडकविलें. अितकें होत आहे तोंच तें सर्व वीरासैन्य शत्रूवर तूटून पडलें देखील. प्रत्येक राजपूत स्त्रियेनें आपल्याला निवडता आला तो रणाश्व–रणावता घोडा–निवडून घेतला होता. सर्व वीरास्त्रिया अश्वारूढ असल्यामुळें त्यांना अत्यंत अनपेक्षितपणें शत्रूवर तुटून पडतां आलें.

विराश्रेष्ठा पत्तामातेनें आपल्या वीरास्त्रीसेनेचें संचालन फार कुशलतेनें केलें. बराचवेळ घनघोर युद्धांत मुसलमानांचा संहार करीत असतांहि या स्त्रीवर्गीय वीरासैन्यांतील अेकीलाहि मुसलमानसेना घाव करूं शकली नाहीं. मुसलमान सेनेंतील निवडक निवडक योद्धयांशीं गांठ घालून त्याला

रणांत लोळवण्याचें कार्य आपल्या बालास्नुषेला बरोबर घेऊन रणचंडी पत्तामातानें चालविलें होतें. पत्तामातेचा वीरासखीवर्ग जो सापडेल त्याला लोळवावयाचा असा तडाखा अुडवीत अितस्ततः पत्तामातेच्या मागोमाग नि बरोबर विजेसारख्या तळपत फिरत होत्या. मनुष्य कितीहि शूर नि वीर असला तरी असंख्यसेनेवर मूठभर मनुष्य साह्यानें विजय मिळवूं शकत नाहीं. या दुर्दांत वीरास्त्रियांनीं आपल्या शारिरिक सामर्थ्याची पराकाष्ठा करीत शत्रूंचें कंदन चालविलें होतें परंतु असा अेक वेळ येऊन पोंचला कीं त्यापुढें सुरक्षित राहणें शक्य राहिलें नाहीं आणि घायाळ होअून जिवंतपणीं नराधम मुसलमानांचे हातीं आपला स्त्रीदेह पडूं देणें हें महान भयंकर संकट आपल्यापैकीं कोणावरहि ओढवूं नये म्हणून शेवटचें राजपूती बाण्याचें जोहारकृत्य् करावयाचें त्या वीरास्त्रीसैन्याच्या अधिपस्थानीं असलेल्या वीराश्रेष्ठा पत्तामातेनें ठरविलें.

अितक्यावेळ शत्रूंच्याच रणांत बुडी देणाऱ्या तरवारींचा नि शूलांचा या अंतिम क्षणीं स्वर्गदूत म्हणून अुपयोग करावयाचें त्यांचें ठरलें. पत्तामातेला पूर्वी सति होतां आलें नाहीं. पतीच्या शवाबरोबर चिताग्नींत दहन होण्याचें भाग्य तिला लाभलें नाहीं. म्हणून तिला वाअीट वाटत होतें. पण सुदैवानें आतां त्याहिपेक्षां धन्यतर भाग्य आपल्या वाट्याला आलें याचा तिला फार आनंद झाला. याच रणावर आपल्या पतिराजानें श्रीचितोडरक्षणार्थ देह ठेवला आहे. आणि चितोडरक्षण होअूं शकत नाहीं अशा अतृप्त अिच्छेच्या अपरिहार्य मरणामुळें स्वर्गांतून त्याचें सर्व लक्ष याहिवेळीं अिकडेच असलें पाहिजे तेव्हां त्यांनीं ज्या चितोडगडाच्या रक्षणार्थ सर्वस्व अर्पण केलें त्याच राष्ट्रकार्याच्या अुरल्या अनुष्ठानसिद्धीसाठीं मीहि अर्धांगी नात्यानें त्याच चितोडाच्या रक्षणार्थ त्याच शत्रूशीं लढत पतिराजाप्रमाणें शेकडों मुसलमानशत्रूंचे प्राण घेऊन अंतीं विदेहा होत त्यांच्या भेटीसाठीं—चिताग्नींत नव्हे पण—रणाग्नींत अुडी घेत आहे याचा तिला फार आनंद झाला. आतां यापुढें शत्रूंच्या हातीं आपले जिवंत देह पडणें अपरिहार्य होअील हें पहातांच पत्तादेवीची पूर्वसंकेतानें ठरविलेली खूण

झाली. पूर्वीच्या क्षणापर्यंत मुसलमानवधासाठीं म्हणून अुगारले जाणारे हे वीरास्त्रीसैन्याचे हात याही वेळां आम्हां मुसलमानांवरच आदळणार पण थोड्याच वेळांत यांना आपण घायाळ करीत बंदी करून त्यांचेवर आपल्या पाशवी अत्याचाराच्या रीतीनें चांगलें अुट्टें काढूं म्हणून अुताळलेला मुसलमान सेनासमूह दुसऱ्याच क्षणीं हतबुद्ध होअून 'तोबा तोबा' करूं लागला. त्या वीरावर्गाचे ते अुगारलेले हात खालीं झाले नाहींत तोंच सर्वांचे देह तत्काळ प्राणहीन होअून धारातीर्थी पतन पावले आणि त्या सर्व वीरा श्रेष्ठ स्त्रियांचे वीरात्मे हुतात्मतेच्या दिव्य तेजानें चमकत श्रेष्ठ लोकीं निघून गेले. त्या वीरास्त्रियांनीं रणदेवतेला स्वतःच्या हातांनीं आपल्या देहाचे बळी दिले आणि आपण स्वर्गस्थ झाल्या.

चितोडचे रक्षणार्थ युद्धांतील हें अंतिम युद्ध झालें. या वीरासैन्याच्या दिव्य अुत्साहानें अुत्तेजित नि प्रक्षुब्ध राजपूत सैन्यहि अुफळून मुसलमानांवर तुटून पडलेंच होतें. अकबराच्या बरोबरीच्या अगणित सैन्यांमध्यें तुलनेनें या थोड्याशा संख्येच्या राजपूत सैन्याचें काय चालणार? कुमार पत्ता नि जयमल यांनीं अितका अद्वितीय पराक्रम केला कीं स्वतः अकबरानें त्यांच्या शौर्याचें वर्णन करून ठेवलें असल्याचें मागें अुल्लेखलेंच आहे. पण हें सर्व शौर्य चितोडच्या भाग्याच्या अंतिम अंधःकारमयतेच्या आरंभीची चमकती ज्योति ठरली अितकेंच. सर्व चितोड यावेळीं पूर्वीच्या प्रमाणें निर्मनुष्य झाला. स्त्रीवर्ग-नि पुरुषवर्गहि रणांगणांत धारातीर्थी पतन पावला. सर्व राजपूत स्त्रिया चित्ताग्नींत यावेळीं न जळतां रणाग्नींत अुडी घेअून नि शत्रूमारणाचा अग्नी पेटवून त्यांतून मार्ग काढीत स्वर्गगामी झाल्या. पुरुष वर्गानें केशरी वेष घेअून शत्रूवर धावा केला आणि तेहि आपल्या प्राणांचें मूल्य म्हणून शेकडो मुसलमानांचे प्राण घेत धराशायी झाले.

त्या रणांत राणावंशीय सतराशें निकटसंबंधी प्राणाला मुकले. नअू राण्या, पांच राजकुमारी, दोन वीराबाला आणि समस्त सरदारांच्या स्त्रियांनीं रणकंकण बांधून या रणयज्ञांत शत्रू मारीत मारीत आपल्या प्राणांचे शेवटीं

त्यांनीं आपल्या हातानें बळी दिले. अशा प्रकारें स्मशानमय झालेल्या चितोडावर अकबरानें प्रवेश केला. आंत गेल्यावर असा भयंकर संहार झालेल्या स्मशानमय चितोडांत प्रवेश करणाऱ्या अकबराला चितोड निर्मनुष्य असला तरी ओसाड नि अुजाड झाला नाहीं याचें वैमनस्य वाटून त्यानें त्या अमरावतीतुल्य चितोडचा ध्वंस करण्याला आरंभ केला. मोठ-मोठालीं रम्य भुवनें, राजवाडे, राजमंदिरें, देवमंदिरें. धुळीला मिळवून दिलीं. महाराणाच्या दुर्गप्रवेशाच्या नि दुर्गाबाहेर जाण्याचें वेळीं जो दुंदुभी वाजला जात असे तो भीमभयंकर शद्ब करणारा दुंदुभी—नगारा—भगवती चतुर्भुजा देवीचें मंदिरांत लावले जाणारे परम शोभायमान दीपवृक्ष, चितोडच्या सिंहद्वारावर अत्यंत शोभिवंत दिसणारीं महाद्वाराचीं दोन दारें हीं सर्व आपल्याबरोबर तो विजयचिन्हें म्हणून घेऊन गेला.

अकबरानें आपल्या विजययुद्धांत किती राजपूतांचा आपण संहार केला हें जाणवून ठेवण्यासाठीं सर्व मृत राजपूत वीरांचीं यज्ञोपवितें अेकत्र करून त्यांचें वजन केलें. त्या सर्व यज्ञोपवितांचें वजन ७४॥ मण झालें. अितका भयंकर हिंदूवीरसंहार झाला. त्यावेळेपासून या ७४॥ आकड्याची अेक गुप्त शपथ राजपुतांत प्रचारांत आली आहे. अेखादी प्रतिज्ञा करते वेळीं वा शपथ देते घेते वेळीं ७४॥ ची आण घातली जाते. जर प्रतिज्ञा भंग झाला वा शपथ मोडली तर या ७४॥ मण यज्ञोपवित संहाराच्या पापाचा भागी होण्याचा दोष येअील अशी गंभीर प्रतिज्ञा नि शपथ होअूं लागली. हा ७४॥ अंक अेका गूढभावाचा आविष्कार करीत आला आहे! अितक्या सहस्रावधि वीरांच्या राष्ट्ररक्षण प्रतिज्ञेचा नि तदर्थ मरण-मारणाच्या रणयज्ञाचा आविर्भाव या चितोडगडीं झालेला होता. चितोडच्या या शेवटच्या संरक्षण कार्यांत रणांतील हिंदूसंहारमापनाचा आकडा ७४॥ आहे. चितोडमध्यें याप्रकारें अनेक रणयज्ञ झाले त्या सर्व वेळीं असाच संहार होत गेला. सर्व हिंदुस्थानच राष्ट्रस्वातंत्र्यार्थ युद्धांचें रणक्षेत्र झालेलें आहे. मुसलमानांच्या आगमनापासून तों आतांच्या क्षणापर्यंत या भारताच्या स्वातंत्र्य-रणयज्ञार्थ जवळ जवळ दीड हजार वर्षें हिंदुस्थानांतील हिंदू नि हिंदू राष्ट्राचे

आक्रमक शत्रू यांचें तुंबळ युद्ध चालू आहे. अशा या भारतीय महारण-यज्ञागारांतील श्रीचितोडदुर्ग रणयज्ञाचें मुख्य स्थंडिल होय.

हिंदू राष्ट्रस्वातंत्र्यभक्तांच्या लक्षावधींचे देह रणांत पतन पावलेले; आणि लक्षावधि स्वातंत्र्येच्छू वीरात्म्यांनीं अतृप्त अिच्छांच्या तळमळत्या श्वासानीं रणांत प्राण सोडलेले आठवले म्हणजे त्यांचे स्वर्गीय स्वातंत्र्योत्सुक अतृप्त आत्मे लक्षावधि जिव्हांनीं स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांचा आदेश देत आहेतसे तेथें अैकावयास सांपडेल. हिंदुस्थानभर हा अनुभव येअील, पण या चितोडदुर्गक्षेत्रीं दिव्य अशा दैवीतेजासह जिवंतपणें अैकावयास नित्य मिळत असेल. केवळ अुघड्या कानानें नि समवेदनशील हृदयानें मात्र तेथें क्षणभर दिव्यज्ञानदृष्टियुक्त होत अैकावयाला अुभे राहिलें पाहिजे.

श्रीकाशीक्षेत्रांत जर कोणाचाहि मृत्यु झाला तर भगवान् श्रीशंकर त्याला तारक मंत्राचा अुपदेश देअून तत्काल मोक्षफलभोगी करतात. अध्यात्मिक मोक्षार्थ काशीमरण वांच्छावें. पण चितोडगडीं त्याहून अधिक पावित्र्य आहे. योगी अथवा रणांत शत्रूंशीं लढत असतां मृत्यू वरणारा योद्धा यांनाच काय तें सूर्यमंडल भेदन करून मोक्षाचे अधिकारी होता येतें असें वेदशास्त्रादिक सांगतात; श्रीकृष्ण भगवान् नि ज्ञानी ऋषी मुनी म्हणतात. योगाभ्यासाची योग्यता कमवावी लागते पण श्रीकाशी क्षेत्रींच्या मरणांत ती योग्यता श्रीभगवान् शंकर जिवाला प्रदान करतात रणांत अभिमुख राहून शत्रूशीं लढत नि त्याला मारीत मरणाची भेट करण्यानें योध्याची योग्यतासुद्धां कमवावी लागते. परंतु तीहि योग्यता देणारें स्थान चितोडदुर्गावर अुत्पन्न झालेलें आहे. श्रीकाशीला मोक्षाधिकारी-पदाचे दानाची भगवान् श्रीशंकराकडून अपेक्षा करण्याकरितां मरण्याची वाट पहावी लागते. पण चितोडपुरीची पवित्रता तशीहि अपेक्षा ठेवणार नाहीं. तेथें केवळ एकच अपेक्षा ठेवावा लागेल, पवित्रक्षेत्रीं जाणार. बहुजनसमाज जसा मनाचीं कपाटें बंद करून नि आपली जाणीवेची ज्ञाना-दृष्टी मिटून धेऊन जातो तसें चितोडदुर्गक्षेत्रीं मात्र जाणें अुपयुक्त ठरणार नाहीं. या शिसोदीय वंशाच्या शिवदायी आणि शिवस्वरूप पवित्र हौतात्म्याचे

महतीचीं दृश्यें कल्पनाबळावर जाणिवेच्या ज्ञानदृष्टीपुढें जिवंत अुभीं करून आणि भावनावेशाला प्रवेश करूं देण्यासाठीं मनाचीं कपाटें सताड अुघडून सहृदयतेनें या क्षेत्रीं प्रवेश करणाऱ्याला योग्याला वा योध्याला मिळणारी मोक्षदायी पवित्र महत्ता प्राप्त व्हायला अुशीर लागणार नाहीं. तेथील वातावरणांत त्या अलौकिक, अद्वितीय नि महादैवी पावित्र्याचे वारे सतत वहात असलेच पाहिजेत. त्या धर्म–जाति नि राष्ट्रभक्तीच्या प्रीत्यर्थ हौतात्म्याची पवित्र वायुलहरी, आणि त्या पवित्रतम वातावरणांतील पावित्र्याचे अणुरेणू आपल्या अंतःकरणांत प्रवेशून घेण्याला मात्र आपण सिद्ध होअून तेथें गेले पाहिजे. परमेश्वराच्या अनेक विभूतींपैकीं राष्ट्र पुरुषरूपी विराटस्वरूपाच्या भगवंत विभूतीचें चितोडदुर्ग हें पवित्रतम आणि श्रेष्ठतम निवासस्थान आहे. चितोडदुर्गावरचें स्वामित्व अेकलिंगजी भगवान् श्रीशंकराचेंच आहे. श्रीकाशीचें महास्थानहि श्रीशंकराचेंच आहे. पण दोन स्थलीं दोन प्रकारच्या भक्तासाठीं दोन स्वरूपानें ते निवास करीतात. तेथें श्रीकाशीक्षेत्रीं योगीगम्य स्वरूपानें रहातात तर येथें चितोडक्षेत्रीं योद्धागम्य राष्ट्रपुरुषाच्या विराटस्वरूपीं विभूतीरूपानें राहतात. तेथें मरणाराला मोक्ष देतात. येथें जाणाराला मोक्षजेता योद्धा बनावितात. श्रीकाशीक्षेत्रीं जीवाला केवळ परमार्थस्वरूप मोक्ष साधतो. श्रीचितोडक्षेत्रीं योग्यप्रकारें यात्रा करणाराला मोक्षरूपीं परमार्थ साधन देणारा नि राष्ट्रसेवेत घडणाऱ्या परार्थ महान बुद्धीचा लाभ घडतो. केवळ व्यक्तिगत परमार्थ साधण्यापेक्षां जर परार्थांत–राष्ट्रसेवा करीत जातीच्या, धर्मांच्या नि तद्वारा जगाच्या अुपयोगी पडणाऱ्या परार्थांत परमार्थ साधणें हें जर अधिक योग्य, अधिक श्रेष्ठ नि अधिक महत्वाचें असेल तर त्याच दृष्टीनें श्रीकाशी मोक्षधामापेक्षां श्रीचितोडक्षेत्राच्या परार्थसाधी मोक्षधामाचें महत्व महत्तर, श्रेष्ठतर नि म्हणून अधिक भजनीय आहे असें कां म्हणूं नये !

हिंदुमना ! श्रीक्षेत्राला विसरूं नकोसच पण मोक्षमार्गासाठीं वाट चालत असतां जगदुपकारी हिंदुराष्ट्रसेवेच्या महापुण्याला डावलून

जाअूं नकोस. स्वार्थसाधुपणा मग तो अैहिक स्वार्थ असो वा पारमार्थिक मोक्षरूपी स्वार्थ असो–हा हीन प्रतीच्या मनाचा द्योतक आहे. खरें हिंदूमन हें स्वार्थाला–हीन स्वार्थाला–तिलांजली देणारें असून परार्थाबरोबर श्रेष्ठ स्वार्थ–परमार्ध वा परार्थद्वारा परमार्थसाधन करणें हें या हिंदूमनाचें वैशिष्ठ्य आहे. ज्या या सनातन धर्माकरितां, या महान् देवप्रिय जातीकरितां–या हिंदुराष्ट्राकरितां स्वतः भगवंत वेळोवेळीं अवतार घेअून संरक्षणकार्यमग्न होतात त्याच या देवप्रिय हिंदूजातिकरितां राष्ट्रसेवापुण्याचें तूं अनुष्ठान करशील तर योगी होअून जितका देवप्रिय होण्याचा संभव असेल त्यापेक्षां अनेकपटीनें या हिंदूधर्म–जाति–राष्ट्राच्या सेवाव्रताच्या अनुष्ठानानें तूं अधिक देवप्रिय नि देवभक्त होशील. आणि या राष्ट्रभक्तिरूप अमृताचा लाभ या श्रीचितोडक्षेत्रीं–या महापवित्र हौतात्म्याक्षेत्रीं निश्चयानें प्राप्त होअील. राष्ट्रभक्तीच्या दिव्यतेजानें युक्त होअून परार्थसाधनतपानें मोक्षाला आपल्या पायाशीं लोळण घालण्याचें सामर्थ्य प्राप्त व्हावें अशी तुझी अिच्छा असेल तर तूं या श्रीहौतात्म्यक्षेत्रराज श्रीचितोडदुर्गाच्या महापवित्र स्थानीं जाअून राष्ट्रभक्तीच्या दिव्यतेजानें तेजस्वित होअून ये.

हिंदूमना! तू या हिंदुराष्ट्ररूप विराटपुरुषाची सेवा करून भगवद्प्रिय पुण्य गांठी सांचावित गेलास तर तूं भगवंतांचा अधिक लाडका भक्त होशील. श्रीचितोडदुर्गपुरी ही विराटस्वरूपी भगवंताची दुसरी श्रीकाशी मोक्षपुरीच आहे. हिला वलांडून जाऊं नकोस. यांत तुझें नि जगाचें कल्याण आहे.

या चितोडपुरीच्या दिव्य राष्ट्रभक्ताचें हौतात्म्यमय पवित्रतम वातावरण सर्व भारतवर्षभर प्रवाहित होत राहो. त्यायोगें सर्व हिंदुराष्ट्रिकगण अद्वितीय राष्ट्रभक्तीचे दिव्यावेशानें जागून अुठेल. भगवान् अेकलिंगजी श्रीशंकर ही मनीषा पूर्ण करोत.

प्रिय भगिनीवर्ग! या चितोडपुरीतील दैवी राष्ट्रभक्तीच्या घुटीचे घुटके आपल्या संततीला बाळपणापासून पाजीत राहिलांत तर भगवान् अुपरोल्लिखित मनीषा अचिरात् पूर्ण केल्यावांचून खचित राहणार नाहींत.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २. ८०३९
वर्ग............क्रमांक........